पेशवे दप्तरांतून निवडलेले कागद

४

आनंदीबाईची दिनचर्या

सप्टेंबर १७८६—आक्टोबर १७८८

[किंमत—१ रुपया किंवा १ शिलिंग ८ पेन्स]

संपादक—गो. स. सरदेसाई, बी. ए.

गव्हर्नमेंट सेंट्रल प्रेस, मुंबई
१९३[illegible]

(या प्रकाशनांतील संपादकीय टीका व मतें यांजबद्दल कोणतीहि जबाबदारी सरकारावर नाहीं.)

SELECTIONS FROM REPORTS ABOUT ANANDIBAI

September 1786 - October 1788

Anandibai, born, as she herself says, in 1747, in the family of the Oke of Guhagar, was the second wife of Raghunathrao. She was married on 17th December 1755, within a few months of the death of Jankibai (Barve), Raghunathrao's first wife, and died at Anandvalli, three miles west of Nasik, on 27th March 1794. She was one of the famous ladies of the Peshwas' family and has attained undeserved notoriety, on account of her alleged complicity in the conspiracy to murder Narayanrao. The murder resulted in a war with the British, who sheltered Raghoba at Surat. When it was over, Raghoba with his family came to reside at Kopergaon on the Godavari in August 1783, completely broken in health and spirit, and died there four months after, on 11th December.

How original papers correct popular errors and historical inaccuracies, is well illustrated in the case of Anandibai. The 74 documents here printed refer to a period of nearly two years (September 1786 to October 1788) with many gaps between. They describe the daily life and routine of Raghoba's entourage at Kopergaon and report to Nana Fadnis at Poona all the utterances and actions not only of the lady herself but of her sons and retainers, who were closely watched and deprived of all liberty of movement except permission to visit a few temples in the immediate vicinity. The entries are full, pithy and pointed, and reveal the galling nature of Anadibai's confinement when scarcely anything beyond the needs of life were supplied. It is so entertaining to read these vivacious reports that one cannot help wishing that more letters had survived covering the whole period of the lady's widowhood. Anandibai's character is most graphically depicted in these letters, which contain as well many reminiscences of past events of a political or domestic nature. She criticises in an extremely frank manner the personal peculiarities of the various Peshwas, not excepting her own husband, and their ways and doings in general ; and this enables us to correct many misconceptions which have crept into history. She describes the haughty and imperious character of Gopikabai, wife of Nanasaheb, the intriguing nature of Sakharam Bapu, and the stern discipline of Nana Fadnis. She constantly bewails her own sad fate in having to submit to the dictates of men like Nana Fadnis whom it should have been in her power to command. Nana suspected her of necromancy and checked the tendency with a strong hand. Her household consisted of Amritrao (adopted son) with his wife Savitribai, Bajirao (born at Dahr on 10th January 1775), his wife Bhagirathibai, and of Chimaji Appa born on 30th March 1784, who only figures as a child in these papers. Bajirao's early tendencies are sufficiently described in the mother's own words which amply justify the character he later on came to bear in the Maratha State. He was unruly, fanciful, licentious, given to ostentatious piety, disobedient and faithless. He had no heart in his studies and often received severe rebukes and even floggings from his mother.

Having become thoroughly sick of her long confinement at Kopergaon, Anandibai tried hard to be removed to some other place on the Krishna : but she was not allowed to do so. In October 1792, however, she came to live at Anandvalli, about three miles west of Nasik, where she eventually died at the comparatively early age of 47. She was a clever writer and herself penned several charming and dignified letters some of which are extant. She was shrewd and wise, honest and outspoken, and always anxious to preserve the dignity and the prestige of the Peshwas. If she had been wedded to a better husband, there seems to be little doubt that she would have figured as one of the most patriotic members of the Peshwas' family. As matters stand, however, she has suffered in popular estimation not so much for her own drawbacks as for those of her husband and of circumstances beyond her control. It is creditable to her that through thick and thin, she honestly helped her husband's cause and did all that a dutiful wife could to retrieve his fallen fortunes.

She bore, as we know, many children, at least four sons and one daughter Durgabai, who was married to Pandurang Babuji Naik of Baramati but who died in 1783 in the life-time of her parents.

The effect of this long confinement was inevitably demoralizing. Had Nana Fadnis, on the death of Raghoba, buried the past and restored this gallant lady and her children to liberty, and allowed the young Peshwa to associate with them as was the practice of the family before, it is permitted to the historian to conjecture whether the course of Maratha affairs might not have been changed to some extent.

No. 1] [1-9-1786

पौ छ १३ जिल्काद

सु॥ सबा

श्री.

विज्ञापना विशेष. कलमे येणे प्रो. आपाजी विश्वनाथ व बालाजी बाबुराव घाणेकर याचा वाटणीचा कज्या आहे म्हणून सरकारांतून कारकून व ढलाईत व जासूद देऊन लोकाकडें कर्ज येणे ते वसूल करून सरकार चौथाई घेऊन बाकी वाटणी करून घाणेकर यास द्यावी. ज्यांकडे कर्ज येणे त्याचे नावे सरकारचीं पत्रे दिल्ही आहेत की, वाजबी कर्जाचा फडशा करून देणे. त्यांत तान्हाजी (तानबाजी) धायभर यांस पत्रें होती ती त्यास दाखविली. त्याचे कारकुनाने वाचून पाहून फाडून टाकिली. ती येथे आली. त्यावरून येथून त्या कारकुनास आणावयास स्वार पाठविले आहेत. कलमे १

वासुदेव रामकृष्ण यांस विसाजी आपाजी याचे ऐवजाकरितां मामलतीवरून सरकारची आज्ञा नसेतां कोंपरगावी नेऊन तगादा केला हें ठीक नाहीं, म्हणून पत्री आज्ञा; त्यास लस्करची आज्ञापत्रें आली, त्याच्या नकला शेवेसी पाठविल्या आहेत, त्यावरून निवेदन होईल. कलमे १

मौजे उंदीरवाडी पो पाटोदे नि॥ आंबीकर व मौजे अंदरसूल पो मजकूर नि॥ माहादजी सिंदे कमावीस त्रिंबकराव देशमुखाकडे आहे; त्यास उंदीरवाडीची जमीन सात वर्षे अंदरसूलकरानी दाबिली आहे, म्हणून पाटील बाबा यानी देशमुखास पत्र दिल्हे आहे की, वाजबी मनास आणून विल्हेस लावणे. असें पत्र आले असतां मनास आणित नाही, आणि पांच साचाहूर जमीन अंदरसूलकर वाहून खातात. उंदीरवाडीकर येथे फिर्याद आले आहेत. वाजबी मनास आणून विल्हेस लाविल्यास हजार बाराशे रुो पावेतो सरकारांत देतील; येविसीची आज्ञा. कलमे १

सगुणाजी देशमूख याचे देशमुखीचे जफ्ती प्रकरणी पेशजी विनंतीपत्र लिहिले, त्याचे उतर अद्यापि येत नाही; येविसीं बाबाजीपंत साठये विनंती करितीच असतील. उतराची आज्ञा जाली पाहिजे. कलमे १

मशालेचे पोतांविसी पेशजी विनंती लिहिली होती. आज्ञा जाली नाहीं.

पालख्यांच्या दांड्या फार वर्षांच्या जुन्या जाल्या. उपयोगी नाही, याजकरिता नव्या करावयाची आज्ञा व सामान दोन वर्षे जाली, मजीद[1] जाले आहे, ते नवे करावयाची फरासखान्याकडे आज्ञा जाली पाहिजे. पालख्या—

१ श्रीसाबाची,
१ मातुश्रीबाईसाहेबाची,
१ श्रीमंत राजश्री बाबासाहेबाची,
२ राजश्री अमृतराव,
  १ खासा,
  १ सौ सावित्रीबाई,
  —
  २
—
५

कलमे
१

श्रीमंत राजश्री आपासाहेब यांस कडीं तोडे सोन्याचे पाहिजेत, ते नवे करून पाठऊन द्यावयाची आज्ञा जाली पाहिजे. कलमे
१

पागा दिंमत केसो माहादेव याजकडे दसरियाचें कापड सालाबाद पावते त्याप्रो पाठऊन द्यावयाची आज्ञा जाली पाहिजे. कलमे
१

उपाध्ये यांस पत्र ल्याहावयास सांगतात. न लिहिले तर बोलण्याचे आशय समजणार नाही म्हणून लिहून फरासखान्यातून देवावयाची आज्ञा जाली पाहिजे. कलमे
१

अफ्तागिरे दसरे यास नवी करावयाची दाड्या सरंजाम सुध्धा.

४ पहिली,
२ हाली नवी केली पाहिजेत,
  १ श्रीमंत राजश्री आपासाहेब यांजकडे,
  १ सौवती ताईसाहेब यांजकडे,
  —
  २
—
६

येणे प्रो साहा अफ्तागिरे नवी जुनी मिळोन दसरियास तयार करून द्यावयाची आज्ञा फरासखान्यात जाली पाहिजे. कलमे
१

मौजे आसी येथील कुरणे दरोबस्त व शेऱ्या पहिले नेमणुकीचे अजमासास लाऊन दिल्हे आहे, असे असता आर्लाकडे विसाजीपंतानी काय समजाविले न कळे. शेऱ्यांचा गला कोंपरगांवचे हिसेबी जमा होत आहे. लस्करची पत्रे आलीं. त्याच्या नकला सेवेसी पेशजी पाठविल्या आहेत. विसाजीपंताचे पागेचे बेगमीस कुरण पाहिजे तर दुसरीकडे नेमावे. आसीची नेमणूक दरोबस्त कुरण सेरीगांवचे ऐवजासुधां येथील

१ मजीद = जुने.

त्याची नकल पाहावयास पाठविली. तर जे शब्द लिहिल्यात येतील त्याचा अर्थ चितांत येईल ते पत्र लिहिणें, तर कृष्णाजीपंताकडून लिहिवितो. इतकियावर जसी मर्जी असेल तसी आज्ञा जाली पाहिजे. कलमे

१

या बेटांत बाहेरील कोणी येणार व येथील बाहेर जाणार त्यास चौक्या. राघोपंत याकडील गाडदी व कासिपंताकडील आहेत. चौकसी ज्याकडे येईल त्याणे रात्रीस सांगावें. जो बाहेर जिकडील जाणार त्याणे जातेसमई परवानगीने जावे. हे काम मोठेच आहे व वाड्यात जाणारास परवानगी हे काम एकीकडे परवानगीचे असावें. नित्याचे राबत्या खेरीज येणारास जाणारयास परवानगी या प्रकारची असल्याविनाहि कोणाचे तरी जिमेस काम लावावे. हे फार उपयेगी जाणून विनंती लिहिली आहे. ज्याकडे परवानगी त्यास पुसावयास जागा नाही तर कोणास पुसावे? यांकरतां आज्ञा असावी. कलमे

१

कर्मविपाकाचे पुस्तक सूर्यअरुणसंवाद आणवावा म्हणून सांगितले आहे. कलमे

१

बेरजेस धरली आहे. इतकियावर स्वामींची मर्जी. कुरणाचे तपसिलाची याद आलाहिदा पाठविली आहे. पाहिल्यानंतर ध्यानात येऊन आज्ञा होईल त्या प्रो करूं. कलमे

१

उपाध्ये यांस पत्र लिहिलें आहे; त्याची नकल करून पाठविली आहे; ती उपाध्ये यास दाखविल्याने खुलासा निघणार नाही. येथून किती लिहितो, ते तेथें किती बोलतात, याचा भाव समजणे. तो मार्ग येक वेल त्यांस समजल्यानंतर खुलासा निघणार नाही; याजकरितां विनंती लिहिली आहे. नकलेवरून खुलासा पुसावयास चांगलें असें वाटतें, त्यांत जसी मर्जी असेल तसेंच करावे. कलम

१

अमृतराव व मातुश्रीबाई साहेबांचे बोलणे येकांती होत असते. त्या बोलण्याचे भाव काही समजत नाही. सारे बाहेर घालून येकांत होतो. इलाज करून पाहातो, चालत नाही. कलम

१

येणेप्रो पंधरा कलमे लिहिली आहेत. निवेदन होतील. उतरपत्री आज्ञा जाली पाहिजे. रा छ ७ जिलकाद. शेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Here is an account of several days' talks reported to Nana from Kopargam, containing many interesting episodes.*

No. 2] [*21-5-1787*

पौ छ १२ साबान
सु ॥ समान.

श्री *

सेवेसी केसो माहादेव कृतानेक साष्टाग नमस्कार विज्ञापना. ताा छ ३ साबान पावेतो स्वामीचे कृपेकरून सेवकाचे वर्तमान यथास्थित असे विशेष. राजश्री राघोपंत ठोसर येथून पुणियास गेल्यापासून श्रीमत बाबासाहेब याचे लिहिणे पढणे होत नाही. मनश्चील वर्तणुकी होतात. काल छ २ साबानी श्रीमंत मातुश्री बाईसाहेब याची व बाबासाहेबाची कटकट जाहाली. येथे कोणास भीत नाही. बाईस टाकून बोलतात. त्याजवरून मातुश्रींनी सागितले की, आपणास लिहून राघोपंत यास आणवावे; म्हणौन सेवेसी विनंती लिहिली आहे. तरी मशारनिल्हेचा बंदोबस्त करून रवानगी केली पाहिजे. ते आल्याविना कोणाचे आईकत नाही; याकारिता माारनिल्हेस सत्वर पठवावयास अज्ञा करावी. श्रीमंत बाबासाहेबास आज तीन रोज ज्वर येतो. व श्रीमंत सौ ताईसाहेब यासहि ज्वर आज पंधरा दिवस येत होता. मधे दोन च्यार दिवस निघाला होता. आता मागतीहि ज्वर येत असतो. वैद्यापासोन औशधे देवित असतो. सेवेसी श्रृत होय. बहूत काय लिहिणे हे विज्ञाप्ति.

¶*Keso Mahadeo reports to Nana news of Bajirao's rowdyism and requests him to send back Raghopant Thosar who alone could control him.*

No. 3] [*22-5-1787*

श्री ७

पु॥ सेवेसी कृष्णाजी जनार्दन कृतानेक सिरसाष्टांग नमस्कार विज्ञापना. दिनचर्येचे वर्तमान.

छ ४ सावान. वाड्यांत लक्षहोम जाला.

आपासाहेबास येक दोन दिवस ज्वर येत होता. आता प्रकृत बरींच आहे.

बाईनी सर्व प्रायश्चित्त छ २ रोजी केलें.

छ ३ साबान.

१ अमृतराव यांस स्वप्न पडलें की, गाईवर बसलों आहे. बाई बोलली कीं, गाय पृथ्वी, चांगलें आहे.

१ बाईनी स्वप्न पाहिलें की, त्रिवर्ग कारभारी येथील जवल आले. इत-

---

* पत्र रुजू घेतल्यासंबंधीं चिन्ह. असेंच चिन्ह पुष्कळ पत्रांच्या माथ्यावर आहे.

सप्तशतीचा पाठ बाई करीत असतात. पहिली दोन चरित्रें पाठ होतीं. आलिकडे म्हणत नाही म्हणोन विस्मरण जाले. आतां मागती म्हणावे आसे बोलोन छ २९ रजबपासून येक पाठ नित्य पोथीवरून होत असतो.

कलम
१

क्यात साहेबांची स्वारी आलीसें पाहिले तों कुणबीण बोलली कीं थोडे उरले. आसे बोललियाचा अर्थ आमचें आयुष्य थोडे आहे आसें बोलली.

१ वाड्यांतील पुराणिक सप्तश्रृंगास देवदर्शनास गेले; तेव्हा निरोपास आले. त्या वेळेस त्याजबराबर बाईनी निरोप देवीस सांगितला कीं आमचे मुलाबालांचे नवस फार आहेत. आम्ही यावें तर आपलें स्वाधीन नाही. श्रीत्रिंबकेश्वरचेहि नवस आहेत. परंतु आमचे जाणें घडत नाही. आम्ही परस्वाधीन आहो. हा शब्द आम्हाकडे नाही. आम्ही माजोरीपणा करीत नाही. आमचें बरें होईल तेव्हां डोईचे वाटेनें चालत येऊ, आसे बाईनी सांगितले.

—
५

सेवेसी श्रुत होय हे विज्ञापि.

¶*Anandibai's doings are here reported to Nana at Poona. They are an interesting reading.*

No. 4] *[23-5-1787*

पौ छ १६ साबान सु॥
समान वैशाख.

श्री रू

सेवेसी गोविंद कृष्ण गोडबोले कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. येथील वर्तमान ता छ ९ साबानपावेतो क्षेम असे विशेष. श्रीमंत राजश्री बाबासाहेब यास ज्वर फार येत असतो. आज पांच दिवस जाले. औषधे काढे किरकोळ चालली आहेत. सर्दीचा ज्वर आहे. लौकरच आरोग्य होईल. रा राघोपंत ठोसर यास जाऊन फार दिवस जालेत. येथे असल्यास बाबासाहेब अरवली (?) फार

करितात, यास्तव त्याची काय सोय करावयाची असेल ते करून देऊन त्यास कोपरगावी लवकर रवाना करावे. राघोपंत ठोसर बाबा (सा) हेबाचे प्रकृतीस वाकफ आहेत. तेहि थोडीबहुत औषधे जाणतात. त्यास आणवावे म्हणौन श्रीमंत मातुश्री बाईसाहेबानीं आज्ञा केली, त्यावरून लि॥ आहे. बहुत काय लिहिणें. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Govind Krishna Godbole asks Raghopant Thosar to be sent back and reports that Bajirao was getting fever.*

No. 5] [*9-6-1787*

पौ छ १० रमजान

सु॥ समान.

श्री.

सेवेसी कृष्णाजी जनार्दन कृतानेक सिरसां नमस्कार विज्ञापना. ता छ २२ साबानपर्यंत यथास्तित असें विशेष. श्रीमंत मातुश्री आनंदीबाई यांचे बोलण्यातील आन्वय दिनचर्येचे भाव येणेप्रो.

छ १४ साबान.

१ सावित्रीबाईकडून लक्ष्मीवृत पुत्रार्थ करणार.

१ भानूच्या कुलामध्ये नाना मात्र चौकस. बाकीचे सारे भले आहेत.

१ आमृतराव याणी स्वप्न पाहिले की माहापुरूष गोसावी पाहिला. बाईचे दर्शन घेतलें. चांगले आहे बोलिली.

३

छ १६ साबान.

१ आंनाजी फांटागरा भगत जेऊराहून बलाविला होता. त्यास आपल्या वेरपणाविसी विचारणेच नलगें आसे म्हणून विचारिले नाही.

छ १५ साबान.

१ आश्रित जोसी आहेत त्यास सांगितलें की जन्मपत्रिका पाहून आंतकाळी योग कसे आहेत ते पहावें.

१ पुण्याहून बाण आले, गैरउपयोगी आले. लांबून आले आसतां वाईट. सारांश आस्ता नाहीं हेच खरें.

१ बाजीराव यांचे स्वरूप पाहून आमृतराव तेजस्वी दिसतात. तपश्वी ब्राम्हचर्य आशी रीत आहे. परंतु गुणाग्राह कोणी नाही.

१ थोर बाण आला आहे त्यास देवालय बांधणार. त्यास पुण्याची

१ पेंचाविसी मुक्तता होण्याचा उद्योग करीतच असावें. जे होणे ते होऊ. रूबरू दर्शन होते म्हणजे चांगले, परंतु नष्टचर्य सरले नाहीं.

—

२

छ १८ साबान.

१ वैराग्य होण्याची कारणे पदोपदी आहेत, परंतु निश्चय राहात नाही.

१ येथे सभोंवते गावी थोरथोर ब्राम्हण आहेत. चौकसीमुले बला-वीत नाही.

१ स्वसत्तेत जन्म गेला, यामुलें पर-स्वाधीनता साहवत नाही. भावीस उपाय नाही.

१ पूर्वजन्मी तपश्चर्या केली, तेव्हां कोणासी द्वेष केले, त्याचे फल उगऊन घेतात. बरें, पुढें राहाणार नाहीं.

१ धारेत होतो तेव्हा मुलाबालावरी चढाई करावयास आशंका आली नाही. मर्द माणूस याजकरिता लढाई केली.

१ अमृतराव याची (याची) शरीर प्रकृत ठीक नवती त्यास परवानगी येईल कीं नाहीं? सारांश आमचे हातून पुण्यकर्मे होऊ देत नाही.

—

४

छ १७ साबान.

१ पत्रिका पाहावयाविसी जोशांस सांगितलें त्याजवरून पाहिली. त्यास पांसष्ट वर्षे आवधी आहेसे दिसते.

१ अमृतराव बोलिले की कोणी पेशजी सांगितले कीं कासीयात्रा होईल. त्यास फार दिवस जाले. पुढें पाहावे.

—

२

छ १९ साबान.

१ पेशजी श्रीमंत होते तेव्हांची तऱ्हा व हाली बारभाईनी येथे ठेविले याची तऱ्हा बराबरच आहे. पूर्वीचे स्मरण येणेकरून वारंवार होतें. आम्हास दोनी बराबरच आहेत. मोठ्यामोठ्या जागा केंदूर पाबल व जुनर चांगले बागाइती गावें आसें टाकून आम्हास आशा कुग्रामात ठेविले आहे. वेलेस काही लागले तर सत्ता पुरूषास मिलणार नाहीं.

—

२

८

श्री २

पु॥ सेवेसी कृष्णाजी जनार्दन कृतानेक सां नमस्कार विज्ञापना. बोलण्यातील भाव—

छ १८ साबान.

मेहेनत कमी जाली. सुखांत आहां. किमपि काम नाही. नित्यांत मेहेनत आसती म्हणजे हालेखूद[1] आसता ते ईश्वरास वाहिलें.

१ आम्ही केवढीं माणसें होतो आणि कोणत्या योग्यतेस आलो. आन्याय कोणी पाहात नाही. उगेच नि:-कारण कैदेत ठेविले आहे. त्यास आमचेणे प्रयत्न होणे समजत आहे. धनी आसते म्हणजे ताकत नवती. आम्ही निर्बल जालो ते समई गांजितात.

छ २० साबान. बालाजी विश्वनाथ फाटक होते तेव्हा घर बांधिलें, त्याचे अर्धेच काम राहिले. हाली काम चालविले. कोठी करणार, ते पाहा-वयास गेली तेथे बोलणी:

१ सिताब खेड्यास आइतेच धोंडे येथे आणावयाकरितांच ठेविले होतें.

१ पेठेस कौल दिल्हा तर बहुत घरे बांधतील. परंतु येथे बंदोबस्त आहे की कोणी पाहिले तर डोले काढा-वयास सलया हांती घेतल्यांच आहेत.

१ काही तरी काम सांगितलें तर होत नाही त्यापक्षी सांगत नाही. आम्ही सांगू ते दिवसी तुम्ही आसाल की नाही हें कलेना.

१ राज्यास ममता आसली तर यथास्तित चालत नाही याचा आनु-भव आम्ही घेतला.

१ माहायात्रेस जाण्याची हौस आहे. परंतु आमचे हातून धर्म होऊ देत नाही. धर्म जाल्यास चल होईल. पदोपदी आम्हास जपतात.

—

५

सेवेसी श्रुत होय हे विज्ञाप्ति.

¶*Doings of Anandibai reported to Nana at Poona.*

---

[1] टीक.

No. 6] [17-6-1787

श्री.

यादी आजमास मु॥ कोपरगांव सु॥ समान समानीन मया व अलफ. पेस्तर साल च्यातुर्मासाची बेगमी ई॥ छ १ रमजान जेष्टमास ता। सफर अखेर कार्तिकमास पावेतो खर्चास बा। नेमणूक सालिना— रुपये.

१०००००	डौलाकडे नेमणूक	रुपये.
१०००००	हुजूर विल्हेकडे नेमणूक	रुपये.
२०००००		

पौ यकमाही रू॥ १७००० प्रो साहामाही आजमासें नेमणूक पो करार १०००००,

यक लाख रुपयाची तरतूद होऊन यैवज वैशाख अखेर पावता जाला पाहिजे. पुढे पर्जन्याचे दिवसच आले. हा यैवज आजपावेतो पावला असावा; परंतु मर्जीस भिऊन राहिलों. अद्यापहि एक महिन्याचे आंत पावल्यास सोय आहे.

¶*Provision of funds for Anandibai's expenses is requested in this letter : it is twenty thousand rupees for 6 months.*

No. 7] [23-9-1787

पौ छ १६ जिल्हेज सु॥ समान.

श्री.

सेवेसी केसो महादेव कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती विज्ञापना. ता। छ १० जिल्हेज मो कोपरगांव वर्तमान यथास्थित असे विशेष. फरकाबादेहून लाखोटे इंग्रजाकडील लाखोटे चवकीवर आले, ते स्वामीकडेस पाठविले आहेत; व इकडील वर्तमान तरी श्रीमंत उभयतां खुशाल आहेत व श्रीमंत मातुश्रीबाई-साहेब याची मरजी ठीक आहे. पेशजी देवास देवारा पाहिजे याजकरितां सेवेसी विनंती लिहिली होती; परंतु स्वामीची आज्ञा कांही आली नाहीं. वरकड वर्तमान बारीक मोठे राजश्री गोविंदपंत यांणी सर्व लिहिले आहे, त्यावरून सेवेसी कलो येईल. नगरदेवळेकर अनपूर्णाबाई याणी लढाईचा प्रसंग माडिला आहे. आणीक लोक व पागेचे लोक पाठविले. सेवेसी कलावे म्हणून विनंती लिहिली असे. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Keso Mahadeo reports to Poona news of Anandibai and children's health.*

No. 8] *[28-9-1787*

पैा छ २२ जिल्हेज
सु॥ समान.

श्री.

सेवेसी आपाजी राम सहस्त्रबुध्ये कृतानेक सां नमस्कार विज्ञापना. येथील कुशल ताा छ १९ जिल्हेजपावेतों स्वामीचे कृपेकरून सेवकाचें वर्तमान यथास्थित असे विशेष. सौ भागिर्थीबाई साहेब यांची स्वारी कोपरगांवी दाखल जाहालियावर गाडदी यांस निरोप दिल्हा. फर्काबादेहून इंग्रेजाचीं पत्रे घेऊन कासीद आला तो हली गाडदी दिमत सैद आहमद याजबोर स्वामीकडे रवाना केला आहे. पावलियाचे उत्तर देवावे. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*Appaji Ram reports arrival of Bhagirthibai at Kopargam.*

No. 9] *[2-10-1787*

पौ छ २९ जिल्हेज सुा समान.

श्री.

सेवेसी आपाजी राम सहस्त्रबुध्ये कृतानेक सां नमस्कार विज्ञापना. येथील कुशल ताा छ १९ जिल्हेजपावेतो स्वामीचे कृपेकरून सेवकाचें वर्तमान यथास्थित असे विशेष. आज प्रात:काळापासून श्रीगंगेस कपिलाशष्टीमुलें यात्रा दोन च्यार हजार आली. त्यास बेटांत श्रीशुक्रेश्वराचे दर्शनास येण्याविसीं चौकीवरून कारकून बसऊन येऊ दिल्ही. महापर्व याजकरितां दोन प्रहर जागा जागा वाड्या भोवत्या जाजती चौक्या ठेऊन मोकलीक केली होती. श्रीमंत मातुश्री बाईसाहेब आपले धर्मादायाचे नेमणुकेतील रुपये राजश्री अमृतराव याजकडे देऊन बरोबर धर्म दानधर्म करवीत आहेत. वरकड बोलणे नेहमी वारभाईसिवाय भाषण नाहीं. भविषोत्तर पुराण श्रवण करीत आहेत. त्यांत नाना प्रकारची व्रते निघतात. त्याचा उपक्रम करावयाविसीं करीत आहेत. नेमणुकी धर्मादाय जेथील ज्या व्रतास आहे त्यांत कमी जाजती करून कांही कसर काढून दुसरं व्रत नवें करावें. राजश्री अमृतराव याजकडे आपले नेमणुकीपैकीं च्यार रुपये देत असतात. सारांश श्रीमंत रा॥ बाजीराव याचे बरोबर कांहीं जाजतीच असावे असा मानस. श्री सौ भागिर्थीबाई याजसमागमे आजी व धोंडभट भागवत याचे चुलत बंधु वैज्यनाथभट व येक कारकून ब्राम्हणसुधां वाड्यांत राहिली आहेत. च्यार दिवस गंगेस उतार जाहलियापासून मातुश्री श्रीकचेश्वरी देवदर्शनास जात येत आहेत. सायंकाळी नित्य श्रीशुक्रेश्वरी नाटकशाळा आणून गावीत आहेत. देवाची पूजा व आरती करून एक घटका रात्रीस

वाड्यांत जातात याप्रमाणें चालत आहे. सवासणी बायका कोपरगांवच्या वगैरे मिळोन नित्य एकदोन, सिवाये व्रत वगैरे उगेच नाव सांगोन दहापांच दोनच्यार दिवसीं भोज्यनास आणवीत आहेत. नेमणुकेसिवाये खर्च लागतो याचा तपसीलवार राजश्री गोविंदपंत गोडबोले लिहितच असतील. चौकी पाहारे याचे पुर्ववत प्रमाणे आहे. वरकंड बोलण्यांतील भाव नाना प्रकारचे बोलत असावे. जसा प्रसंग तैसे भाशण करीत आहेत. बोलण्यास धर कांहीं नाहीं. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Appaji Ram reports extravagant expenses which Anandibai incurs at Kopargam.*

No. 10] [*4-10-1787*

श्री.

यादी कपिलाशष्टी नि॥ धर्मादाय वि॥ मातुश्री आनंदीबाई यांजकडें सु॥ समान समानीन मयां व अलफ.

छ २० जिल्हेज शष्टीचे दिवसी गोप्रदाने जाली, त्यास खर्च रु. २९॥. वि। राजश्री आमृतराव देणे. रघुनाथ भट वैशंपायन.

९	दक्षणा पुतल्या, तार्टे २ दर ४॥
१	आलंकारार्थ,
·॥·	गाईस दक्षणा,
३८–	सोने श्रृंगे वजन, ८२। दर १६।
४	खूर रुप्याचे,
१।	धोत्रजोडा १,
८≡	वाटी कांशाची,
·॥·	आर्घ्यास,
८=	पाठ ताब्याची,
·।·	घाट पितली १,
८॥	गाईची किंमत,
१८=	खारवा गाईस १,
२९॥	

छ २१ जिल्हेज

५३ गोप्रदान देणे देवभट सोहनी वि॥ बाई

९८=	पुतल्या ताटे २ तील पात्रास व घृतपात्रास
१५	मोहर नाणे १ दक्षणा
४	तीलपात्र व घृतपात्रास दक्षणा
१	आलंकारार्थ
५	भूमिनिष्क्रय
·॥·	आरघ्यास
१	गाईस दक्षणा
·॥·	ब्राह्मणास दक्षणा
·॥·	पाद्यास,
३८–	सोने श्रृंगे वजन ८=। दर १६।
४	खूर रुप्याचे
१।	धोत्रजोडा १
८≡	वाटी काशाची

२८।।।= वि।। बाई देणे गोपालभट घाणेकर

४।। दक्षणा पुतली तांट
२ तीलपात्रास दक्षणा
२ घृतपात्रास दक्षणा
१ आलंकारार्थ
।।। आर्घ्यास
।।। गाईस दक्षणा
।।। ब्राह्मणास दक्षणा
।।। पाद्यास
३८– सोने श्रृंगे वजन ८=। दर १६।
४ खूर रुप्याचे
१। धोत्रजोडा १
८≡ वाटी कांशाची
८= पाठ ताब्याची
।। घाट पितली
८ गाईची किंमत
।= वाटी पितली
८= तबकडी तांबे

२८।।।=

५८।=

२४६।≡।। छ २१ रोज

३०४।।।–।।

पैकी नेमणूक रु।। ११०
बाकी जाजती रु।। १९४।।।–।।

८= पाठ ताब्याची
८= तबकडी तांबे
।। घाट पितली
।= वाटी पितली
७ गाईची किमत

५३

२९ वि।। राजश्री आमृतरावयाणी गोप्रदान देणे रंगभट आग्निहोत्री पुणतांबकर

४।। पुतली ताट १
।।। आरघ्यास
।।। गाईस दक्षणा
२ तीलपात्र व घृतपात्रास दक्षणा
१ आलंकारार्थ

८।।

३८– सोने श्रृंगे वजन ८२। दर १६।
४ खूर रुप्याचे
१। धोत्रजोडा १
८= पाठ ताब्याची
।। वाटी काशाची
।= वाटी पितली
८= तबकडी तांबे
।– घाट पितली
७ गाईची किंमत

२९

२ पु॥ याद कपिलाशष्टी नि॥ धर्मादाय वि॥ मातुश्री आनंदीबाई याजकडील सु॥ समान समानीन मयां व अलफ. नेमणुकें प्रा खर्च

जाला	रुा	छ २१ जिल्हेज
८९	राजश्री बाजीराव यांजकडे	
१९	राजश्री आमृतराव यांजकडे	
२०	राजश्री चिमाजी आपा	
४०	सौ भागिर्थीबाई	
१९	सौ सावित्रीबाई	
१७०		

३२ व्यतिपातानि॥ देणे माहादेवभट वोझे, बाईचे माहेरचे वस्ती पुणें यांस दिल्हा.

४९ देणे, सुभाभट तेलंग याणी शुक्रेश्वरास प्रदक्षणा घातल्या ११००० व बाईनी विष्णुसहश्रनाम आवर्ती सहश्र व सिवसहश्रनाम सहश्रआवर्ती व तत्प्रीत्यर्थ गोप्रदान यो दक्षणा दिल्ही ते.

९११≡॥ कपिलाषष्टीचे व्रत बाईनी व आमृतराव याणी केलें त्यास खर्च रु॥

४३॥। सोने सूर्यप्रतिमा २ यो वजन २॥= दर १६।.

९८= कित्ता प्रतिमा लाहान सूर्याच्या ३ वजन ·।·॥ दर १६।.

४ प्रतिमा रुपे २ रुपे भार

१॥ प्रथम पूजेस तीन दिवस दक्षणा दर ·॥·

४ पीठदान आमृतराव याकडील

४ होमास ब्राह्मण आा ८ दर ·॥·

१५ प्रतिमा दान दिल्ही त्यास दक्षणा
४ ऋत्विज शंकरभट वेलणकर
१॥ आग्नीस दक्षणा दर ·॥·
६॥—॥ देवास दोन वेल पूजेस दक्षणा
३ वि॥ बाई
२ वि। खासा
१ वि॥ आमृतराव
·॥· वि॥ सावित्रीबाई
८—॥ किता

६॥—॥
२ पीठदान बाजीराव याजकडील

९१।≡॥

२४६।≡॥

¶*This list of Anandibai's charities on the Kapila-Shasthi day will be read with interest by those who care to know the religious observances of those days.*

No. 11] [*8-10-1787*

पैा छ १ माहरम मु॥ समान.

श्री.

सेवेसी गोविंद कृष्ण गोडबोले कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. येथील वर्तमान ता छ २९ जिल्हेजपावेतो क्षेम असे विशेष. कपिलाशष्टीनिमित्य धर्मादायास तीनसे दाहा रुपयांची नेमणूक करून पाठविली. याजवर श्रीमंत मातुश्रीबाईसाहेब यानी आपले आठशा रुपयापैकी दोनसे रु॥ खर्च केले. त्यांची याद पाठविली आहे. येथे किरकोल अधिक उणे कर्तव्य ते करावे लागते. ते करून जाता काही करावे न करावे यैसे म्हणावे लागते. थोड्याचाहि विशय, परतु समजोन केले पाहिजे. त्यांत येकादी गोष्ट थोड्याचीच परतु विचारून करतां विलंब लागला अथवा काही जाबसाल पडला मणजे तेथे धनीपणाचे बोलणे निघोन

कोणकोणते वर्णोच्यार ते काय ल्याहावे. दोनी लक्षे तीव्रद्रिष्टीर्चा; त्यांत निमित्य मात्र द्रिष्टीस पडले असतां क्षमा येकीकडूनहि व्हावयाची नाही. दोनी मर्ज्या संपादून आपल्यास चांगले लौकीक सांभालणे. इतकी कारणे सांभालणे तो ईस्वर आहे. विशेष पाहाता काही अवघड दिसत नाही. स्वामींचे आज्ञेकरून सर्व निर्वाह होत आहे. वो राजश्री लक्ष्मणभट उपाध्ये याणी मजला पत्र पाठविले आहे की, श्रीमंत मातुश्रींच्या बहिणी अथवा कोणी भेटावयास बोलावणे. याविसीं आज्ञा जाल्यास बलावीत जावी. यास्तव स्वामीस विनंतीपत्र लि|| आहे. जसे उपाध्ये याजवळ बोलणे जाले असेल ते आज्ञा जाली, म्हणजे त्याप्रमाणें करतां येईल. हली उपाध्ये यास बाई साहेबानीं पत्र पाठविले आहे, त्याची नक्कल पाठविली आहे, त्यावरून ध्यानास येईल. श्रीमंत राजश्री बाबासाहेब याचे धार्य[1] चालते करावयाविसीं लेहून पाठऊन उत्तर आणावे म्हणून बाई साहे(बा) ची आज्ञा जाली. याचे उत्तर येईल त्याप्रमाणें विनंती करीन. शहराहून ऐवज खर्चास देविला तो लौकर पावला नाहीं म्हणून पंचवीस हजार रुपयांच्या हुंड्या पाठविल्या त्या पावल्या. ऐवज पावल्यावर पावती लिहून येईल. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Letter from Govind Krishna to Nana Fadnis requesting orders on certain expenses of Anandibai.*

No. 12] [*9-10-1787*

पैा छ १ मोहरम सुा समान.

श्री.

सेवेसी कृष्णाजी जनार्दन कृतानेक सिरसां नमस्कार विज्ञापना. ताा. २६ जिल्हेजपर्यंत मुकाम कोपरगांव येथें आसें विशेष. श्रीमंत मातुश्री आनंदीबाई यांचे बोलण्याचे भाव व दिनचर्येंचें वर्तमान बितपसील.

छ २७ जिलकाद सोमवार

१ त्रितीय प्रहरीं स्वारी बाजीराव व अमृतराव कचेश्वरास देवदर्शनास गेले होते.

छ २८ जिलकाद दोन प्रहरीं अस्पर्श जाली. त्रितीय प्रहरीं वाड्यांतील बागांत बसली होती, आणि बोलिली कीं श्री कचेश्वरीं बाग कराव-

---

१ धार्य म्हणजे काय ? अग्निहोत्रापैकीं कांहीं भाग कीं काय ?.

१ सायंकाळीं शुक्रेश्वरास अग्निहोत्री यांजकडे बाई गेली होती. येथें आमच्या बंदोबस्तामुळें कोणी येत नाहीं. इतके मात्र आम्ही केले असें बोलिली.

—

२

छ २९ जिलकाद. अस्पर्शपणामध्यें वेळ जात नाहीं, म्हणोन प्रात: काळीं बागांत गेली होती. कलम १

छ १ जिल्हेज.

१ हरतालिकेचे उद्यापन सावित्रीबाई यांणी केले.

१ बाईनीं हरतालिकाव्रत नूतन निघाले ते केले.

—

२

छ ३ जिल्हेज.

१ श्रीरामचंद्रानें अवतार धरिला परंतु कर्म संनिधच होतें. रावणादिकाच्या पीडा जाल्या परंतु शेवटीं रामचंद्र याणे भूभार काढिला. तस्मात त्याची सता हेंच खरें.

१ व्रतें वैकल्यें करावी. हेच दिवस आहेत. कोठे लढाई व कामकाज किंवा राज्याची काळजी किमपि कारभारी याणी आम्हांस ठेविली नाहीं. आमचे सुखावर आहेत.

१ श्रीगणेशचतुर्थी नि॥ प्रतिवर्षी अमृतराव श्रावणशुध चतुर्थीपासून नक्त करून पंक्तीस ब्राम्हण. यास जागा चांगली आहे. आम्हा जवळ साहित्य आहे, परंतु धनीपणा मात्र नाहीं यामुळें कसें होतें असें बोलणे जालें.

छ ३० जिलकाद.

१ बाई प्रात:काळीं बागांत गेली होती.

१ श्रावण मासची दक्षणा मोघम ऐवज पाठऊन येथें वाटवावे ते नाहीं. पाणके इत्यादिक नावनिसी होऊन आंख घालून पाठवितात यांत विशेष काय ?

—

२

छ २ जिल्हेज गणेश चतुर्थी

१ श्रीगणेशस्थापन प्रहर दिवसास जालें.

१ दोन प्रहरी बाई दर्शनास आली होती आणि बोलिली कीं प्रतिवर्षी नवी तऱ्हा असावी तें नाहीं.

१ भागिर्थीबाई ताईसाहेब येतात म्हणून ऐकिले, परंतु येथून थोडी माणूस गेली नाही. तेव्हां तेथे तरी कसी मिळतील. येथून जातील तेव्हां येतील.

छ ४ जिल्हेज. हरतालिकेनिमित्य वाड्यांत हळदकूंकूं जाले. कोपरगांवच्या वगैरे बायका आल्या होत्या. कलम १

छ ९ जिल्हेज. चिमाजीआपा दैव-
वान म्हणून अगोधरच साहेब कैलास-
वासी आणि आम्ही पेचांत.

"अपुरें"

(यापुढें आणखी तीन बंद आहेत पण मिळाले नाहींत)

¶*A week's programme of Anandibai's life is reported in this paper to Poona. It shews how the lady bewailed her sad lot.*

No. 13] *[10-10-1787*

पौ छ १ मोहरम सु॥ समान.

श्री.

सेवेसी आपाजी राम सहस्त्रबुध्ये कृतानेक सां नमस्कार विज्ञापना. येथील कुशल ता छ २७ जिल्हेजपावेतो स्वामीचे कृपेकरून सेवकाचे वर्तमान यथास्थित असे विशेष. स्वामींनी छ १७ जिल्हेजचे पत्र पाठविले तें छ २९ रोजी पावलें. हिकडील वर्तमान श्रीमंत राजश्री बाजीराव साहेब याची स्वारी गंगा प्रदक्षणा व सितावखेडे व श्रीकचेश्वरी जांत येत आहे. पंधरा दिवसा आलिकडे राजश्री अमृतराव स्वारीसमागमें वगैरे जवळ असलियावर बाबासाहेब चवरी आपणावर वारू देत नाही. याचे कारण पुसिले कीं, हे नवेच काय ? तेव्हां आज्ञा जाहली कीं वडिलाची मर्जी अमृतराव समागमें असतां एकंदर खिजमतगार याणी चवरी बाो घेऊन येऊ नये. याप्रमाणें ताकीद करीत आहेत. घेऊन गेलिया रागे येतात. श्रीमंत मातुश्रीबाईनी उपाध्ये यास पत्र लिहून पाठविले आहे. त्याची नकल स्वामीकडे राजश्री गोविंदपंत गोडबोले याणी करून पाठविली आहे; त्यावरून सेवेसी ध्यानास येईल. इकडे पर्ज्यन्य नाहीं. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Letter of Appaji Ram to Nana Fadnis informing him that Bajirao does not allow the* Chowri *to be waved over him when he is in company with his elder brother Amritrao.*

No. 14] [13-10-1787

पौ छ १ मोहरम

सु॥ समान.

श्री.

सेवेसी केसो माहादेव कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. ता। छ २६ जिल्हेज पावेतो स्वामीचे कृपेकरून सेवकाचे वर्तमान येथास्थित असे विशेष. स्वामीनी आज्ञापत्र पाठविले ते पावले. पत्री आज्ञा की लाखोटे इंग्रजाचे वकिलाचे होते ते वकिलाकडे दिल्हे व जासूद येथे आल्यावर त्याजकडेस जाईल म्हणोन व नगर-देवलेकर पवार याची समजुत पडत आहे; मागाहून लिहून पाठऊ; त्याप्रो करावे म्हणोन आज्ञा. त्यास राजश्री रामाजीपंत नगरदेवले येथे गेले आहेत. त्याचे पत्र आले की गाडदी वाड्यात होते ते बाहेर काढून दिल्हे आहेत. इतके वर्तमान त्याणी लि॥ होते त्यावरून सेवेसी लि॥ आहे. पुढे तिकडील वर्तमान येईल त्याप्रमाणे सेवेसी लिहीन. येथील वर्तमान श्रीमंताची प्रकृत येथास्थित आहे व मातुश्री बाईची मर्जी बरीच आहे. वरकड वर्तमान राजश्री गोविंदपंतानी लि॥ आहे त्यावरून कलले. लागवडाविसी विनंती वारंवार लिहितो; त्यास घोड्यास सरंजाम केला पाहिजे याविसी जसी आज्ञा येईल त्याप्रो करीन. का। लासूर मोगलाकडेस होते. तेथील जाहागीरदारहि पेशजीच मेला हाली त्याची श्री होती तेहि मृत्य पावली आहे. त्यास सरकारात गाव तूर्त ठेवावयाचा असिलियासी आज्ञा आली तरी तेथील बंदोबस्त करीन. त्याजला आता नव्या सनदा आल्या पाहिजेत, याजकारिता आज्ञा आलियासी बंदोबस्त करितो. का। धदरफाल येथील मामलत येक ग्रहस्त सालमजकुरापासून मक्तेयाने करीत आहे. सात साडे सात परियेत मागील जमा असेल त्याजवर चढ देत आहे. स्वामीची आज्ञा जसी येईल त्याप्रमाणे करीन. त्यास आज्ञा जाहाली पाहिजे. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*Keso Mahadeo reports to Nana among other matters the well-being of Anandibai and her sons.*

No. 15] [16-10-1787

पौ छ ७ मोहरम

सु॥ समान.

श्री.

सेवेसी विज्ञापना. ता। छ ४ मोहरम पावेतो क्षेम असे विशेष. कोपरगावी दसरियास पोशाख वगैरे सरदार लोक यास वस्त्रे पाठवावयाची त्याची रवानगी

जाली असेल. वरकड किरकोल कारखानेयांत सामान सरंजाम नवा करावयाचा तो सालाबादप्रो करितो. श्रीमंत राजश्री बाबासाहेब यांस पालखी साल गु॥ पाठविली. ते समई श्रीमंत राजश्री अमृतराव यास पाठविली नाही, यास्तव बाबासाहेब पालखीत बसत नवते. साल मजकुरी पालख्या खाशास पाठवावयाच्या असतील त्या पाठविल्या पाहिजेत. बहूत काय लिहावे ? सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Nana Fadnis is asked from Kopargaum to send clothes for the Dassera and the Palkhis for Bajirao and Amritrao.*

No. 16] [*16-10-1787*

पौ छ ७ मोहरम

सु॥ समान.

श्री.

सेवेसी गोविंद कृष्ण गोडबोले कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. येथील वर्तमान ताा छ ४ मोहरम पावेतो क्षेम असे विशेष. श्रीमंत मातुश्री आनंदीबाईसाहेब याणी पत्रे ल्याहावयासी आज्ञा केली. कलमे—

भारताचे पुस्तक सरकारचे मागे बहूत प्रती मेलऊन शोधून ठीक केले आहे, ते श्रवणास पाहिजे. येथे पुस्तक आहे तो त्रुटित ग्रंथ आहे. यास्तव ते पुस्तक आल्याने श्रवणाचे उपयोगी पडून दुसरी प्रत त्याजवरून नीट करावयास येईल. यास्तव लेहून ते पुस्तक आणवावे. कलम १

श्रीमंत राजश्री अमृतराव कार्तिके पूर्णिमेस वृषोत्सर्ग करणार. त्यास सर

१ गोऱ्हा नीलवर्ण

४ कालवडी

५

पाच सोडून द्यावी. यास खर्च त्याचा यैवज आठसे येकण्याणव रुो राा कृष्णाजी जनार्दन याजवल आहे, त्यापैकी देणार. पितृकामार्थ करावयाचा. कलम.

दोन कलमे लि॥ आहेत. याची आज्ञा होईल त्याप्रो विनंती करीन. याखेरीज रामचंद्र गणेश याचे पुस्तक मोक्षधर्माचे मागे श्रीमंत कैलासवासी दादासाहेब याणी आणिले होते ते तसेच राहिले. यास्तव हालीं त्याचे घरी

पावते करावयासाठी उपाध्याकडे पाठविले आहे. त्याणी पावते करावे, व भागवताचे पारायण करावयाचे यास्तव उपाध्याचे पुस्तक आणविले आहे. त्या पत्राची नकल पाठविली आहे, पावेल. बहुत काय लिहावे ? सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶Govind Krishna to Nana Fadnis with reference to Anandibai asking for a copy of the Mahabharat containing the revised and corrected text after consulting many copies.

No. 17] [*16-10-1787*

पो छ ७ मोहरम सु॥ समान.

श्री

सेवेसी केसो महादेव कृतानेक सां नमस्कार विज्ञापना. ता छ ४ मोहरम-परियेत वर्तमान यथास्थित असे विशेष. वाघोलीकर जाधव संभाजी जाधव व मलोजी जाधव हे उभयेता पेशजी निरोप घेऊन गेले त्याजला एक वर्ष जाहले. स्वामीस विनंतीहि पेशजी लिहिले. त्यास आज्ञा जाहली कीं ताकीद जाहली आहे, परंतु अद्यापपरियेत येत नाहीं. येथे नेमणुक दीडसे असावे. त्यास येथें चाकरीस पाऊणसे पर्यंत आहेत. येथें आम्ही बहुत ताकीद त्याचे कारभारी यासी ताकीद करितों, परंतु ऐकत नाहीं. स्वामीसहि विनंती लिहितों. पतकात खासे असावे ते काहीच नाहीं. सेखमिराहि जाऊन तेथे राहिले आहेत. त्याचे चुलते आले परंतु खाशांनी असावें ते नाहींत. त्यास स्वामी मागती रागे भरतील कीं लिहिले कां नाहीं ? यास येथील चाकरी नाजूक आहे. परंतु आपले लोकात सरदारांनी असावें ते कोणी रहात नाहीं. येविसी विनंती स्वामीस केली असे. आज्ञा येईल त्याप्रो वर्तणूक करीन. रा बलवंतराव कदमहि नाहींत. त्याजला-हि स्वामीनीं लाऊन देवावयाची आज्ञा केली पाहिजे. बहुत काय लिहिणे ? सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶Keso Mahadeo informs Nana Fadnis that Sambhaji and Maloji Jadhao of Wagholi (belonging to Pilaji Jadhao's family), Shekmira and Balavantrao Kadam, who have been posted with their following to keep guard at Kopargam, do not attend personally. They should be ordered to be there in person.

No. 18] *[16-10-1787*

पौ छ ७ मोहरम सु॥ समान.

श्री

सेवेसी केसो माहादेव कृतानेक सां नमस्कार विज्ञापना. ताा छ ४ मोहरम पावेतो स्वामीचे कृपेकरून सेवकाचे वर्तमान यथास्थित असे विशेष. स्वामीकडून अज्ञापत्र यत नाही, त्यास आज्ञा जाहाली पाहिजे. यानंतर हिंकडील वर्तमान तर श्रीमत मातुश्री बाईनी आज्ञा केली की माहाभारथाची पोथी व भागवताची पोथी येथे आहे. परंतु संकलीत आहे. त्यास सरकारात ग्रंथ दोनी आहेत. त्यास येविसीचें आपणास ल्याहावयास सागितले आहे. त्यावरून विनंती लि॥ आहे. तर पुस्तके आलियास येथे प्रत करून घेऊन मागती पाठऊन देऊ म्हणौन सागितले. व राजश्री अमृतराव याजकडून कार्तिक मासी वसोछार्ग[१] करावयाचे बाईचे मानस आहे, व आपणास ल्याहावयास सागितले आहे, त्यावरून सेवेसी विनंती लिहिली आहे. जसी आज्ञा येईल त्याप्रो विनंती करीन. लागवडाविसी विनतीपत्रे पाठवीत गेलो. परतु अज्ञा येत नाही. त्यास येविसीची अज्ञा व बारगिराचे कापडाविसीचीहि अज्ञा जाहाली पाहिजे. दसरा सनिध आला आहे. सेवेसी श्रृत होय. बहूत काय ल्याहावे हे विज्ञापना.

¶*Keso Mahadeo to Nana Fadnis asking him to send the Mahabharat and the Bhagawat for the use of Anandibai.*

No. 19] *[16-10-1787*

पौ छ ७ मोहरम सुा समान

श्री.

शेवेसी कृष्णाजी जनार्दन कृतानेक सिरसाष्टांग नमस्कार विज्ञापना. ताा छ ४ मोहरमपर्यंत मुाा कोपरगांव येथें आसें विशेष. दिनचर्येचें वर्तमान व श्रीमंत मातुश्री आनंदीबाई यांचे बोलण्यातील भाव.

छ २७ जिल्हेज. येथें आम्हीं काम सांगतो त्याविसी पुण्यास लिहिले म्हणजे हिसका पडतो, आणि येथेहि येकादी गोष्ट केली तर पुणेकर

छ १ मोहरम. पूर्वी लग्नामध्ये पंचवटीहून श्रीमंत मातुश्रीबाईकडून मनुबाई म्हातारी आली होती. मागती हाली आली. मुलाबालाचा समाचार

१ गाईचें वासरूं देवास सोडणें; किंवा दान देणें.

काहींच म्हणत नाही. तस्मांत यांचे संगनमत्त आहे आसें दिसतें. च्यार वर्षें अनुभव आला, आणि आजूनहि समजेना, मग काय ? आसें बोलिली.

कलम १

छ २८ जिल्हेज. गोविंद कृष्ण व आपाजी राम वगैरे जवलचें ब्राह्मण मंडली चांगले ग्रहस्त आहेत. परंतु आमचे दैव वाईट म्हणोन आमचे त्यांस व त्यांचे आम्हास चांगले वाटत नाही. तस्मांत दैव योग हेच खरें.

कलम १

मनूबाईस जाते समई निरोप सांगितला.

१ सर्व खुशाल आहों. तुमच्या व कारभान्याच्या अनुमताचे बंदोबस्तानें खुशाल आहों. वरकड इतर गोष्टी सांगू नये.

१ चासेस सांगावें कीं ताईसाहेबाचा वंश मात्र खुशाल आहे. तुमच्या डोल्या देखन पराक्रमी होतील कीं काय कलेना.

१ पुण्यात गेल्यावर गोदूबाईस नमस्कार सांगावा. रामचंद्रपंत गोरे जुने आहेत. त्यास मात्र (न ?) नमस्कार सांगावा. वरकड नवे आहेत.

पाहून येणे म्हणोन बाईचे आज्ञेने आली होती. तीसी बोलणें—

१ कसेहि जाले तरी तिकडील माणूस भेटले म्हणजे समाचार पुसावा असे वाटते. त्यांसहि असेच वाटते. सारांश ममता निराळीच आसते.

१ येथे आम्ही बहूत संकटांत आहे. कारभारी चैन पडो देत नाहीं. साहेबांच्या आस्ती देखिल श्रीकासीस पाठवित नाहीं. मेल्यावर दावा उगवितात. आम्ही तर जिवंत आहो मग चैन कसे पडों देतील. आस्तीविसी पुण्यास लि॥. पाठऊ म्हणतात. परंतु पाठवित नाही. याप्रो वर्तमान आहे.

१ बाई माहायात्रेस किमर्थ जात नाही. गनिमाई म्हणावी तर पूर्वी ताईसाहेब गेली तेव्हां धनी होते. आतां कोण आहे. त्यापक्षी जाणें कठीण.

१ त्रितीय प्रहरी बाजीराव व आमृतराव याची स्वारी कोपरगांवाकडून संवछरास गेली. नंतर आली.

३

¶*This is an account of Anandibai's utterances during some four days. It contains many important hits and bits.*

No. 20] [17-10-1787

श्री.

पौ छ १२ मोहरम समान समानीन आस्वीन मास.

सेवेसी गोविंद कृष्ण गोडबोले कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. येथील वर्तमान ताा छ ९ मोहरमपावेतो क्षेम असे विशेष. श्रीमंत मातुश्री आनंदीबाई-साहेब याचे दागिने जवाहीरखान्याकडील जडाव सुधा सौ सावित्रीबाई याजकडे वहिवाटीस पडले आहेत. परतु त्या दागिन्यातील दागिने आज पावेतो जुने मोडून नवे केले, येसे जाले नाहीं. हाली काही किरकोल यकादा दागिना मोडून दुसरा करावा अथवा थोरला मोडून दुसरे दागिने करावे अथवा देवाच्या मुहूर्ती आहेत त्यांस लहान मोठे दागिने करून देवावर घालवे. .यास्तव दागिने-याची घालमेल रासकर्दनोची[1] होईल येविसी आज्ञा जाली पाहिजे. जसी आज्ञा होईल येईल त्या प्रो विनंती करावी लागेल. मजला बाईसाहेबानी दागिन्या-विसी विचारीले. ते समई पुणियास लेहून पाठवितो. तेथून लिहिले येईल त्याप्रो करावयास येईल म्हणून विनंती केली; ते समई मर्जीस ठीक पडिले नाही. लिा अन्वय ध्यानास आणून आज्ञा कर्तव्य ते केली पाहिजे. बहुत काय लिहावे सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना. श्रीमंत राजश्री बाबासाहिबाचे लग्नांत चिमाजीआपा साहेब यास दागिने तेंथील जवाहिर पाहून करावे म्हणून बालाजीपंतास आज्ञा जाली. त्यावरून येक दोन दागिने मोडून सिरपेच तुरा कंठी चौकडा केला आहे. त्याविसी बाईसाहेब आज्ञा करितात. ते दागिने पहिले जसे होते तसे करावे. तेव्हां मी विनंती केली कीं पुणियाहून लिहून आले त्या प्रो दागिने केले आहेत. हाली आपली आज्ञा पहिले प्रो जिकडील तिकडे दागिने करून द्यावयाविसीची होत्ये. त्यास हे पुणियास लिहिल्याखेरीज करता नये. त्याजवर ते गोष्ट तसीच राहिली आहे. फिरोन विचारितील तेव्हा उतर जाले पाहिजे. याविसी आज्ञा-कर्तव्य ते करावी. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Godbole to Nana Fadnis communicating the Bai's desire to have the old ornaments renewed.*

No. 21] [19-10-1787

पो छ ७ मोहरम सुाा समान.

श्री.

सेवेसी आपाजी राम सहस्त्रबुध्ये कृतानेक सां नमस्कार विज्ञापना. येथील कुशल ताा छ ३ मोहरमपावेतो स्वामींचे कृपेकरून सेवकाचे वर्तमान यथास्थित

---

१ बनावट हिशेब.

असे विशेष. साल ग्रा लग्नाचे समई मनुबाई गंगापुराहुन वाड्यात आली होती. तीस लुगडे वगेरे देऊन रवानगी केली असता मधेच तट्टु माणसे माघारी लाविली. याजवर स्वामीनी लिा की बारकाईने शोध करून लिा पाठवणें. त्यास हाली छ २९ जिल्हेजी तीच मनुबाई गंगापुराहून कचेश्वरी आली. तेथून श्रीशुक्रेश्वरी दर्शन घेऊन राजश्री गोविंदपंत गोडबोले याचे घरीं गेली. आणि सागो लागली की मी श्रीमंत मातोश्री बाईसाहेबापासून देवास आल्ये. आज्ञा जाहली आहे की तेथे जात्येस तरी वाड्यांत जाऊन आनंदीबाईस भेटोन मुले पाहून येणे. त्यावरुन वाड्यात जाऊ दिल्ही नाही. राहून घेऊन राजश्री गोविंदपंत याणी पत्र गंगापुरास कारभारी यास हे वर्तमान लिहून पाठविले. तेथून उतर आले की मनुबाई येथून जातेसमई पुसोन गेली. सहजात देवास जासील. वाड्यात जाऊ दिल्हिया भेटोन येणे व बाई गेलीच आहे तरी बंदोबस्ताने भेट करून देणे. यैसे पत्र गंगापुराहूनं राजश्री गोविंदपंत यास आलें. त्या पत्रावर 'बालकृष्ण प्रभु जयति' असे आहे. त्याजवरून मनुबाईस येथे समागमे कारकून देऊन वाड्यांत श्रीमंत मातुश्री बाईची भेट करोन दिल्ही. बोलणे काही विशेष नाही. म्हातारी यात्रेस जाणार, याचे उद्योगे काही मागावयास आली असे बोलणे बोलत होती. फिरोन वाड्यात जाऊ दिल्ही नाही. स्वामींचे आज्ञेसिवाये वाड्यात जाऊ देणार नव्हतो परंतु येथे राजश्री केसोपंत व गोविंदपंत याचे विचारे जाहले, त्याप्रमाणे केले. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Appaji Ram to Nana Fadnis, informing the latter of the visit of Manubai with Anandibai. The letter shews that nobody was allowed to visit Anandibai without written orders from Nana himself.*

No. 22] *[29-10-1787*

पौ छ ७ माहे सफर

मुा समान.

श्री.

सेवेसी केसो माहादेव कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. ताा छ १७ मोहरमपावेतो स्वामीचे कृपे करून सेवकाचे वर्तमान यथास्थित असे विशेष. इग्रजाकडील जासुदाची जबानी पुण्यात लेहून घेतली. त्या जबानीत त्याणे लिहून दिल्हे की फरकाबादेहून येते समई बऱ्हाणपुरास गेलो. तेथे चउऱ्यावर कागदाची चौकसी केली. त्यास कागद वाचले नाही, म्हणून बऱ्हाणपुराहून तुम्हाकडे जासुद देऊन पाठविले. कोपरगावास दाखल जाहाल्यावर तेथे मजपासून कागद

घेऊन स्वाराबरोबर रवाना केले. मागाहून मजबरोबर पंच्यवीस गाडदी देऊन मुसक्या बांधोन पुणियास पाठविले. असे त्याणे लिहून दिल्हे. त्यावरून स्वामीनी शब्द लाऊन लिहिले की प्रथम कोपरगावी जबानी लिहून घेतली ते व पत्र पाठविले, की हा फक्त अजुरदार आहे; यास सोडावयाची आज्ञा जाहाली पाहिजे. ऐशास कोपरगावचे जबानीत व हालीचे जबानीत अंतर दिसोन आलें. तेथे चौकसी करीत असता कासिदास बराणपुराहून तुम्हाकडे पाठविला असता तुम्ही लिहिता की चौकीवर सापडला. आणि चौकसी न करिता मुसक्या बांधोन पाठविलात. याच्या मुसक्या बांधावयाचे प्रयोज्यन काय होते? इंग्रजाचा व सरकारचा श्नेह. त्याजकडील वकील येथे आहे. त्यास या गोष्टीवरून फार वाईट वाटलें त्याचे शातवन अद्यापि होत नाही. कासिदाची जबानी येथे लिहून घेतली. त्याची नकल पाठविली आहे. पाहोन उत्तर पाठवणे म्हणोन आज्ञा; त्यास कासिदाने पुण्यात जबानी लिहून दिल्ही. त्यांत सदर्भ दुसराच लिहून दिल्हा. त्याजवरून स्वामीस संशय वाटला, म्हणोन शब्द लाऊन लिहिलें. परंतु बराणपुराहून कासिदास कोपरगावी पाठवावे ऐसा तेथे कोण आहे? त्याचे पत्र अथवा माणुस या कासिदास घेऊन आला असता, तर जसा मागाहून आला तसाच पुढे जाता. कोपरगावाजवलोन माणुस बहुत करून जात नाही. ऐसे असता कोणी गेले तर त्याचा झाडा घ्यावा लागतो. या कासिदाजवल कागद कागद+ असोन नाही बोलला. तेव्हा झाडा घेतला. मग कागद सापडले. त्या समयातच पुण्याकडील बाजार आवंई ऐकिली की इंग्रजाकडील कोर्णी पलोन गेला. काही गलबल जाहाली आहे. त्या कारणास्तव त्याजवलचे कागद घेऊन सरकारात पावते केले. कासिदास लागलाच पाठवावा तर जबानी करिता मागे ठेविला होता. सहजात श्रीमंत सौ भागिर्थीबाई याचे स्वारीपौ गाडदी जावयास निघाले, त्याजबरोबर पाठविला. त्यास या कासिदाच्या मुसक्या बाधावयास सागितल्या नाहीत. हे वाटेतील वर्तमान राजश्री राघोपंत गोडबोले याजकडील कारकून बरोबर होते त्यास ठाऊक असेल. बराणपुराहून आम्हाकडे पाठविल्यावर त्याचे चौकसीचे व झाड्याचे प्रयोज्यनच नाही. गोटगस्तीचे जासुदास आढलला कागदपत्र नाही म्हणून बोलला. झाडा घेतला तेव्हा सापडले म्हणून पुसतपास केली. आणि इग्रजाची आवाई त्याच दिवसी आइकिली, त्यावरून ती पत्रे सरकारात दाखल केली. इतका मजकुर आहे. त्या कासिदाने जबानी पुणेयात लेहुन दिल्हे. बराणपुरासच मुसक्या बांधोन पाठविले, तेव्हा तो काय लिहून देतो आणि पुरसीस काय करावी याचा विचार स्वामीच कर्तव्य तो केला पाहिजे.

\+ ज्यास्त शब्द.

आम्ही आपले तर्फेने येथील चौकसी करावयाची त्या तऱ्हेने केली. परंतु इंग्रजाचे श्नेहामुळे वाकडे पडले असले तर स्वाम धनी आहेत. आम्ही तर सरकार काम साभालावे या बुधीने केले, आणि जाहाला मजकुर सेवेसी लिहिला आहे. याजवर स्वामीचेहि ध्यानात आलेच असेल. बराणपुराहोन त्यास येथे कोण कशासाठी पाठविल? कदाचित तसा पाठविला असता तर आम्ही मुसक्या बांधावयास सांगाव्या त्या कशासाठीं? तशाच तोच जबानी लिहून पुणेयात लिहून देतो, कीं बराणपुरास मुसक्या बांधिल्या तेव्हा खरे लिहितो की लबाडी लिहितो, याविसी सेवकाने काय ल्याहावयाचे आहे? कचा मजकुर ध्यानास आला पाहिजे म्हणोन तपसिले लिहिले आहे. याचा इत्यार्थ तेथे स्वामीजवल ठरोन काय आज्ञा होईल ते वंद्य आहे. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*Keso Mahadeo's report to Nana Fadnis about a British spy being detained under arrest. The affair shews how strictly the premises of Anandibai were watched.*

No. 23] [*31-10-1787*

पौ छ २९ मोहरम सु।। समान.

श्री

सेवेसी कृष्णाजी जनार्दन कृतानेक सिरसाष्टांग नमस्कार विज्ञापना. ताा छ १९ मोहरमपर्यंत मुकाम कोपरगांव येथें आसें विशेष. दिनचर्येचे वर्तमान व श्रीमंत मातुश्री आनंदीबाई यांचे बोलण्यांतील भाव लिहिलें आसेत—

छ ४ मोहरम त्रितीय प्रहरीं वाड्यांत बाजीराव घोडी फेरीत होते.

छ ६ मोहरम.

१ आलिकडे बागाभाईस आम्हाकडील कालजी नाही. दक्षिणेकडील गनीम संभाळिला म्हणजे जालें. बारा वर्षे दोहींकडील वोढ होती. आज तीन वर्षे आम्हाकडील कालजी नाही यामुलें सुखांत आहेत. दुसऱ्याचा दर नाही आसा लक्ष्मीचा महिमा आहे. परंतु कुलीणास आसें करीत नाही.

छ ५ मोहरम. पहिली चाल सुनांचे आईबाप जवळ ठेवावे किंवा साहा महिन्याने भेटावयास आणावे. आलिकडे ममताच नाही यामुलें आसे होतें.

छ ७ मोहरम. वाड्यांतील बागेच्या सोप्यांत सावित्रीबाई भोजनास गेली होती. बाजीराव व भागिर्थीबाई येके जागें भोजनास बसली होती.

छ ८ मोहरम. बाई अस्पर्श जाली. प्रात:काली बागांत गेली होती.

१ पूर्वी हेच आम्हास मानीत होते. आतां त्यांसच मानावें लागतें. तस्मांत काळचर्या निराळीच आहे. कांही ईश्वर पाहात नाही. बरे इच्छा त्याची,

२

छ १० मोहरम.

१ त्रितीय प्रहरी स्वारी आमृतराव व आपासाहेब कोकमठाणास गेले होते.

१ सौ भागिर्थीबाईस किंचित ज्वर आला होता. कधीकधी येतो.

२

छ १९ मोहरम दोन प्रहरी भोजनास स्वारी कोपरगांवी पवाराचे बागात बाजीराव व अमृतराव गेले होते. तेथे आगांतुक वेलेस आला, त्यास भोजनास बोलाविलें. येत्ये समई पाहातां किंचित संशय वाटला म्हणोन निराळे पात्र मांडिलें. पंक्तीस बसविले नाही. भोजन जाल्यावर चौकसी केली तों त्यास शेंडी नव्हती. नंतर मारहाण केली तों कोष्टी आसें ठरले. नंतर—

छ ९ मोहरम. विजयादशमीस सीमाउलंघनास स्वारी पूर्वेकडे गंगा उतरून कोकमठाणचे सिवारांत गेले होते. प्रातः सर्व कारखान्याची पूजने बाजीराव याणी केलीं.

छ १२ मोहरम.

१ त्रितीय प्रहरी बाजीराव व आमृतराव कुंभारीस स्वारी देवदर्शनास गेली होती.

१ धोंड जोसी वाड्यात आश्रित आहेत त्यास बलाऊन जन्मकाळचें नाव नक्षत्र पाहून विचक्षणा होत असते.

२

छ १७ मोहरम इंदुवार.

१ कचेश्वरास देवदर्शनास बाजीराव त्रितिय प्रहरी गेले होते.

१ बाजीराव व आमृतराव संकटचतुर्थी मौनयुक्त करितात.

२

आपणास पत्र लिहिलें तेव्हां बोलिली कीं मागें पत्रें पाठविली त्याची उत्तरेंच आली नाही. परंतु

¶*Details of Anandibai's life at Kopargam reported to Nana.*

No. 24] [8-11-1787

पै छ २७ मोहरम सु|| समान.

श्री.

सेवेसी गोविंद कृष्ण गोडबोले कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. येथील वर्तमान ता। छ १९ मोहरमपावेतो क्षेम असे विशेष. श्रीमंत मातोश्री आनंदीबाई याणी भाऊबिजेकरिता राजश्री नारायणराव वोक यांस व सौ सावित्रीबाई याचे बंधुस वगैरे आणावयास घोडी माणसे पाठवावयास सांगितली त्यावरून पाठविली आहेत. त्याचे नावनिसीची याद आलाहिदा आहे. त्यास आमंत्रण वो। राजश्री उपाध्ये करितील. भाऊबिजेस येथे आले मणजे सालाबाद सि|| प्रो सेले पागोटी द्यावी लागतील. आठ पंधरा दिवस राहावयाचे ते राहून निरोप घेऊन रवाना होतील. बहुत काय लिहावे ? सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Govind Krishna Godbole, looking after the management of Anandibai at Kopargam, informs Nana Fadnis that she had invited Narayanrao Oke (her brother ?) and party for the Bhaubij. (11th November.)*

No. 25] [12-11-1787

पौ छ ११ सफर सुरसन समान.

श्री.

सेवेसी कृष्णाजी जनार्दन कृतानेक सिरसाष्टांग नमस्कार विज्ञापना. तागायत छ १ सफरपर्यंत मुक्काम कोपरगांव येथें आसे विशेष. दिनचर्येचे वर्तमान व श्रीमंत मातुश्री आनंदीबाई यांचे बोलण्यांतील भाव लिहिले आसत.

छ २० मोहरम.

१ तृतीय प्रहरी बाई कचेश्वरास गेली तेव्हां बाजीराव बराबर गेले होते.

१ पर्जन्यादिक दुष्काळ पडतात. त्यास आधिकारी याणी निग्रह केले पाहिजेन. आम्हाकडे आसते तर आम्ही उपापणच केलीच असती, असे बाई बोलली.

२

छ २१ मोहरम.

१ दोन प्रहरी बाई व भागिर्थीबाई व अपासाहेब यांची स्वारी कोकमठाणास देवदर्शनास गेली. नंतर सवछरास गेली होती. मागाहून बाजीराव व आमृतराव यांची स्वारी कोकमठाणास देवदर्शनास गेले होते.

१ इंग्रजानीं श्रीमंताची मर्जी पाहून रथ चार घोडे सुद्धा दिलहा. अशा

छ २२ मोहरम. कामिक अनुष्ठानाचे फल थोडें परंतु काम होणे ते लोकर होते; परंतु परमार्थ नाहीं असे बोलत होती. कलम १

छ २३ मोहरम दोन प्रहरी बाई व बाजीराव व भागिर्थीबाई ऐसी भोजनास बागांत गेली होती, नंतर आली.

छ २६ मोहरम,

१ पूर्वी साहेबानीं अन्ना उपोषणे केली. याविसी माधवरायास दरद आला नाहीं, आपण तसेच जेवित. याची फळे पावले. उपोषणानें एक दिवस वाखा जाला, तेव्हां थोरलीबाई दुरुत्तरे फार बोलली. त्याचे फल जाले. इतके सर्व करावयास सखारामबापू होता. मागें नानासाहेब असतां पांच लक्ष रुपये व तीन किल्ले या करारावर राहावे हे ठीक नव्हे, आसे बापू बोलला. पुढें अधिक जाले. आम्हाविसी निकर्ष करीत परंतु ममता असे. कसेहि जाले तरी घरचे पुरुष होते. आतां यास आमची दरद यावयाची नाहीं, असे बोलत होती.

छ २६ मोहरम,

१ बाबूराव फडणीस व त्रिंबकराव मामा हे सर्व भले नव्हते. कर्मानुरुप फले जाली. वस्ता मेळविल्या होत्या; परंतु सर्व वस्तभाव ठिकाणी राहिलीं, नाश जाला, लुटच जाली, असे बोलत होती.

—

२

छ २९ मोहरम द्वादशी.

१ दोनप्रहरी कोपरगांवचे पवांराचे बागांत भोजनास बाई व अमृतराव गेले होते.

० लंग

—

१

छ २७ मोहरम, दिपवाली प्रात: काली अभ्यंग जाला.

छ २८ मोहरम,

१ तृतीयप्रहरी बाई कोपरगांवास देवदर्शनास गेली, नंतर कचेश्वरास गेली.

१ सायंकाली आतसबाजी वाड्यांत सोडली.

—

२

छ ३० मोहरम,

१ प्रात:काली बाई आस्पर्श जाली.

१ दोन प्रहरी सर्व भाऊबीज मंडली भोजन जाले. नंतर पोषाख सर्वास दिल्हे.

—

२

१ तृतीयप्रहरी बाजीराव कुंभारीस देवदर्शनास स्वारी गेली होती. जाते समई खासी घोडी बोर सालस होती. वाटेनें अकस्मात पडली आणि तेव्हाच मृत्य पावली.

१ इतकी सर्व दौलत गेली तेव्हां काय केले. आपले देखत मेली हे सार्थक आहे, असे बोलली

—
४

बाईस शैत्यानें ज्वर येत असतो. छ २८ मोहरमोपासून.

भाऊबिजेस मंडली आली.

१ नारो रघुनाथ ओक पुण्याहून आले.

२ राघो धोंडदेव भागवत व अंताजी गंगाधर जोशी मामेभाऊ उभयता आले.

१ रामाजीपंत ओक नासिककर याचे पुत्र आले.

२ बालकृष्ण शास्त्री व वेकणभट परांजपे, सावित्रीबाईचे बंधू गंगापुराहून आले.

१ व्यंकट सदाशिव पेंडसे आले आहेत.

१ देवाजी बावाजी मराठे, बाईचे मेहुणे नाशिकाहून मुलाचे लग्नाचे योजनेस आले आहेत.

—
८

सेवेसी श्रुत होय हे विज्ञाप्ति.

¶*Krishnaji Janardan reports Anandibai's doings from Kopargam ; this was the Diwali time for which some guests had come to pay visits.*

No. 26] [*15-2-1788*

पौ छ १६ जावल सु॥ समान.

श्री.

सेवेसी गोविंद कृष्ण गोडबोले कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. येथील वर्तमान ता॥ छ ७ जावल पावेतो क्षेम असे विशेष. राजश्री राघोपंत ठोसर यांस घरी यावयास येक महिन्याचा निरोप दिल्हा असे. तरी तेथील चाकरीचा बदोबस्त राखोन येक महिनाभर निरोप द्यावा म्हणौन आज्ञा केली. यावरून आज्ञेप्रो॥ महिनाभर कामकाज याजकडील संभालावयाची सोय करून निरोप दिल्हा आहे. हे तेथे आलियावर स्वामीची भेटी होईल. याणी फार दिवस चाकरी केली

तैनातेची सोय नाही याजविसी रामचंद्रपंत गोरे[१] याणी विनंती केली आहे. ते सर्व स्वामीचे ध्यानात आहेंच. सरकारची चाकरी करून तैनात नाही, याजमुळे कर्ज फार जाले आहे. याजवर कृपाकरून संसार कालक्षेप चालेल यैसी तैनातिची सोय करून देविली पाहिजे. बहुत काय लिहावे, सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Raghopant Thosar was employed as tutor to Bajirao. The writer Govind Krishna requests Thosar being given the necessary emoluments.*

No. 27] [*17-3-1788*

पौ छ २३ जाखर सु॥ समान.

श्रीशंकर.

श्रीमंत राजश्री नाना याप्रति आश्रित लक्ष्मणभट्ट कर्वे यांचे अनेक अशीर्वाद विनंती. येथील क्षेम फाल्गुन शु॥ १० पर्यंत जाणून आपले कुशल लिहिणे विशेष. राजश्री गोविंदपंत गोडबोले यांस पत्रांत लिहिले कीं नक्षत्रसत्र काम्य होय की नव्हे हे पाहावें त्याजवरून मजजवळ बोलिले. त्यांस प्रात:संध्येपासोन जितके नित्य कर्म गायत्रीजप व शिवकवच आदिकरून यांतहि षडविधी प्रयोग आहेत. परंतु येथील रीत समजोन विनंती लिहिणे ते लिहितो. मी उभयतांचाहि उपाध्या. मला दोन्ही डोळे सारखे हे पूर्वीपासोन श्रीमंत थोरले राव व आपणास ठाऊक आहे. परंतु येथील रीत काम्यकर्म करावयाचे नाहीं. जो संकल्प करणे तो श्रीपरमेश्वरप्रीत्यर्थ करितात. श्रीमंत दादासाहेबापासून ऐशी रीत आहे. हे समजोन कोणतेहि गोष्टी विषईचा चितांत संशय न धरिता लिहित असतो. कदाचित आपणास कोण्ही सांवितला असल्यास मी येथे आहेत व आपण कोण्हे विषयीं संशय धरित नसतील, आणि धरूहि नये. अजुनहि आज्ञा आल्यास नक्षत्रसत्र करून येऊ. मर्जी नसल्यास राहिलेच आहे. सुज्ञाप्रति बहुत काय लिहिणे. कृपावृद्धि करावी हे आशीर्वाद.

¶*Lakshmanbhat Karve, family priest of the Peshwas, informs Nana from Anandibai's quarters that the Nakshatra sacrifice was not being performed with a view to ruin anyone by the influence of astral magic.*

---

१ गोपिकाबाईकडे व्यवस्था पाहणारा कारकून.

No. 28] [26-3-1788

पौ छ २४ जाखर

सु॥ समान.

श्री.

सेवेसी गोविंद कृष्ण गोडबोले कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. येथील वर्तमान ताा छ १७ जाखर पावेतो क्षेम असे विशेष. राजश्री हणमंतराव जाधव यांस पथक सुधा अलिबाहादर यांजबरोबर हिंदुस्थानचे स्वारीस नेमले. त्याचे मोबादला कोपरगावी चाकरीस राजश्री सिवराव पवार याचे पथक दीडसे स्वाराची नेमणु (क) केली. येविसींची पत्रे पवाराकडील कारकुनानी दाखविली. येसियास स्वामींनी जे सरदारास जी चाकरीची आज्ञा केली ते त्यांस करावीच लागेल. परंतु येथील प्रकार मजला चांगला दिसोन येईल तो सेवेसी लिहिला पाहिजे. पवाराचे पथकांत सरदार मुले आहेत ते निकामी असी माझी समज नाही. थोराचे लेक उमेदवार, नावाचे माणुस खरेच. अशावरच स्वामीनी कृपा केली पाहिजे. हेच कामकाजे करून धन्याचे पुन्यप्रतापे यश येत असते. परंतु या प्रांती हे जाधव प्रख्यात; समयांस यांनीं मोगलासी प्रसंग घालोन कामे बज्याऊन आणिली आहेत. निदान सर्वस्व भरीस घालोन सरकार कामांत बाट न ये येसे बशर्त काम करावे, असीच परंपरा आहे. पवाराची नूतन वयस्कता; ते समयास फक्त तरवारेचे काम करितील, परंतु येथे फक्त सिपाईगिरीचे मात्र काम आहे, येसा प्रकार नाही. येक तर इभरत नावाची असते. कार्याकारण मसलत पोख्त केल्या पुरुषार्थीच असते. ही प्रकर्णे ध्यानास आणून मी आपले बुधीने सेवेसी पत्र लि॥ आहे. जाधव येथील उपयोगी. हे येथेच ठेविले पाहिजेत, स्वामीस तेथे ज्यास जसे सुचेल तसी विनंती करितील. यास्तव मी श्रीमंत राजश्री तात्यासहि पत्र लि॥ आहे, त्याचा विचार करावा. धन्यानी जे आज्ञा केली ते सेवकानी आचरावी हा धर्म मजलाहि समजतो. त्यांत कार्याकारण समजेल तोच सेवक खरा. केवळ निरोप्या चाकराचे काम काही चमत्कारीक नाही हे समजतो. यास्तव सुचला मजकूर लि॥ आहे. याजवर मर्जीस येईल ते करावे. माझा आग्र (ह) नाहीं, परंतु बुधीत निश्चय हाच कीं हणमंतराव जाधव व वाघवलीकर जाधव याची येथून घालमेल केल्यास चांगले नाही. या पत्राचे उत्तर येईल तेव्हा हणमंतराव यांस आज्ञेप्रो पत्रे पावतीं करू. तोपर्यंत पत्रे त्यास सरकारची आली ती देत नाही. बहुत काय लिहावे. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Govind Krishna Godbole requests Nana Fadnis to cancel his order of transferring Hanamantrao Jadhao and bringing to Kopargam Shivrao Pawar.*

No. 29] [29-3-1788

पौ छ १ जाखर सु॥ समान.

श्री.

सेवेसी केसो माहादेव कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. ता। छ २० जाखर पावेतो स्वामींचे कृपे करून सेवकाचे वर्तमान यथास्थित असे विशेष. स्वामीकडून अज्ञापत्र येत नाही त्यास आज्ञापत्र पाठवावयास आज्ञा जाहाली पाहिजे. यानंतर राजश्री रामचंद्रपंत सबनिसाकडील कारकून येथे होते ते यका महिन्याचा निरोप घेऊन घरास गेले आहेत. त्यास ताकीद करावी की मागती सत्वर जावे. याप्रा। मारनिल्हेस ताकीद जाहाली पाहिजे व रा। राघोपंत ठोसर हे पुण्यास अज्ञेवरून गेले होते. त्यास दोन महिने जाहाले अद्याप यत नाहीत. त्यास ताकीद होऊन येथे आले पाहिजेत. ते आल्याविना श्रीमंताचे लिहिणे होत नाही. मारनिल्हेचा दाब चांगला होता यास्तव सेवेसी विनंती लिहिली आहे. प्रज्यनकाली रावट्या जिन सामानाकरिता सालास नव्या कराव्या लागतात याकरिता पेसजी विनंती लिहिली होती. त्यास आज्ञा आली होती की मागाहून लिहून पाठऊ त्याप्रमाणे करावें, त्याजवरून हाली सेवेसी विनती लिहिली आहे. तीन च्यारसे रुो सोपा बाधावयास लागतील परंतु सरंजाम चागला राहील. येविसीची आज्ञा आलियास सोपा बाधितो. प्रज्यनकालहि समीप आला आहे. यास्तव सेवेसी विनंती लिंहिली आहे, ही ध्यानास आणोन आज्ञा करावी. सेवेसी श्रुत होये. बहुत काय ल्याहावे हे विज्ञाप्ति.

¶*Keso Mahadeo asks Nana's orders on several points referring to the expenses of Anandibai's household.*

No. 30] [1-4-1788

श्री.

पु॥ सेवेसी कृष्णाजी जनार्दन कृतानेक सिर सां नमस्कार विज्ञापना दिनचर्येंचे वर्तमान.

छ २३ जाखर. बाजीराव याचा डावा कान दुखत आहे, प्रकृत बरी नाहीं, आंगावर पित्त उठले आहे, प्रकृती उष्ण आहे, उपाय होत असतो.

छ २१ जाखर

कोणते काळी चांगले होईल हे कलेना.

२

छ २६ जाखर, येथे नेहमी राहणे असोन श्रीशुक्रेश्वराची ऊर्जा विशेष नाहीं. आम्ही आहो त्यापक्षीं वाजंत्रे व कर्णे व छबिने निघावे हे काहीच नाहीं. आम्हास पावला तर आम्हीच करूं असें बाई बोलली.

छ २७ जाखर, आम्ही इंग्रजाजवळ होतो; पुढें तळे (गावा) वर आला. त्यापक्षीं ......ळें उपकार आम्हावर आहेत, व सिंद्याने रक्षिले म्हणोन सिंद्याचे पात्र उपकार होते. परंतु पुढें शुक्रेश्वरीं यावयास कारण सिंदा; त्यापक्षी गुलामपणा केला.

सेवेसी श्रुत होय हे विज्ञाप्ति.

१ अमृतराव रात्रौ निद्रिस्त असतां पिशाचदर्शन जालें. आंत खोलीत आलें, त्यामुळें जागृत होऊन बाहेर येत तो पर्यंत पाहात होते. मागेंहि दोन तीन महिन्याआलिकडे सावित्री[१] बाईचें दर्शन जालें होतें, म्हणोन कोपरगांवी नथू भगत कुंभार जाणता आहे, त्यास आणिले होते. त्याणे बंदोबस्त केला आहे.

¶*Krishnaji Janardan reports the conversations of Anandibai at Kopargaon.*

No. 31] [*3-4-1788*

पौ छ ७ रजब मु॥ समान.

श्री.

सेवेसी विज्ञापना. ताा. छ २९ जाखर पावेतो क्षेम असे विशेष. सौ सावित्रीबाई याजकडे दागिने केले पाहिजेत.

कलमे

हलकर्डाची नथ नवी केली पाहिजे. कलम १

हातसर जुने आहेत. जडाव मण्याचे त्यांस मणी पोवळी जाजती घातली पाहिजेत. कलम १

सदरहु त्याचेच दागिन्यापैकीं करावयाजोगे आहेत आज्ञा जाल्यास होईल. यकादा दागिना श्रीमंत मातुश्री बाईसाहेब पाहावयास म्हणून आणून सावित्रीबाईकडे देतात. त्यास कसे करावे ? बहुत करून बाईसाहेबांचे दागिने सावित्रीबाईकडेच आहेत, ऐसे असोन पुढें अधिक अधिक देतात. येविसीची आज्ञा येईल त्या प्रो पुढें चालेल. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*The writer informs Nana that Anandibai has given many of her ornaments to Amritrao's wife Savitribai.*

---

१ सावित्रीबाई, अमृतरावाची पहिली बायको.

No. 32] [3-4-1788

पौ छ ७ रजब सु॥ समान.

श्री.

सेवेसी विज्ञापना ताा छ २९ जाखर पावेतो क्षेम असे विशेष.

श्रीमंत मातुश्री आनंदीबाई साहेब चैत्र सुध पुर्णिमेपासून दरमहा पूर्णिमेस बारा महिन्याची बारा लिंगे ब्राम्हणास देणार त्याची योजना.

९ नवरत्नाची लिंगे येथील जवाहीर खान्यापैकीं खड्याचे ठाई लिंगाची कल्पना करून द्यावी.

५ आंगठ्यांतील खडे काढून द्यावे.

१ हिरा
१ पाच
१ नील
१ पुष्कराज
१ लसण्या
—
५

१ माणीक मोत्याचे घाटपैकीं
—
६

३ मोकळ सुमार पाहून काढावयाचे.

१ मोती
१ पोवळे
१ गोमेद
—
३
—
९

वाा राजश्री सिवशंकर शास्त्री यांस सौ सावित्रीबाईस भेटावयास आणिले पाहिजेत. यास्तव ल्याहावयास आज्ञा जाली आहे. येथे भेटोन पुढें नाशिकास राहावें यैसे दिसतें. त्यास आणावयाची आज्ञा जाल्यास घोडी माणसें येथून पाठऊन आणावी लागतील. याची आज्ञा काय ते जाली पाहिजे.
१

श्रीमंत सौ भागिर्थीबाई याजकडे नित्याचे राबत्याचे दागिने केले पाहिजेत.

१ नथ लाहान मोत्याची

२ हातसर जडाव मण्याचे; त्यांत पोवळी घालोन मोठाल्या हरभऱ्या एवढे मणी पोवळी असावी. पोवळ्याहून मणी मोठेच असावे. जोड १ दागिने

४ बाळ्या जोड २ प्रो
२ पोवळ्याचे जोड १
२ पाचेचे लोलकाचा जोड १
—
४
—
७

पौ साहा दागिने यातून खडे काढून घ्यावे. दागिन्याच्या किमती येथें मोजदादीस ठीक लागल्या नाही, व आज्ञेसिवाय खर्च करता येत नाही. यास्तव पाहावयास पाठविले आहेत. हे पाहून धर्मादाय करावयाची आज्ञा करावयाची असल्यास तेथेच किमत ठराऊन देऊन ल्याहावयास आज्ञा जाली पाहिजे.

३ कि॥ लिंगे करावी.
 १ स्फटिकाचे.
 १ सुवर्णाचे.
 १ रुप्याचे अथवा चंदनाचे.
 —
 ३

—
१२

जवाहीर सुधा बारा लिंगे लि॥ प्रो देणार याची आज्ञा. कलम १

सात दागिने केले पाहिजेत. तेथून करून पाठवावयाचे असिल्यास पाठवावे अथवा तेथील जवाहीर पैकी करून द्यावयाची आज्ञा जाल्यास श्रीमंत मातुश्री आनंदीबाईसाहेब करावयास सांगतील तसे करून द्यावे लागतील. यास्तव जसी आज्ञा येईल त्याप्रमाणे करीन.

कलम १

येथील जवाहिरास किमत लागली नाही हे कठीण पडते.

श्रीमंत राजश्री आपासाहेबास तेथून करून पाठवावे.

२ पायाती (ल) सोन्याच्या साखळ्या दागिने

० घागऱ्या पायातील जुन्या आहेत त्याचे भरतीस कांही लागतील येथें करितों.

—
२

सदरहुची आज्ञा जाली पाहिजे. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*The writer asks certain ornaments being made for the use of Bhagirathibai and Chimaji Appa and jewelled Lingas to be given as charity by Anandibai.*

No. 33] [*3-4-1788*

पो छ ७ रजब सु॥ समान.

श्री.

सेवेसी गोविंद कृष्ण गोडबोले कृतानेक सां नमस्कार विज्ञापना येथील वर्तमान ता। छ २९ जाखर पावेतो क्षेम असे विशेष. राजश्री रावोपंत ठोसर यांस एक महिन्याचा निरोप देऊन पाठवावे म्हणौन आज्ञा जाली. त्यावरून येथून पुणियास गेले. त्यास फार दिवस जाले. श्रीमंत राजश्री बाबा साहेब ल्याहावयास पढा-

वयास त्याजखेरीज ठीक बसत नाहीं. त्यास तैनात काय करावयाची योजना केली असेल ते जालियावर त्यास तेथे दुसरे काम नाहीं. सोय होऊन त्यांस इकडे येण्याची आज्ञा जाली पाहिजे. श्रीमंत मातुश्री आनंदीबाई साहेब यांणी राजश्री राघोपंत ठोसर यास पत्र ल्याहावयास आज्ञा केली; त्यावरून पत्र लेहून त्याची नकल पाठविली आहे; पावेल. राघोपंतास बाई साहेबांचे नावचे पत्र लि॥ आहे. याचे कारण राघोपंत तेथेंच आले आहेत; आणि बाई साहेबानीं दोनच्यार वेळां आज्ञा केली, सा लिहिलें आहे. उपाध्ये पुणियांत असतात तेव्हां बाईसाहेबांचे पत्र त्यास लिहित असतों, त्याची नकल येतच असते. त्याखेरीज पत्र ल्याहावयाचें कारण नाहीं; लिहित नसतों. कदाचित असे पत्र राघोपंतास ल्याहावयाची आज्ञा जाल्यास ल्याहावें न ल्याहावें याची आज्ञा होईल तसें करीन. बहुत काय लिहावें. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Raghopant Thosar is asked to be sent back from Poona without delay.*

No. 34] *[4-4-1788*

पौ छ ७ रजब सु॥ समान.

श्रीशंकर

श्रीमंत राजश्री नाना याप्रति

आश्रित लक्ष्मणभट्ट कर्वे यांचे अनेक आशीर्वाद विनंती. येथील क्षेम फाल्गून व॥ १२ पर्यंत जाणोन आपुले कुशल लिहिवयास आज्ञा केली पाहिजे विशेष. पुर्वी विनंतीपत्र व याद[१] पाठविली आहे; ते पाहोन काय उत्तर मर्जीस येईल त्याप्रमाणे आज्ञा करावी; त्या अन्वये करण्यांत येईल. वेदमूर्ति शिवशंकर शास्त्री यांस भेटोन दोन वर्षे जाहाली तर महिनापंधरा रोज राहोन जातील तर येथे कारभारियांस आज्ञा आली म्हणजे घोडी मनुष्ये पाठऊन आणतील. सुज्ञाप्रति बहुत काय लिहिणे. कृपावृद्धि करावी हे आशीर्वाद.

¶*Laxmanbhat Karve, the family priest of the Peshwa, requests Nana Fadnis to send replies to his previous queries and permission to call Shivshankar Shastri to visit Anandibai.*

---

१ सबंध पत्र बालबोध आहे. नकल मुळाबरहुकूम.

No. 35]   [*5-4-1788*

पौा छ ९ रजब सु॥ समान.

श्री

सेवेसी आपाजीराम सहस्त्रबुध्ये कृतानेक सां नमस्कार विज्ञापना. येथील कुशल ताा छ २७ जमादिलाखर पावेतो स्वामीचे कृपे करून सेवकाचे वर्तमान यथास्थित असे विशेष. सुरतेहून थैलीची पत्रें वाहुजी (?) महाराणी याणीं श्रीचा प्रसाद पाठविला त्यास थैली तैसीच स्वामीकडे पाठविली आहे. प्रसाद येथें सोडून पाहिला, तो हालवे नानाप्रकारचे व साखरेचे गाठी याप्रमाणे आहे मागेहि एकवेळ याप्रमाणें येथें आले तेहि पत्रे पुण्यास पाठविलीच होती. श्रीमंत राजश्री बाजीराव यास च्यार दिवस पित्त आंगावर येत आहे. तिसरे प्रहरी आंगास कंडून सुटोन गांधी येत आहेत. औषधी उपाय करीत आहेत काल पासून काही कमी झाले आहे. श्रीमंत मातुश्रीनीं पत्र लिहिविले आहे. वेाा राजश्री शिवशंकरशास्त्री यास भेटीस येण्याविसीं वगैरे (व) दागिन्याचे तोडमोड याप्रमाणे आहे. दोन अडीच महिने पत्राचे उत्तर येत नाहीं. त्यास उतर देववायाची आज्ञा करावी. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Appaji Ram Sahasrabudhe informs Nana of some letters and sweets received by Anandibai from Surat.*

No. 36]   [*5-4-1788*

पौ छ ७ रजब

मु॥ समान.

श्री.

सेवेसी गोविंद कृष्ण गोडबोले कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. येथील वर्तमान ताा छ २७ जाखर पावेतो क्षेम असे विशेष श्रीमंत कैलासवासी दादासाहेब सुर्तेस होते तें समई वहुजी माहाराणी म्हणून गुजराथी ब्राह्मण बायको श्रीबालकृष्णजीची पूजा करीत असते. ठाकुरद्वारा मोठा नामांकित आहे. ते बाई तेथे प्रसाद देत होती. दादासाहेब इकडे आलियावर प्रसाद आला व त्याचा काल जाल्यावर येकवल प्रसाद कोंपरगावी मागे आला. तेव्हा त्याची पत्रे विसाजी आपाजी याजकडे पाठविली होती. त्याणी सरकारांत दाखविली की नाही, समजले नाहीं. त्याजवर हाली प्रसाद आला. साखरेचे जिनस पेढे बर्फी हलवे व मनुका वगैरे मिलोन जिनस सुमारी साठपावेतो, येकक जिनस च्यार च्यार

पैसे भार अजमासे येके लाहानसे बुर्डीची पेटारीत आणिला, तो येथे पाहून ठेंविला आहे. आज्ञा येईल त्याप्रो करीन. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना. पत्राची थैली सबंध पाठविली आहे. पावल्याचे उतर पाठवावयास आज्ञा जाली पाहिजे हे विज्ञापना.

¶*Govind Krishna Godbole requests Nana's permission to hand over certain sweets to Anandibai, which had been received for her from a Gujarati lady Wahuji Maharani.*

No. 37] [*7-4-1788*

पौ छ ७ रजब सु॥ समान.

श्री

सेवेसी कृष्णाजी जनार्दन कृतानेक सिरसाष्टांग नमस्कार विज्ञापना. ताा छ २९ जााखरपर्यंत मुकाम कोपरगांव येथे यथास्तित असे विशेष. दिनचर्येचे वर्तमान—

छ ९ जााखर, अग्निहोत्राकडे चातुर्मास्यें होत आहेत. त्या नि॥ आवभृतस्नानास कचेश्वरचे घाटाकडे गेले होते.

छ १२ जााखर, हुताशनीचे पूजन जाहाले.

छ १६ जााखर, सिमग्यानि॥ प्रात:काली बाहेर खेलावयास बाजीराव व आमृतराव च्यार दिवस जात होते.

छ १७ जााखर, फाल्गून वद्य पचमी नि॥ वाड्यांत बैठक करून सिलेदार वगैरे मंडली बलाऊन रंग केला होता.

छ १९ जााखर, जिऊबाई चापेकर याणी बागांत समाराधना केली, तेथे बाई गेली होती.

छ ११ जााखर, बाई व भागिर्थीबाई यांची स्वारी मुक्तेश्वराचे दर्शनास हिंगणीस गेली होती.

छ १४ जााखर, बाईचे बोलणे—

१ रामचंद्र तुलपुला याणे फडणिसी केली. त्या वेलेची कारकुनी घेतली. आम्हाकडील फडणिसीचे धनी नाहीत. कारकुनी मात्र घेतात.

१ आमच्या व त्यांच्या बोलण्यात तिराईत चांगला असता तर परस्परे किलाफ जाते. परंतु आमचाहि भोग सरला नाही.

—

२

छ २० जाखर, बाईचे बोलणे—

१ आमृतराव पहिल्याने घेतले तेव्हा प्रथम घेतांच निरालें तेज दिसों लागलें. पुढेंहि माधवराव देखील द्वेष करीत परतु यांचे दैव चांगले; दैववान आहेत.

१ पूर्वीचे द्वेष चांगले होते. इतका पेच. परंतु खर्च बहूत. आसे कसे जालें तरी ते आपले, हेहि आपलेच. परंतु कालानुसार हेंच खरें.

छ १८ जाखर,

१ बागांत पिंपलाची मुंज जिऊबाई चांपेकर यांणी केली तेथे बाई गेली होती.

१ वाड्यात नटव्याचा खेळ जाला.
―
२

छ २१ जाखर,

१ पहिले सरदार मातबर प्रमाणिक फार होते आतां थोडे आहेत. पहिलें तसेच आसते तर कोणीतरी आम्हा-कडील निखालसतेची गोष्ट ऐकता. सारांश आमचें दैव वाईट आहे.

१ बाजीराव याचें दैवाची परीक्षा प्रथम जाली. यांचे दैवास प्रारंभ जाला तेव्हापासून कैद जाली.[१]

(अपूर्ण)

¶*Krishnaji Janardan reports Anandibai's remarks on her situation to Nana. Evidently she felt her liberty altogether curtailed and blamed her fate.*

No. 38] *[11-4-1788*

पौ छ १० रजब सु॥
समान चैत्र.

श्री.

सेवेसी गोविंद कृष्ण गोडबोले कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. येथील वर्तमान ता छ ४ रजब पावेतों क्षेम असे विशेष. स्वामींनी कोपरगावचे चाकरांपैकीं खिजमतगार जासूद वगैरे पाठवावयास आज्ञा केली. त्यास आज्ञेप्रो झाडून पाठऊन देतों. तूर्त जानाजी नाईक जासूद जथे मजकूर यास पाठविला आहे. पावल्याचें उत्तर पाठवावयास आज्ञा जाली पाहिजे. बहुत काय लिहावें. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Servants in personal attendance at Kopargaon are invited to Poona to visit Nana.*

---

१ यापुढील एक बंद गहाळ.

No. 39] [14-4-1788

पौ छ ७ रजब सु॥ समान.

श्री.

सेवेसी गोविंद कृष्ण गोडबोले कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. येथील वर्तमान ता। छ २७ जाखर पावेतो क्षेम असे विशेष. मी येण्याविसीं बहुत वेळां लि॥ परंतु आज्ञा जाली नाहीं. यास कसें करावें ? स्वामींचे चिता मजला फार दिवस पुणियात ठेवावयाचें नसिल्यास मी आपले मतें बळेच राहीन कीं काय ? जसी मर्जी असेल तसा लौकरच इकडे येईन. परंतु अगदींच यावयाची आज्ञा न जाल्यास माझे बुधीचा खुलासा राहत नाहीं. मी वरचेवर आलो गेलों असे जाल्यानें लिहिणे वरचेवर आटोपत जाईल. च्यार वर्षाचे बोटखत राहिले आहे असें पुढें किती ठेवावे ? पुढे स्वामीच मजला फिजत (फजित) करतील. येथील जवाहिरास किमती लागल्या पाहिजेत; त्यास जोहरी पाठविला पाहिजे म्हणून वारंवार विनंतीपत्रे पाठविलीं. जोहरी आला नाही. येथे जोहरी येऊन किमत ठीक होणार नाहीं असे असल्यास पेश्वा पुण्यास आणून तेथेच किमती करून पाठवावयाच्या असिल्यास पोतनिसाकडील कारकून बरोबर देऊन जवाहीर पाठवितों. तेथें किमती घालोन द्याव्या. जवाहिराची पकी किमत आ(जा)ल्यासिवाय जवाहीर कीर्दीस जमेस धरतां न ये. यास्तव झाड्यावरच कामकाज चालले आहे. किमत जाल्यावर जमेस धरून खर्चहि कीर्दीस लिहूं. खर्च कांहींच नाहीं परंतु किरकोळ खर्च धर्मादाय कोठे मोती पोवळे जाला आहे तो लिहिला पाहिजे यास्तव मजला येण्याची व जवाहिराचे किमतीची काय ते आज्ञा जाली पाहिजे. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Govind Krishna Godbole informs Nana that he should be allowed to visit Poona and finish the long standing arrears of accounts, price-lists of jewellery and other matters.*

No. 40] [18-5-1788

पैा छ १६ साबान.

श्री.

सेवेसी गोविंद कृष्ण गोडबोले कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. येथील वर्तमान ता। छ ११ साबान (पा)वेतो क्षेम असे विशेष. श्रीमंत मातुश्री आनंदीबाईसाहेब याणी आज्ञा केली की आम्हा जवळ थोरले देवघरांत सोन्याच्या मुर्ती

आहेत, त्या आम्हास उग्र वाटतात. यास्तव ब्राह्मणास देणार. पुणियास लेहून पाठवावे. तेथून द्यावयास सांगितल्यावर आम्ही ब्राह्मणाची योजना करून त्यास देऊ कदाचित मुर्ती न द्याव्या म्हणौन लिहून आले तर आम्हास आपले जवळ ठेवावयाच्या नाहीत. वो राजश्री उपाध्ये पुणियास जाणार आहेत याजबरोबर पाठवून देऊ. मग तेथे सरकारात ठेऊत किंवा कोणास देऊत; याप्रो ल्याहावे. त्यावरून मूर्ति सोन्याच्या अजमासे वजन तोळे,

२७।	सांबाकडील मुर्ति,		
	१२	पार्वतीची	१
	५।	गणपतीची	१
	१०।	स्कंदाची	१
	२७।		३
९॥।		भैरवी यंत्र	१
३७			४

येकून तीन मुर्ति व येक यंत्र मिळोन सततीस तोळे. याचे किमतीचा अजमास पावणेसहाशे रुपये पावतो आहे. बाईसाहेबाची मर्जी मूर्ति ठेवू नयेत येसी जाली. तमसई उपाध्ये बहुत बोलले. बहुतां दिवसाच्या मूर्ति सांबाजवळच्या, ह्या देऊ नयेत. त्यांणी एकच निक्षूण गोष्ट सांगितली. ह्या उग्र मूर्ति आहेत; आम्ही ठेवीत नाहीं व ऐसे ल्याहाची आज्ञा जाली त्यावरून लिहित आहे. आज्ञा होईल त्याप्रमाणे विनती करीन. याखेरीज येथे देवघरांत पोवळ्याचा गणपती व सोन्याचे मोर आहे ते श्रीमंत राजश्री रावसाहेबास आम्ही पाठवितो म्हणोन बोलली. उपाध्ये येते समई घेऊन येणार आहेत. कलमे.

मोर सोन्याचे वजन तोळे त्यास ३६

मोरासारखा मीन्याचा रंग आहे १

पिसारा पाचेचा आहे त्यास अजमास सोने वजन तोळे ८ येकच पाचेचा पिसारा, तीन तीन बोटे लांबी रुंदी, ऐसी वाटोळी पाच आहे.

वजन तोळे १० पाच फिके रंगाचे जिरीमदार दिसते.

१

मदरहूप्रमाणे मोर व गणपतीचा मजकूर आहे. येविसीची आज्ञा काय ते जाली पाहिजे. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Anandibai requests permission to exchange the gold idols in her possession for new ones from Poona. These, she fancies, possess a frowning countenance, reminding of Raghoba's days.*

No. 41] [19-5-1788

पौ छ १२ साबान समान
समानीन वैशाखमास.

श्री

सेवेसी कृष्णाजी जनार्दन कृतानेक सिरसाष्टांग नमस्कार विज्ञापना तागायत छ ५ साबानपर्यंत मुकाम कोपरगांव येथें आसें विशेष. येथील दिनचर्येचें वर्तमान.

छ २ रजब, सोईच्या गोष्टी आसल्या तर येथें शुक्रेश्वरी शहर वसतें, उदमी वगैरे येऊन राहाते. याप्रसंगी आम्हीं आहो ते येक देवाल्य देखील होत नाहीं, आसी काळचर्या आहे असें बाई बोलत होती.

छ ४ रजब, चैत्रागौरीनिमित्त वाड्यांत हळदकुंकू जाहालें. कोपरगांवच्या व कचेश्वर(च्या) बायका आल्या होत्या.

छ ५ रजब, खासगींकडील जुनीं सनगें द्यावयाचीं म्हणतात. त्याजवरून बोलणें. पूर्वी माधवराव यांचे वेळेस बंदोबस्त फितुराचा मात्र होता. आतां येथें सनगें जुनी जाली तरि देऊं देत नाहीं, कारभारी मनस्वी आहेत, असें बाई बोलत होती.

छ १० रजब, बाईचें बोलणें—

१ पूर्वी गरोदरपणामध्यें स्वारीबराबर असतां कोठें राहावयाची सोय न होय. नंतर पवार याणें धारेचा किला रिकामा करून तेथें राहिलों. आम्हांवर उपकार फार केले आहेत आसें बाई बोलली.

छ ३ रजब, आमृतराव याणी आपत्ती बहुत पाहिल्या आहेत म्हणौन त्यांस हें कठीण वाटत नाहीं. याहिपेक्षां दुसरे कारभारी येथें वाईटमिलते तर आम्ही काय करितों म्हणोन हे चांगले आहेत ! आसें आमृतराव म्हणतात. आम्हांस तों अनुभव किमपिच नाहीं ! पूर्वी कसेहिं पेचांत होतों, तथापि कोणी शब्द खालीं पाडिला नवता आसें बाई बोलत होती.

छ ७ रजब, इंदुवार नि॥ बाजीराव याची स्वारी त्रितीप्रहरीं कुंभारीस देवदर्शनास गेले होते.

छ ९ रजब, येकादशीनिमत्य त्रितीय प्रहरीं स्वारी हिंगर्णास श्रीमुक्तेश्वरास दर्शनास बाजीराव गले होते.

छ ११ रजब,

१ दोन प्रहरीं बागेंतील बंगल्यांत बाई भोजनास गेली होती.

० लग

—

१

छ १२ रजब, भागीर्थीबाई यांस सीत ज्वर आला.

१ धारेंतून निघाल्यावर बोढेकरानी मर्जी फार राक्षिली. बोढेकरांचा येक भाऊ फार लबाड होता. त्यासहि आंती वाईट जालें; हाल जाले; माधवरायाप्रमाणें जाले.

—
२

छ १० रजब,

१ दोन प्रहरानंतर बाई व भागीर्थीबाई यांची स्वारी संवछरास गेली होती.

—
३

छ १४ रजब, सोमवार नि॥ बाजीराव यांची स्वारी संवछराजवल गणपतीस गेली. नंतर कोकमठाणास देवदर्शनास गेली होती.

छ १५ रजब.

१ बाईस जन्म काळीं शुक्र आठवा आहे. त्याचें फल शत्रु आसावा अणि त्याचें पारिपत्यहि व्हावें असें फल आहे.

१ आमृतराव यांस साहाव स्थानी बुध आहे. त्याचें फल वंश शत्रू असावा असें आहे.

१ ग्रह उंच उंच आहेत परंतु कांहीं वेध आहेत.

—
३

छ १६ रजब, संकटचतुर्थीनिमित्त मौनव्रत बाई व बाजीराव व अमृतराव याणी केलें.

छ १३ रजब,

१ त्रितीय प्रहरीं बाईची स्वारी कोपरगांवास भवानीचे देवदर्शनास गेली होती.

१ सावित्रीबाई यास पुत्र होईल असें कुणबिणीचे आंगी देव आला त्यानें सांगितलें.

१ रामभट उदगीर करंजगांवकर यास भूमीदान दिल्हे. याविसी पुण्यांत बोलले कीं बाईची मर्जी आहे त्यापक्षीं चांगली द्यावयाची आसें भटजीनी सांगितलें. त्याजवरून बोलली कीं आमचे मर्जीचें अगत्य फार आहे हें चांगलें.

—
३

छ १७ रजब, बाईचें बोलणें.

१ बाजीराव आरबाचगिरी फार करितात. ऐकत नाही, हें काय जालें? साहेबाची द्रष्टी पुढें पाचा वर्षी काय होईल हे सांगत होते आणि हे कसे आहेत? त्यांची बुद्धि सुर्तेहून येण्याविसीं मात्र चकली. त्याचें कारण जालें.

१ सिंद्याकडे गल्यानें सिंदा त्यांचा आहे. त्यापक्षीं आम्हांस त्यांचे हातीं देतील म्हणोन तिकडे गेले नाहीं.

१ गाईकवाड व इंग्रज वगैरे यांस आम्हांस ठेवावयाचें सामर्थ्य नव्हतें.

—
२

छ १९ रजब, बाईचें बोलणें—

१ चांगले ग्रह आसले तर त्यांचें फल येत नाहीं वाईट आहेत त्याचें फल येतें.

१ यंदा समानसमानीनांत *आश्विनापासून येकेचाळीसावें वर्ष आहे त्यांस पुढें आकरा महिन्यांनीं भाद्रपद मासीं सूर्याची दशा साडेच्यार महिने आहे. त्यामध्यें शरिरास दुखणें फार व्हावें; कठिण आवस्था व्हावी; क्लेश आसावे; आपमृत्यु स्थान आहे; याजकरितां श्रीसूर्यप्रीत्यर्थ आर्घ्यप्रदानास ब्राह्मण लावावयाविसीं उपाध्येबावाजवळ सागितलें आहे.

—
२

छ २० रजब,

१ आपा साहेबांचा वृतबंध पुढें फाल्गुन मासीं करावा व आठवे वर्षी लग्न करावें आसें बाई बोलली. मुंजीविसीं उपाध्ये याप्रमाणें बोलले—

१ उपाध्ये श्रीत्रिंबकेश्वरास सहस्रभोजन व माहारुद्र करावयास जावयाची गोष्ट काढिली. त्याजवरून बाजीराव बोलले कीं आम्हीं जातों. देवदर्शन घेऊन पंधरा दिवसीं येऊं, याविसीं पुण्यास पत्र लिहावें. बाई बोलली कीं येथें कैद कोणाचे दैवानें समजत नाहीं ! आम्हासच असली आसें समजोन देशीं आलों; त्यांत कारभारी प्रामाणिक येकवचनी आणि नाना आम्हासी मात्र आसें बोलले. परंतु सर्वांशीं प्रामाणिकत्व आहे. आशा योगानें जालें भावी होणार तें चुकत नाहीं.

१ बाजीराव फार खेलतात म्हणौन राघो केशव ठोंसर यास आणावें आसे उपाध्ये बोलिले. त्याजवरून बाई बोलिली कीं याणी विद्या सिकावी किंवा शहाणें व्हावें हें कोणास आगत्य नाहीं. आजून त्याचाहि बंदोबस्तच केला नाहीं. जाल्याशिवाय तो तरी कशास येईल आसें बोलली.

—
२

छ २१

१ रोज येकाद्यास चांगलें वाईट म्हणतात. हें सर्व दैवाचें देणें आहे. आम्हास उगीच वाईट म्हणतात.

१ त्रिंबकरावमामा[1] यांस शेणमार दिला. आम्हींच करविलें.

१ हरी बावाजीविसी आम्हांस पहिल्यानें किमपि ठाऊक नवतें, तथापि लोक म्हणतात. नारायणराव यास दगा जाला हेहि आम्हास ठाऊक नाहीं. याविसीं आमचे आंगीं लावणारानें लावावें. आमचा विश्वास काय गेला

—
३

* Anandibai completed 40th year of her age in September 1787. So that she must have been born in 1747 and so 8 years of age when she was married.

1 He was suddenly attacked and killed by Raghoba in May 1779.

तर कळेना. यास जावयाचें जाल्यास बेरेंच आहे. देवदर्शन होईल. पुण्यास पत्र लिहावें आसें बाईनीं सांगितलें.

—

२

छ २३ रजब, येथें बंदोबस्त करण्याविसीं येथील कारभारियांचें हातीं नाहीं. पुण्याहून बंदोबस्ताविसीं मुजरद वरचेवर लिहून येत आसतें, म्हणोन आसें होतें. यांचे स्वाधीन काये आहे? हे आपले तर्फेनें चांगलेंच करितात असें बाई बोलली. कलम १

छ २४ रजब, अस्पर्श जाली. बागेंत गेली होती. केसो महादेव बरोबर होते.

छ २५ रजब येकादशी.

१ त्रितीय प्रहरीं बाजीराव आमृतराव यांची स्वारी कुंभारीस देवदर्शनास गेली होती. केसो महादेव व आपाजीराम गेले होते.

१ आपासाहेबांचे मुंजीचा निश्चय पुढील फाल्गुनमासीं करावयाचा जाला असें उपाध्ये बोलत होते.

—

२

आसें किमर्थ बोलत नाहीं. उगीच हाल करावे हें काय आसें बाई बोलत होती.*

१ केसो माहादेव यांस बाजीराव याणी छडी मारिली, असी लटकी आवई. दुर्लौकिक दैवानें होतो. आन्याय जाल्यास मोठा आसला तर चौकी बसवावी. पुणेकर अविश्वासू, परंतु आन्यां(या) नत आल्यास चौकीच बसवितात. माध(व)रा(व) याणी दिनकर माहादेव याचे तोंडांत मारिली. बाईनी सर्वांनीं वाईट म्हटलें. थोरास लाहानास आंतर आहे. त्यांत आम्ही याचे कैदेंत आहों, त्यापक्षीं कसें होईल. उगीच लोक लबाडी बोलतात, असें बाई बोलत होती.

१ दौलत नानासाहेब व दादासाहेब त्रिवर्गांनीं मेळविली. माधवरावहि आमची मर्यादाच रक्षित होते. त्यासमई दोन लक्ष धर्म होता. आतां पंचविस हजार रुपये नाहीं. त्या वेळेस हे कारभारी कोठें होते? इतकी सिपाईगिरी त्यांजवर जाली नाहीं. गेल्याचें घर मेल्याची बायको आसें केलें! यांत अधिक काय केलें आसें बाई बोलत होती.

१ उपाध्ये बावा बोलले. कर्मविपाक पोथी नाहीं व भारथ चांगली प्रत पाहतो, आसें पुण्याचे पत्र आलें आहे आसें बोलले. त्याजवरून बाई

* Anandibai here denies any knowledge of Narayanrao's murder-plot or of Hari Babaji.

छ २६ रोज रजब.

१ येथें कारभारी कोणी चांगले नाहीं. आमचे हित करून बरेपणा सांगे आसा नाहीं. चांगलें करावें हें नाहीं. बोढेकरांजवल सवादोन वर्षें होतो. त्याणी प्रथम बोलणें कठीण बोलले, ते अमार्यादा वाटली. परंतु पुढें येथास्थित चागलें जालें आसें बाई बोलत होती.

१ येकास नवरी वाईट केली. आतां आपासाहेबांस तरी नवरी चांगली पहावी आसें बाई बोलत होती.

१ मागील चौकांत निम पडवी आहे. त्याची येक बाजू गची करावयाची योजना होत आहे.

—
३

छ २८ रजब (९-९-१७८८)

१ बाजीराव यांस गर्मी जाली आहे. बायको थोर नाहीं हेच बाधा फार आहे आसें बाई बोलली.

१ पूर्वी नासिकास स्वारी गेली होती, तेव्हां तेथील लोक थोरले बाईस बोलत की तुम्हांस भिकेस लाऊन आपण भीक मागतात आसे लबाड लोक बोलत. परंतु बाईची धन्य आहे. दोन मूल हत्तीप्रमाणें गेले. आम्हांस किती वाईट वाटते. मग त्यांचे काय पुसावें आसे बाई बोलत होती.

बोलली कीं उपाध्ये बावानीच कर्मविपाक पाहिला आहे आणि शोध न पाहाता त्याणीच आसें लिहिलें. तेव्हां आगत्य किती आहे हें समजलेंच आहे. योगवसिष्ठाची पोथी पाहिजे. परंतु आणविल्यानें येणार नाहीं. परिक्षा पाहाणें तर पहावी. आसें उपाध्याजवल बोलली.

—
४

छ २९ रजब

१ पहिले पंचभाई नाव होतें मग बारभाई जालें. श्रीमंत तर 'फितुरी' आसें पत्रांत लिहित होते आसे बाई बोलली.

१ पूर्वी आम्हीं परस्वाधीन होतों आताहि तसेंच आहे. ही गोष्ट कारभाऱ्यानी चालविली. परंतु मर्जी रक्षणें किंवा मर्यादा हें नाही आसें बाई बोलली.

—
२

छ ३० रजब, बाईचें बोलणें.

१ आम्हीं पूर्वी केवढीं होतों! सिंदे होलकर सुधां आमचे तेजाखालीं होते. तींच माणसें आता आम्ही कसीं जालों!

१ नाना साहेबांचे वेलेस चांगली दौलत जाली. पुढें माधवराव छचोरीपणा करित आसत. नारायणराव तर नऊ महिने जाले. त्यांत काय पाहावें? परंतु बहुत मर्यादशील होता.

१ बाजीराव आमर्याद फार जाले आहेत. पूर्वी नारायणराव फार मर्यादशीळ होते आसें बाई बोलत होती.

१ थोरली बाई नाटकशालांजवलहि पूर्वी स्वच्छ बोलत नसत. आंतरयामी फार कठीण आहे. त्याचे फलहि जालें आसें बाई बोलली.

४

छ १ साबान,

१ बाईकडे देवाची पूजा वसंतऋतुमध्यें आरुणोदई च्यार घटका रात्रीस करावी आसी मर्जी होती. परतु उपाध्यानी प्रात:कालीं करावी आसी विनंती केली. त्याजवरून बोलली आम्हांकडे भट कशास पाहिजे. आम्ही पूजा करूं. त्यांत आम्हांस देवच नको. सूर्याचें ध्यान करून राहूं. तेंहि मोठेंच आहे. परंतु यांजवल रदबदली करणें हे नको. आलिकडे प्राया करित नाहीं. यांचे तोंडास कोणी लागावें, आसें बाई बोलली.

१ शास्त्रामध्यें बारभाईचा प्रवेश नाहीं. आसीं आनुष्टानें केल्यानें काय होतें. कामनिक केल्यानें दुर्गत होते. इतका यांचा शोधच नाहीं.

छ १ साबान.

१ येथें जितके आहेत तितक्यांचे मागील जन्मीं भक्षिलें आहे म्हणोन आतां आम्हांपासून फेड करून घेतात असें बाई बोलली.

१ पूर्वी दुर्गाबाईचें लग्न जालें. तेव्हां लुगडीं वगैरे खर्च आम्हीं सांगितल्याप्रमाणें जालें. तशांत विहिणी रुसत. आतां याजकरितांच विहिणी गरिब मेलविल्या.

१ पूर्वी आमची तऱ्हा कांही काम येकाद्यास सांगावें, पाहावें तों तें तयार जालें हें ठाउक आहे. कधीं काय लागतें किंवा किती रुपये लागतात हें ठाउक नाहीं. हें आतांच आधेली पावली पैसे कलों लागले.

छ ३० रजब,

१ तृतीय प्रहरीं स्वारी बाजीराव व आमृतराव शृंगेश्वरास देवदर्शनास गेली होती.

५

छ २ साबान. दोन महिन्यामागें बाजीराव रात्रौ भागीर्थीबाई यांस बोलावित असत. आसें येक दोन तीन वेलां जालें. हें बाईस कललें. त्याजवरून बाईनी मनाई केली. त्यास रागावून बाजीराव बोलूं लागले कीं आसे आहे, त्यापक्षीं आम्हांस बायको नको, आमचे मातेप्रमाणें आहे. आसें येक दोन च्यार वेलां बाईजवल बोलले. बाईहि रागें भरत. परंतु न ऐकत. त्यास आज गोष्ट निघाली. त्याजवर बोलले कीं ती तुमची सवत आहे. आसें बोलतांच रागें भरली, आणि मारूं लागली. तोंडांत व लाता आशा

१ पत्रें व वाती वगैरे लिहिवित होतों तें बंद केलें. हें मला बरेंच आहे. माझे चितास येईल तो जप करीन. कोणास कळणार नाहीं आसें बाई बोलली.

१ पहिले प्रमाणें मेहेनत नाहीं. सुखानें बसोन आइतें खावें. हें दैवानें चांगलें केलें. त्यांत भक्षावयास चांगलें आहे, परंतु खाशास मात्र आहे. ब्राम्हणास घालीन म्हटलें तर नाहीं आसें बाई बोलली.

१ सुर्तेत आपले स्वाधीन होतो. तेथून याप्रांतीं येऊन ही दशा व्हावी हे मनांत देखील नव्हतें. परंतु भावी हे खरे. कारभारी प्रामाणिक होते आणि यांच्या करण्याची तऱ्हा चांगली. ज्याचे बोट सांपडले त्याचा हात धरिला. परंतु उगेच कोणाचेंहि वाईट करीत नाहीं. यास्तव येवढा तरी खोटेपणा त्यांचे पदरीं घातला, हेंच पुरे आसें बाई बोलली.

१ व्यंकट सदासिव पेंडसे याचे चुलत बंधु केसो माहादेव यांचे घरीं आहे. त्यास देवी आल्या आहेत म्हणोन समाचारास बाई गेली होती.

मारिल्या बहुत क्रोध आला. मोठे मोठे हती गेले, तेव्हां काय जालें, आसें आसोन काय करावें? आशा प्रकर्णी गोष्टी बोलली. कलम
१

छ ३ साबान,

१ बाजीराव यांस ज्वर आला. काविलीचा उपद्रव जाला आहे. सारावेळ खेळतात, यामुळें रागें भरतात, म्हणोन शरीर किंचित् क्षीण जालें आहे. त्यांत ज्वरांश होतो.

१ भागीर्थीबाई यांस ज्वर येतच आसतो. किंचित कमी आधिक होतो. शरीर क्षीण जालें आहे.

—

७

¶*This report of Anandibai's doings and utterances sent by Krishnaji Janardan from Kopargaon to Nana Fadnis is a very important document running over about a month's period and received within a week of its arrival. This proves among other things that Anandibai was born in September 1747, that she had no knowledge of the plot to murder Narayanrao or Hari Babaji, that Bajirao was suffering from immoral diseases at the age of 13 and that Anandibai had absolutely no liberty beyond possessing food and clothing.*

No. 42] [19-5-1788

पा छ १२ साबान सु॥ सम्मान.

श्री

सेवेसी गोविंद कृष्ण गोडबोले कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. येथील वर्तमान ता छ १ साबान पावेतो क्षेम असे विशेष. येथील चाकरीविसी स्वामीनी कर्नाटकचे स्वारीस जातेसमई समक्ष आज्ञा केली आहे ते लक्ष धरून चाकरी करीत आहे. येथील चाकरी सारी संशयाची आहे. कोणी जितके संशय घेतील तितके समजावयास संभव दिसतात. यास्तवच मी स्वामीस पुर्वी विनंती केली की माझे वर्तणुकेत दोष येईल येसे कदापि घडणार नाहीं. कदाचित काहीक संशयाची गोष्ट श्रवणास आल्यास त्याची छान स्वामीनी समक्ष केली पाहिजे, कां की माझा बोलणारा स्वामीखेरीज स्वामीजवळ मजवाचून दुसरा कोणी नाहीं. त्यावरून मजला आश्वासन जाले ते ध्यानातच असेल. ईतके ल्याहवयाचे कारण काय तर माणुस तुफानी फार जाले आहे. अंगुष्टाचा दशासीर[१] करून दाखविणार. कोणते निमित्ते काय दोष समजवितील हे कळत नाही. बाहेर बाजारआवाई, मनस्वी लोक बोलतात. त्यास काय करावें? असो. बाजारआवाईसी मजला गरज नाहीं. मी पत्री फार काय लिहू? श्रीमंत राजश्री बाबासाहेबांचे लग्नास राजश्री सिवरामपंत खासगी येथे आले होते. त्याणी येथील वर्तणुक सर्व दृष्टीनें पाहिली आहे. शोध केल्यास परस्परेच ध्यानास येईल. काही येक संशयाची छान मी समक्ष असोन जाल्याने मजला फार संतोष आहे तेणे करून माझी चाकरी करावयाची रीत ध्यानास येईल. स्वामीचीहि खातरजमा होईल. चिंता नाहीं. पुणियांत हजारो रुपये लाऊन लोकानी क्षुल्लक कामे विहिरी भिंती वगैरे केली व करतात, ते सहजा खाली जाते. संसारच आहे. करणे प्राप्त. त्यामध्ये स्वामीचे कृपेकरून मी लहानसे श्री गोपालकृष्णाचे देवालय बांधिले. त्याची सोय सुतार बेगारीचे मिळाले. लाकडे बेगारीनेच आली. जकात पडली नाहीं. मजुरी मसाला फार सवंग किफायतवार जाले म्हणून केले. तीर्थरुपाचे मानस होते त्याचा योग गंगातीरी घडोन आला. तेव्हां स्वामीस श्रुत केलेच आहे. तीर्थरूपाचे श्रम काय होते ते स्वामीचे ध्यानांत आहेत. त्याचे सार्थक स्वामीचे कृपेकरून जाले. मी येथे राहिलो. परंतु मजला स्वामीचे पायासिवाय दुसरा आश्रा काय आहे? जे होणे ते कृपेनेच होईल व जे जाले ते कृपावलोकनेकरूनच जाले. सर्व लौकिक स्वामीचाच आहे. आम्ही सेवकानी चाकरी मात्र करावी. सेवकाची आबरु वाढविणे धन्याकडे आहे. स्वामी सर्वज्ञ आहेत, मी निर्दोष चाकरी केली; समज-

---

१ रावण.

ण्यात आले असल्यास उत्तम, नासिले आल्यास छान करून पाहिल्यावर ध्यानास येईल. त्याची मी चिता करीत नाही. सर्व चिंता स्वामीस असत आहे. कलेल तसा प्रतिपाळ करावा. बहुत काय लिहणे ? सेवेस श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Govind Krishna Godbole, Head Officer appointed by Nana Fadnis to look after Anandibai's arrangements, writes a personal explanation saying how delicate is the position in which he has to work.*

No. 43] [*21-5-1788*

पौ छ १० रमजोन सु॥ तिसा ज्येष्ठ.

श्री

सेवेसी गोविंद कृष्ण गोडबोले कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. येथील वर्तमान ताा १४ साबान पावेतो क्षेम असे विशेष. कोपरगावी च्यातुर्मासाचे बेगमी बाा खर्चास यैवज पाहिजे, येविसी पूर्वी विनंतीपत्र व अजमास लिहून पाठविला. ते यादं व पत्र पावले असेल. त्याप्रौा यैवजाची आज्ञा जाली पाहिजे. याखेरीज कलमे.

यंदा सूर्यग्रहण परवणी मोठी आहे. यास्तव श्रीमंत मातुश्री आनंदीबाईसाहेब याणी तुला करावयाविसी लेहून पाठवावे म्हणोन आज्ञा केली. त्यावरून पूर्वी लि॥ आहे. ग्रहण समीप आले आज्ञा जाली पाहिजे. त्या प्रौ विनंती करीन. १

ग्रहणास स्वारी टोकेयास येणार. मजला विनंती करावयाची आहे अजमास वहवाट समजावयाचे आहेत. तेथे दर्शनास येईन.

पाा धांवरफल येथील मामलत तुको मल्हार याजकडून दूर करून राा धोंडो पंत थोरात याजकडे सांगोन माहालचे रुजुवातीस कारकून पाठविले असेत. १

पाा दहिवेल येथील जावसाल राा पांडुरंगपंत आचवल याणी गैरवाका समजाऊन पत्र पाठविले. त्याचे उतर स्वामीस लिहून पाठविले त्यावरून ध्यानास आले असेल हली सालमजकूर समानचा यैवज मारनिलेपासून घ्यावयाची त्यानी वराता केली आहे. पेशजी सालमजकूर पौ म्हणोन मारनिलेपासून पाच हजार रूा घेतले होते. परंतु मागील आमीचे सुटीचे यैवजी घेतले पाहिजेत. साा सालमजकूरचे यैवजाचा भरणा हाली करून घ्यावयास त्यास निक्षूण आज्ञा जाली पाहिजे. कलम १

चार कलमे लि॥ असेत. याजवरून ध्यानास येईल. बहुत काय लिहावे. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Govind Krishna Godbole reports from Kopargaon of Anandibai's desire to weigh herself on account of solar eclipse and further solicits orders regarding the budgets for the next four months.*

No. 44] [23-5-1788

पाा छ १६ साबान

श्री

सेवेसी कृष्णाजी जनार्दन कृतानेक सिरसाष्टांग नमस्कार विज्ञापना. ताा छ १० साबानपर्यंत मुकाम कोंपरगांव येथें आसे विशेष. श्रीमंत राजश्री बाजीराव साहेब यांस ज्वर व काविळीचा उपद्रव जाला होता, त्यास दोन तीन दिवस उतार आहे. देवघरांत श्रीसांबाजवळ देवीची व स्कंदाची व गणपतीची आशा सोन्याच्या मुहुर्ती पहिल्या आहेत. त्यास सोन्याची मुहुर्त उग्र पूजेस नसावी आसी गोष्ट निघाली म्हणून ब्राह्मणास द्यावयाविसी उपध्येयाजवळ बोलली कीं याविसी पुण्यास लिहून उतर आणवावे. तेथून परवानगी न आली तर उपाध्यांचे जवळ बळें देईन आसे बोलली. पुण्याची परवानगी येके पक्षीं येणार नाहीं. पेशजी शुचिश्रुवे[१] सोन्याचे विसाजी आपाजी याणी नेले ते तसेच जामदारखान्यांत ठेविले आहेत. होमहवने जालेले ब्राम्हणास द्यावे ते तसेच आहेत. उदार बुद्धि नाहीं. त्यांत आमची मर्जी कोण पाहतो. धोंडो खंडाजी विठल गोपाळ घन:श्यामसिंग याप्रमाणें बाजीराव आसे करून ठेविले आहे. मग इतके कशास पाहिजे. सारांश पुण्याची परवानगी मुहुर्तीविसी न आली तर पुण्यासच पाठऊं. प्रवालाचा गणपतीहि देणार; पाचेचे मोर पुण्यास श्रीमंतास पाठवावे. त्याजयोग्य आहे. त्यापक्षीं तिकडे पाठवावे अशा गोष्टी बाई बोलत होती. सेवेसी श्रुत होय हे विज्ञप्ति.

¶*Krishnaji Janardan reports that Anandibai wishes to dispose of the gold idols of certain deities which have a frowning appearance. Anandibai bewails her lot.*

No. 45] [31-5-1788

पौ छ १० सवाल सु॥

तिसा आशाढ.

श्री.

सेवेसी गोविंद कृष्ण गोडबोले कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. येथील वर्तमान ताा छ २४ साबान पावेतो क्षेम असे विशेष. श्रीमंत मातुश्री आनंदीबाई-साहेब याणी श्रीसांबाकडील सोन्याच्या मुहुर्ती उग्र आहित त्या ब्राह्मणास द्यावयाची

---

१ शुचिस्रुवा = पळी,

योजना केली त्यावरून पूर्वी सेवेसी विनंतीपत्र लि॥ आहे. त्याचें उतरी आज्ञा जाली कीं, सांबाजवलच्या मुहुर्ती बहुता दिवसाच्या देऊ नये म्हणौन विनंती करावी; त्याप्रो विनंती केली. त्यावरून हाली त्याणीच आपणास पत्र लिहिविले आहे ते अलाहिदा पाठविले आहे. पावेल. जसी आज्ञा होईल त्याप्रो विनंती करीन. कोंपरगाव येथील मुकामचे खर्चास रा जनार्दन गोपाल याजकडून पंनास हजार रुो देविले. परंतु मारनिलेनी पूर्वी मजला लिा होते कीं चालीस हजार रुो आम्हांकडून पावतील. तो मजकूर मी पुणियास लिा आहे. त्याजकडे यैवज असेल म्हणौनच पंनास हजार रु॥ देविले असतील. हाली त्याजकडे पत्रे पाठविली आहेत. उतर येईल ते सेवेसी लिहून पाठवीन. बहुत काय लिहावे. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना. राजश्री राघो केशव ठोसर यांस श्रीमंत मातुश्री बाईसाहेब याणी पत्र ल्याहावयांस सांगितले ते लिहून त्याची नकल पाठविली आहे. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Govind Krishna Godbole communicates Anandibai's wishes to have three golden idols disposed of.*

No. 46] [*12-6-1788*

पौ छ १० रमजान सु॥
तिसा जेष्ठ.

श्री.

सेवेसी गोविंद कृष्ण गोडबोले कृतानिक साष्टांग नमस्कार विज्ञापना. येथील वर्तमान ताा छ ७ रमजान पावेतो क्षेम असे विशेष. कोपरगाव येथील मुकामचे खर्चास यैवज कार्तिक अखेर पावेतो बेंगमी बाा द्यावयाचा आहे. त्यास राा जनार्दन गोपाल कारकून शहरास यैवजाचे वसुलास गेले आहेत. त्याजकडे सिलकेस यैवज किती राहिला असेल त्याचा शोध घेऊन लिहून पाठवणे म्हणौन आज्ञापत्र आले. त्यावरून मारनिलेकडे पत्र पाठविले. त्याचे उतर आले कीं पंनास हजार रुा सुभ्याकडून यावयाचे राहिले आहेत. ते वसूल करावयास दोन मास लागतील. तोंपावेतो आम्हांबरोबर पागेची घोडी वगैरे खर्च आहे. त्यास चंदीबाा व बारगीर गाडदी आहेत त्यास रोजमरा मिलोन दरमहा पाच हजार रुपयांचा खर्च आहे. त्यांस दोन मिहिन्याचे अजमासे दाहा हजार रुो लागतील. ते वजा करून बाकी चालीस हजार रुो दोन महिन्याचे सुमारे पावतील. याप्रमाणे लिा आहे. असो; हा यैवज देविल्यास जवलचे जवल पुढे उपयोगीं पडेल; परतु लाख रुपये पाहिजेत. त्यापक्षी निमे पंनास हजार पावेतो दुसरेकडून पावते

जाल्यास काम सोईस लागेल. पुढे निमे पंनास हजारास शहरचा यैवज काय येईल, तो ठीकच समयास पावेल असा पर्याय आहे. याजवर जसी स्वामीची आज्ञा येईल त्याप्रमो वर्तणूक करीन. सारांश पर्जन्य लागला नाही तों यैवज पावता जाला पाहिजे. येथील खर्चास यैवज द्यावाच लागतो. त्या[प]क्षी कांही नेहेमीची नेमणूक हरयेक माहाली केल्यास, नित्य नवी तरतूद करावी लागणार नाही; आणि येथीलहि सोय निघोन येईल. सर्व स्वामीचे ध्यानांत आहेच. वरचेवर यैवज पावता जाल्यास क्रम चालला आहे, हाहि चागलाच आहे. बहुत काय लिहावे. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶Govind Krishna Godbole requests supply of funds for Anandibai's expenses.

No. 47] [*12-6-1788*

पौ छ १० रमजान सु॥

तिसा जेष्ट.

श्री.

सेवेसी आपाजी राम सहस्त्रबुध्ये कृतानेक सा नमस्कार विज्ञापना. येथील कुशल ता छ ७ रमजानपावेतों स्वामीचे कृपेकरून सेवकाचे वर्तमान यथास्थित असे विशेष. स्वामीस येथील वर्तमानाची पत्रे पाठवितो ती प्रविष्ट होतच आहेत. उतरे देवावयाची आज्ञा असावी. पेशजी सबनिसीकडील कारकुनाचे नाते वाड्यांत आहे म्हणून येथून लिहून पाठविले होते; व सिलेदार मंडलीस भोजनास बागेत बलाविले वगैरे याचे उतर आले नाही; त्यास उतर देवावयाची आज्ञा असावी. श्रीमंत मातुश्रीबाईसाहेब जेष्ट शु॥ ८ अष्टमी बुध (वा ?) री आंबे याचे वृत करीत आहेत. खर्चास अजमासे रुो ४० चालीस पावेतो लागतील. बागेचे बंगल्यात भोज्यनास गेली. तेथे कृष्णाजीपत आबेकर व सबनिसीकडील रामाजीपंत पटवर्धन व यंक पुराणिक याप्रमाणे होते. स्वारी सिकारी देवदर्शनास जात येत आहेत. बाईसाहेब कुभारीस सोमवारी गेली होती. मागाहून सविस्तर लिहितो. सेवेसी शृत होय हे विज्ञापना.

¶Appaji Ram reports Anandibai's doings from Kopargaon.

No. 48] [*18-6-1788*

श्री

सेवेसी विज्ञापना ता छ ११ सावान पावेतो क्षेम असे विशेष. येथील खर्चा-वेचाचे वृत्त श्रुत करावयाचे आहे. भेटी जाल्यावर सविस्तर निवेदन होईल.

नित्यातील किरकोल कार्याकारण समजोन केले पाहिजे ते करीत आहेंच. त्याचा तपसील पूर्वापरसंमध स्वामीचे आज्ञेचा आहे. कदाचित उपाध्येबावाचे बालण्यांत खर्चाविसीचे बोलणे कांहीं निघाल्यास मी समक्ष असल्यावाचून समज पडणार नाही, यास्तव सू[च] नार्थ लि।। आहे. विशेष अर्थ नाही. परतु वहिवाट समजोन आज्ञा होणे ते जाली पाहिजे. हे चिठी गोप्यच राहिली पाहिजे. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना. याचे उतराचेहि कारण नाही. चिठी वाचिल्यावर ठेवावयाचेहि कारण नाही. हे [वि] ज्ञापना.[१]

¶*Govind Krishna Godbole to Nana Fadnis proposing a personal visit for arranging the expenses of Anandibai.*

No. 49] *[19-6-1788*

पौ छ २६ रमजान
सु।। तिसा.

श्री.

सेवेसी गोविंद कृष्ण गोडबोले कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. येथील वर्तमान ताा छ १४ रमजान पावेतो क्षेम असे विशेष. पाा धाधरफल येथील कमाविसीचा मजकूर तुम्ही व राजश्री धोंडोपंत मालेवाडीकर याणी लिहिला. त्यास धोंडोपंत याणी लिा कीं, कमाविसीने मजकडे सांगावी. कमाल आकाराप्रो बेरजेस आणून देऊ. कचा हिसेब सरकारांत समजाऊ म्हणौन लि।।; व तुम्ही मल्याने सांगावी म्हणून लि।।. त्याजवरून धोंडोपंतानी लि।। आहे हे बरेसे दिसते. येविसीचा दुसरा पर्याय काही तुमचे समजण्यात असिल्यास सविस्तर लेहून पाठवणे म्हणौन आज्ञा. यैशास मामलतीचे पर्याय दोन. त्यात मल्याने सागितली तत्रापि पर्जन्याचे स्वाधीन आहे. आपत्ती पडल्यास पुन्हा सुटीचा हिसका आहे. तशांत धोंडोपंत जुने कोठीतील. याचे करण्याची रीत आली-कडील काहीयेक करण्यास मिलावयाची नाही. यास कमाविसीने मामलत सांगितली असतां सरकार किफायत करावयास कमी करणार नाहीं. यास्तव कमाविसीनेच याजकडे मामलत सांगावी, हा पर्याय मजला चांगला दिसतो. येविसीची काय आज्ञा ते सत्वर जाली पाहिजे. बहुत काय लिहावे सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Govind Krishna asks Nana Fadnis the arrangement of the revenues of Dhadharfal.*

---

१ चिठी गोविंद कृष्ण गोडबोले यांजकडून

No. 50] [20-6-1788

पौ छ १० रमजान सुरु तिसा जेष्ट.

श्री

सेवेसी केसो माहादेव कृतानेक साष्टाग नमस्कार विज्ञापना. ताा छ १३ साबान परियेत स्वामीचे कृपेकरून सेवकाचे वर्तमान येथास्तित असे. राजश्री सिवराव पवार याचे पतक कोपरगावी चाकरीस आले; व रा धिराजी पवार याणी चाकरीस यावे ते अद्याप परियेत येत नाहीत. स्वामीची आज्ञा होती त्याजवरून त्याजकडेहि पत्र पाठविले आहे; परतु यावयाचा प्रकार काडीमात्र दिसत नाही. प्राा बाहाल येथील गावगना कही करून गाव खराब केले आहेत. घोडी वगैरे त्याजकडेस आहेत. स्वामीस कलावे म्हणोन लिहिले असे. इकडील वर्तमान उभयेता श्रीमंत सुखरूप आहेत. श्रीमंत मातुश्री बाईसाहेबहि बोलली कीं, आमचे व कारभारी याचे कधीं येकोपा होऊन चांगलें कधीं होईल ते पाहावें. काये निमित्य, असे किती दिवस वेगलेपणे आसावे, हे काही चागले नाहीं. मी उतर केले नाहीं. लटके उतर करून कलागत लावावी याजकरिता उतर केले नाहीं. पोवाराचा बदोबस्त स्वामीनी आज्ञा केली पाहिजे. सेवेसी कलावे म्हणौन सेवेसी विनंती लिहिली असे. बहुत काय लिहिणे. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Keso Mahadeo writes from Kopargaon an account of Anandibai's doings. She expresses desire to be reconciled to Nana Fadnis.*

No. 51] [23-6-1788

पौ छ १६ साबान
मु॥ समान वैशाख

श्री

सेवेसी विज्ञापना. येथील प्यादे कुलबिणी पुणियास जाऊन जेथे जसे पाहिजे तसे बोलतात. त्याजवरून येथील कारकून वगैरे याजकडे दोष काय समजण्यांत आले असतील, त्याचे फडशे स्वाम तेथील करीतच आहेत. कोणांकडे काय दोष हा पुर्ता समजोन, ज्याची त्यास सिक्षा जाल्याने येकक काम उलगड्यांत आले. येथील राहाण्यातील सेवटी फलश्रुत हीच आहे. होय नाही काही म्हणवत नाही. स्वामीचे पायासी निष्ठेने चालल्यास पार पडेल. चिंता नाही; परतु लाहान माणसाचे पगतीस बसावे लागते, हाच मृत्य आहे. असो; स्वामीनी पाहिजे तसे करावें. दोषियाचे पारपत्याचा संतोष आहे. सेवेसी श्रुत होय, हे विज्ञापना.

¶*Nana Fadnis' agent with Anandibai makes a complaint to him of the false reports that menial servants carry to Poona.*

No. 52] [24-6-1788

श्री

पैवस्ती छ १३ सवाल सुरु तिसा आषाढ.

सेवेसी कृष्णाजी जनार्दन कृतानेक शिरसाष्टांग नमस्कार विज्ञापना. तागाईत छ १९ रमजानपर्यंत मुकाम कोपरगांव येथें असें विशेष. दिनचर्येचें वर्तमान विनंतीपत्र लिहिलें आहे.

छ ६ साबान. सौभाग्यवती भागिर्थीबाई यांस समाधान नाहीं, म्हणोन आंतोजी फटांगरा जेऊरकर भगत बोलावितात. तो म्हणतों कीं तुमचे मागील नवस कांहीं तरी आहेत ते फेडावें म्हण जे चांगलें होईल. त्यास हें खरें; आमचे मागील नवस श्री त्रिबकेश्वर व सप्तश्रृंग व कोंकणांत हरिहरेश्वरास व गणपती पुळ्यांचा व ग्रामदेव ऐसें नवस पहिलेंच आहेत; परंतु म्हटलें तर लबाडी दिसतें. आणि आमचें अगत्य कोणास आहे? आणि देवास आमची आवस्ता सर्व ठाऊक आहे, असें बाई बोलत होती.

कलम १

छ ७ साबान पहिल्या ममता किंवा अगत्यें ही सर्व गेलीं. ते कसें तरी घरचे पुरूष होते. आतां कोण आहे? असें बाई बोलत होती. कलम १

छ ८ साबान. देवघरांत श्री सांबाकडील सोन्याच्या मुहूर्ती आहेत. त्यास सुवर्णाची मुहूर्त उग्र असते; त्यापक्षीं असों नयेत. ब्राम्हणास द्यावयाविशीं फार वेळ सांगितलें; परंतु कोणी न ऐकत. त्यापक्षीं आतां देण्यावसी उत्तर आणावें. नाहीं तर तुमच्या घरीं ठेऊं, असें उपाध्याजवळ बाई बोलत होती.

कलम १

छ ९ साबान. येकादशीस बाईनी वसंतपूजा केली. कोपरगांवचे व येथील ब्राम्हण पस्तीस होते. कलम १

छ १० साबान. पहिल्यानें भेटी जाल्या तेव्हां हरिपंत बहुत मर्यादेनें स्वछ बोलत आणि आम्हासहि फार भरवसा होता; परंतु त्याचें लक्ष दौलत रक्षणाकडें आहे. त्यापक्षीं दुसरें जाणत नाहीं. चांगलें आहे. असे चाकर मिळणें कठीण आहे; असें बाई बोलत होती. कलम १

१९-५-१७८८

छ १२ साबान. सोमवारनिमित्य बाजीराव यांची स्वारी सिंगेश्वरास गेली होती. बराबर केसो माहादेव व आपाजी राम होते. कलम १

छ १३ साबान. खिलार वगैरे जुनें फार होतें. घोडीं व सर्व सरंजाम स्वारीचे तयारीचा निवडक आम्हा-बराबर होता, तितका सर्व लूट केली. मोठी लढाई करून गर्नीम मोडला म्हणोन लूट केली. बरें, वस्तवानी जपून तरी न्यावी तेंहि जालें नाहीं; असें बाई बोलत होती. कलम १

छ १८ साबान. भागिर्थीबाई यांस समाधान नव्हतें. म्हणोन ब्राम्हण-भोजनाचा नवस केला होता. म्हणोन कचेश्वरीं बाई दोन प्रहरीं भोजनास गेली होती. पंचवीस ब्राम्हणभोजन जाहालें. बाहेर मंडप कनाता दिल्ह्या, तेथें बाईचें भोजन जाहालें कलम १

छ २० साबान. पूर्वी सुरतेमध्यें इंग्रजानें आम्हांस बहुत सुख दिल्हें. पूर्व-द्वेष होते, परंतु त्या द्वेषानें हालीं आम्हास कैदेंत ठेवावें तें कांहींच न केलें. तस्मात राज्याची आशी तऱ्हा असते कीं दुसऱ्या राज्यासीं वाईटपणा असल्यास त्यास युध्यामध्यें धरावें आणि परागंदा होऊन आल्यास त्याचें संरक्षण करावें असा धर्म आहे; असें इंग्रजानें केलें. आणि ब्राम्हणी राज्यामध्यें न्यायच नाहीं; असें बाई बोलत होती. कलम १

छ १६ साबान. गुदस्तां गंगेस पूर आला. असा यंदा आल्यास पहिल्यानें आम्ही मुलांसुद्धां बाहेर निघोन जेथें पाणी येत नाहीं तेथें जाऊं. येथें वाड्यांत राहाणार नाहीं; असें बाई बोलत होती. कलम १

बाजीराव संकट चतुर्थीस मौन करीत होतें. त्याचें उद्यापन केलें. कलम १

छ १७ साबान. बाईची स्वारी कोपरगांवास गेली. यज्ञेश्वरभट पुराणीक वाड्यांत असतात. त्यांची स्त्री प्रसूत जाली आहे म्हणोन समाचारास गेली होती. येत्यें समयीं कोठींचें घर नवें होत आहे तेथें पाहावयास गेली होती. कलम १

छ १९ साबान. सोमवारनिमित्य स्वारी तृतीय प्रहरीं बाजीराव यांची संवत्सरास देवदर्शनास गेली होती. आपाजी राम व केसो माहादेव यांचे चिरंजीव बराबर होते. कलम १

छ २१ साबान. आतां या मंडलांत शिंदा मात्र नामधारी आहे; त्याचें तेजानें येथें देखील दाब आहे. यांचेणें मोठें काम त्याशिवाय करवत नाहीं. आम्ही इतक्या पेंचांत पडावयास कारण शिंदा. सारांश कलियुगांत निमकहरामी केल्यानें येश येतें हें खरें; असें बाई बोलत होती. कलम १

छ २२ साबान. बाजीराव याची स्वारी सिंगेश्वरास देवदर्शनास गेली होती. नंतर घोडी फेरून आले. बराबर केसो महादेव व आपाजी राम होते.

कलम
१

छ २३ साबान. नानास या दौलतेचें सूख काय आहे ? घरांत मूलबाळ संसारिकाचें सूख तें नाहीं. दौलत तरी काय करावी ? उगीच डोईवर जी गोष्ट घेतली ती आतां उपाय नाहीं म्हणोन करितात; नाहींतर त्याचें सुख ते जाणत. त्यांत आम्हीमात्र सुखांतच आहों. नित्यखर्चाची काळजी किमपि नाहीं, असे बाई बोलत होती.

कलम
१

छ २४ साबान.

१ तृतीय प्रहरीं बाजीराव याची स्वारी सोनारीस देवदर्शनास गेली. येत्येंसमयीं हिंगणीकडून आले. बराबर आपाजी राम व केसो माहादेव होते.

कलम.

१ बाईची स्वारी गंगाप्रदक्षणेस गेली होती. संवत्सरास गेली तेथें रामचंद्र बलाळ केळकर भेटला. तो पुण्याहून प्रस्तुतच जयरामपंत बापटाकडून आला, म्हणोन त्याजवळ पुसत होती. तुझें आंगीं काय लागलें किंवा कसें जालें ? त्याजवरून बो(ल)ला कीं कांहीं लागलें नाहीं. उगेंच कैद करितात असें बोलणें जालें. कांहीं दुसऱ्याचें सांगितल्यावरून करितात; चौकशीनें खरेंपणा जाल्यानें सोडितात; असें आहे म्हणोन बोलत होता. नंतर स्वारी आली.

कलम
—
२

छ २५ साबान द्वादशीस दोन प्रहरीं भोजनास बाईची स्वारी व अमृतराव कोपरगांवीं पवारांचे बागांत गेली होती. त्यास प्रहर दिवसापासून स्वारीची तयारी जाली. बराबर जाधव व बांडे वगैरे होते. त्यांत कोणी उपाशी आहेत अशी गोष्ट निघाली; त्यावरून शिलेदार मंडळीस भोजनास बलाविलें.

१ हणमंतराव जाधव यांचा पुत्र.
१ बांडे.
१ शेख मिरा.
२ पवार.
१ वाघोलीकर जाधव.
३ शेला(क ?) रांचीं मुलें.
—
९

इतक्यांस भोजनास बलाविलें. भोजनसमयीं पंवारांची प्रार्थना केली कीं आम्ही ते धारेस होतों, तेव्हा पंवार याचा

छ २६ रोज सोमवारनिमित्य बाजीराव यांची स्वारी कुंभारीस देवदर्शनास गेली होती. टोंक्यास तुळा होणार ही गोष्ट निघाली होती. त्यावरून

भाऊपणा पहिला होता. त्यांस हें धनीपण्याचें जेवण नव्हें भाऊपण्याचें आहे; असें खिजमतगाराबराबर सांगून पाठविलें. भोजनें जाल्यावर बाहेर त्यांणीं विडे घेऊन स्वारी निघाली. बराबर केसो माहादेव होते. कलम १

छ २८ साबान. सूर्यग्रहणानिमित्य वाड्यांत दानधर्म जाला. भागिर्थीबाई यांचे राशीस वाईट होतें म्हणोन शांत जाली. कलम १

छ २ रमजानीं. भागिर्थीबाई यास ज्वर येत होता, तो कमी जाला होता. तो छ मजकुरीं मागती आला. कलम १

छ ४ रमजान. दोनप्रहरीं बाईची स्वारी हिंगणीस मुक्तेश्वरास गेली. नंतर गांवांमध्यें जनार्दनभट दिघे आहेत, त्यांचें घरीं गेली होती. नंतर कुंभारीस देवास स्वारी गेली. नंतर सायंकाळीं च्यार घटका दिवसास स्वारी आली. बराबर केसो माहादेव यांचे चिरंजीव जगंनाथ केशव होतें. कलम १

छ ८ रोज रमजान; बाईचें बोलणें.

१ माहायात्रेस जाण्याची गोष्ट निघाली. पूर्वी माधवराव असतां थोरली बाईचें जाणें जालें नाहीं. त्यापक्षीं आतां कोण पाठवितों ? घरांतील म्हातारी भोंवतें आहेत. नाना, बोलली कीं योग्य आहे. थोर आहेत. आम्हासारख्यांनीं काय करणें ? परस्वाधिनतेमध्येंच सारे दिवस गेले. मग होणें समजलेंच आहे. असें बाई बोलत होती. कलम १

छ २९ साबान. येथें खर्चाच्या नेमणुका जशा आसाव्या तशा आहेत. परंतु आमचा धनीपणा यांतच असतां तर आमची मर्जीनरूप होतें, तें नाहीं; त्यामुळें हीं माणसें सांगितल्याप्रमाणें करीत नाहींं; असें बाई बोलत होती. कलम १

छ ६ रमजान बुधाष्टमीचें व्रत केलें. त्यांस हें व्रत आठ बुधाष्टम्या पूजन करावें असें आहे. त्यास इतक्यास फार दिवस लागतात म्हणोन आतांच आठ पूजा करून उद्यापन केलें. बाईने केले. कलम १

छ ७ रमजान. पुण्याहून धोंडभट भागवत याजकडून परशराम कृष्ण काणे भागिर्थीबाईचे समाचारास आले होते. ते मागती जातें समयीं बाईकडें निरोपास आले. त्यास पुण्यास जातेसमयीं बोलणें जालें.

१ हरीहरेश्वर कोल्हापूर व पुळ्याचा गणपती व त्रिंबकेश्वर व सप्तश्रृंग इतके जागचे पूर्वीचे नवस आहेत, तेथें जाणें होत नाहीं म्हणोन घरांत शरिरास उपद्रव होतात ; अशी गोष्ट

व भाऊ व साहेब यांचे अलीकडे कोणी पराक्रमी नाहीं. माधवराव यांणी वडिलांस कैद केलें म्हणोन आतां कारभारी धन्यासच कैद करितात. या गोष्टी माधवराव याजपासून जाल्या, त्यापासून चालतात.

१ अमृतराव यास टाकावें याविशीं विसाजी बापू बोलत होता कीं निराळें ठेवावें; असें घरांत फोडीत होते. घर फोडणार सारे आहेत.

१ बाजीराव याची स्वारी हिंगणीस देवदर्शनास प्रहर दिवसास गेली, ती दोन प्रहरां आली. केसो माहादेव यांचे चिरंजीव व आपाजी राम होते.

३

छ ११ रमजान. कोपरगावीं माहादेवभट अग्निहोत्री याचें घरीं चतुर्मास्यें जालीं. त्यानिमित्य आवभृत स्नानास बाजीराव व आमृतराव व चिमाजी आपा व बाई व सावित्रीबाई व भागिर्थीबाई यांची स्वारी गेली होती. बराबर केसो माहादेव यांचे चिरंजीव व आपाजी राम ऐसें होते. येत्यें समयीं त्रिवर्ग तीन हतीवर किलाव्यांत बसलें होते.

कलम
१

छ १२ रमजान.

१ सरंजामी शिलेदार यांस भोजनास बलावीत जाउं नये, म्हणोन केसो माहादेव यांणीं बाईस विनंती केली, ही गोष्ट बाईनी आमृतराव यांजवळ बाळाजीपंत लेले वगैरें यांजवळ काढावी म्हणजे परस्परें नानाचें कानीं जाईल. येणेंकरून तरी जाणें होईल असें बोलली.

१ धोंडभट भागवत यांचे स्त्रीस येथें पाठवावें. दोन महिन्यांनीं जातील.

१ शिवशंकर शास्त्री यांस येथें पाठवावें.

३

छ १० रमजान; बाईचें बोलणें.

१ बाजीराव थोर जाले असतां अद्यापि मर्यादेची तऱ्हा नाहीं. कालचर्येस काय म्हणावें ? आम्ही पेचांत आणि मुलें अशीं. तशांत हा मुख्य. याची तऱ्हा अशी नसावी. याचें दैवानें चालतें आणि यांणी असें असणें हा दैवयोग आहे.

१ राज्यानें जुने कारभारी दूर करूं नये, अशी गोष्ट निघाली. त्यावरून बोलली कीं पूर्वी साहेबांस मी सांगत होत्यें कीं नाना व सखारामपंत व मोरोबा व हरिपंत इतक्यास निरोप देऊं नयें. उगेंच असणें. तथापि लष्करांत राहातील असें बोलणें जालें. त्यास या गरीबांनीं काय करणें ? असें उत्तर बोलिलें. त्यांणीं गरीबी काय करणें तें केली, हें आतां पाहावी.

१ येथें आलीकडें पायमली होते येथें सर्वांस कळलें कीं हे धनी नाहीं. हें सर्वांस समजलें यामुळें कोणी ऐकत नाहीं.

३

सांगितलें; आणि बाई बोलली कीं इतके संशय त्यास आहेत, त्यापक्षीं येथें कोणा कारभाऱ्यांस किंवा बाहेर कोणांस भोजनास बलावितो, त्यांसहि बलाऊं नयें असें असल्यास यांसहि बलावणार नाहीं; याविशीं बातमीच्या पत्रांत लिहावें म्हणोन मला बाईची आज्ञा जाली, त्याप्रमाणें लिहिलें आहे.

१ सायंकालीं स्वारी बाई बाजीराव यांची, सालगुदस्तां गंगेस पूर आला तेव्हां जेथें पाणी आलें नव्हतें त्याजाग्यांस गौखाना बांधितात, छपरें घातलीं, तेथें पाहावयास गेली होती.

१ पूर्वी पुण्यांत असतां साहेब उष्णा पाण्यानें अर्घ्ये देतात असी गोष्ट निघाली. त्यावरून चौकसी पाहातां देत नाहीं असें जालें. ही गोष्ट साहेबांचें कांनीं गेल्यावर बोलले कीं माधवराव सर्वशंकी जाला. हा फार दिवस वांचत नाहीं. सर्वशंकीपणा वाईट. अशीच नानाची तऱ्हा जाली आहे. असें असों नयें. याप्रमाणें बाई बोलत होती

—

३

छ १५ रमजान.

१ बाई चतुर्मासांत उपोषणें करणार आहेत. फराळाचे तरतूद पाहावयाविशीं आज्ञा जाली आहे.

छ १३ रमजान.

१ कोणास भोजनास बलाऊं नयें असें असल्यास बायकोस देखील भोजनास बलावीत नाहीं असें बाई बोलली.

१ बाजीराव खेळत होते, इतक्यांत उंदीर मेलेला सांपडला. त्यास धालप्या मेळऊन अग्न लाविली. असें मनस्वी खेळणें खेळतात.

१ उपाध्येबावा श्रीत्रिंबकेश्वरास गेले होते. ते आले. तेथें माहारुद्रकरून आले.

—

३

छ १४ रमजान. पहिल्यानें विसाजीबापू आला तेव्हां सांगितलें कीं तुम्हास जवाहिरखाना व तोफखाना या दोन कारखान्यांचा भ्रम आहे त्यापक्षीं हें घ्यावें. वरकड सरंजाम आमचे तुमचे विचारें जसें करणें तसें करुं, असें सांगितलें; परंतु कांहींच केलें नाहीं. उगीच धरावर केली. याणे आमचा व तुमचा दोघांचा नाश जाला. हेंच पहिल्याने समजून करतें तर ठीक होतें; परंतु आमची अमर्यादा करून डौल मोडले हें काय? असें बाई बोलत होती.
कलम
१

छ १६ रमजान. श्रीगंगेस माहापूर आला म्हणोन बाई व बाजीराव यांची स्वारी चापसरीकडे पाहावयास गेली होती. नंतर बाईनीं सायंकाली गंगेची पूजा केली.
कलम
१

१ बाळाजी विश्वनाथ फाटक होता, तेव्हां वाड्यांतील भाजी व दूध व फराळाचें जिनस वगैरें वाड्यांतील चौकशी वरचेवर पाहत होता. आतां कोणी पाहात नाहीं, असें बाई बोलत होती.

१ कोपरगांवीं ऋग्वेदी व यजुर्वेदी ब्राह्मण यांचा कजिया आहे; तो मनास आणावा म्हणौन बाईनी केसो माहादेव यांस आज्ञा केली आहे.

३

सप्तशतीचा पाठ बाई नित्य करित असतात. चातुर्मासांत नेम करणार आहेत. अमृतराव अष्टमी चतुर्दशीस नवमी इतक्या दिवशीं सप्तशती पाठ करीत असतात. कलम १

छ १७ रमजान. संकटचतुर्थी बाई व अमृतराव मौन करीत असतात.
कलम १

छ १८ रमजान

१ उदाजी शिंदा खिजमतगार पहिला बाजीराव याजकडे होता, त्याचा लाहानपणापासून धाक होता; आणि तो चांगला होता. औषधें व मंत्र विंचूचे वगैरें बहुत येत असत. वेळेस उपयोगीं पडत असें. त्यास निर्निमित्य घालविलें. असा होता तो वाईट जाला असें बाई बोलली.

१ येथें खिजमतगार व कारकून वगैरें माणसें आहेत. यातून आमची जो अमयार्दा करील तो कारभाऱ्यास चांगला वाटतो, हें काय? सारें कालानरूप आहेत.

१ मागील चौकांत येक आंगें पूर्वेकडें निमपडवींची गच्ची होत आहे.

३

सेवेसी श्रुत होय हे विज्ञाप्ति.

¶*Anandibai's words and actions are reported to Nana Fadnis from Kopargaon by Krishnaji Janardan.*

No. 53] [*29-6-1788*

पौ छ १० सवाल सु॥
तिसा आशाढ.

श्री

सेवेसी केसो माहादेव कृतानक साष्टांग नमस्कार विज्ञापना. ता। छ २४ रमजानपावेतो स्वामीचे कृपेकरून सेवकाचे वर्तमान येथास्थित असे विशेष. स्वामीकडून आज्ञापत्र येऊन वर्तमान कळत नाही. आज्ञापत्र पाठवावयास आज्ञा

जाहाली पाहिजे.. यानंतर हिकडील वर्तमान येथास्थित आहे. वरकड वर्तमान राजश्री गोविंदपंत याणी लिहिले आहे त्यावरून कलेल. येथील बंदोबस्त आज्ञेप्रमाणे राखून आहे. +श्रीमंत बाबासाहेब कांही कोणाचे लिहिणे याजविसी बहुत बोलतात, परंतु आईकत नाहीत. याजकरिता राजश्री राघोपंत याजला पाठविले पाहिजे. श्रीमंत मातुश्री बाईसाहेब नाना प्रकारे सिव्या सर्वास देत आहेत, की कारभारी आमचे आज्ञेत नाहीत. आम्ही त्याच्या कईदेंत आहो. जसे करतील तसे चालावे लागेल. सेवेसी श्रुत होय, हे विज्ञापना.

¶*Keso Mahadeo reports the bad manners of Bajirao.*

No. 54] [*30-6-1788*

पो १० सवाल सु।। तिसा आशाढ.

श्री

सेवेसी आपाजीराम सहस्त्रबुध्ये कृतानेक सां नमस्कार विज्ञापना. येथील कुशल ता छ २९ रमजानपावेतो स्वामीचे कृपेकरून सेवकाचे वर्तमान यथास्थित असे विशेष. श्रीमंत राजश्री बाजीराव साहेब याणी आठचार दिवस छंद घेतला कीं कोपरगावी पोवाराचे वाड्यात जाऊन राहाणें. कारण काय तरी साल गु।। माहापूर आला तैसाच सालमजकुरी येईल. त्यास विनंती केली की असा पूर वारंवार येत नाही. कालजी करू नये. श्रीमंत राजश्री बाईस पुसिले. उत्तर केलें की मी व आमृतराव जात नाही. मूल लाहान याजकरिता भितो. नंतर त्रिवर्गानी विचार केला कीं हे चांगले नाही. मंग त्याची समजी काढावयाकरिता राजश्री गोविंदपंत गोड(बो)ल यांजकडून विनंती करविली जे पुण्यास लिहून पाठविते. तेथून उत्तर येईल त्याप्रमाणे विनंती का. सारांश जावयाचे ठीक नाही. दोहो जागा चौकी पाहारा करावयास दोन ताण हे जाणून येथून जावयाचे चांगले नाही. परंतु वे।। राजश्री लक्ष्मणभट कर्वे उपाध्ये स्वामीस कोपरगावी जाण्याविसी लिहितील याजकरितां जाहाले वर्तमान सेवेसी लिहिले आहे. दोन जागां राहावयाची सोय चांगलीसी दिसत नाही. ऐसा माहापूरहि वारंवार येत नाही. सबनिसीकडील कारकून पुण्यास निघोन गेला. छ २२ रमजानी स्वारी कुभारीस गेली होती. वरकड मातुश्रीचे भाषण दिनचर्येचे कचे राजश्री कृष्णाजीपंत आबेकर लिहितात. बोलण्यात दिवसामध्यें काय बोलावे हे भानच राहत नाही. अनिवार भाषण

\+ येथून अक्षराचें वळण निराळें.

करित असतात. सोन्याच्या मुहूर्ती दोन देण्याचा आग्रह आहे. सेवेसीकचे वर्तमान राजश्री गोविंदपंत गोडबोले याणी लिहिले आहे. दुरुक्त बोलणे जे आपण सोन्याची तूला केली आणि आम्हास पाच सातशे रूपयाच्या मुहुर्ती देऊ देत नाही. ऐसे कितेक प्रकारे बोलली. सेवेसी श्रृत होय हे विज्ञापना.

¶*This is a daily report from Kopargaon about Anandibai. Bajirao anticipates high floods to the river and therefore entreats to be removed to a safer place. Orders for the same are solicited from Poona.*

No. 55] [*30-6-1788*

पो छ १३ सवाल सु।। तिसा आशाढ.

श्री

विज्ञापना. तागायत छ २९ रमजानपर्यंत मुकाम कोंपरगांव येथे आसें विशेष. दिनचर्येचें वर्तमान—

छ १९ रमजान.

१ धोंडो खंडाजी कवले गरीब बहुभाष्य मात्र होता. निरापराध कैदेंत आहे. बरें; तो त्यांचे पक्षांतील होता. आम्हीं तर कारभाऱ्याचे पक्षांतील होतों. आम्हांवर तरी निमित्य काय ठेविलें. निरापराध कैद केलें. त्यांत आमचे मुलींची देखील भेट होऊं दिल्ही नाहीं. पूर्ववयांत आली हेंहि पाहों दिल्हें नाहीं. यांसहि मुलें आहेत. नाना मात्र येकटे आहेत. हरिपंताचीं मुलें लेकरें आहेत. पेशजी हरिपंत आले तेव्हां विचारिलें. आसें होईल, हें ठाऊक नवतें आसें उत्तर केलें. यांचे मागील जन्मी मुलाबालास दुःख दिल्हें त्याचें उसणें

छ २० रमजान.

१ गंगेस पूर आला तेव्हां जेथें पाणी आलें नव्हतें तेथें गाईस छपरें घातलीं आहेत; तेथें बाईची स्वारी गेली होती. उंचवटा पाहून सभोंवते शेर लावावयाची ताकीद जाली आहे. बाई बोलली—

१ श्रीसांबाकडील सुवर्णाच्या मुहूर्तीविसीं बोलणें : देव फार दिवस आहेत; परंतु जेव्हांपासून जालें तेव्हांपासून वाईटच जालें. ज्यांजवल सोन्याच्या मुहूर्ती होत्या त्यांचें बरें काय जालें.

१ नारायणराव यांजवल गणपती होता.

१ या मूर्ती जाल्या त्यापासून.

—

२

याणी घेतलें. इतक्यानें जन्मांतर फिटलें आसें आम्हीं यांचे काय केलें होतें; परंतु त्यांत येक चांगलें झालें. मुल थोर जाली हें पाहिलें आसतें तर बहुत दु:ख होतें व पूर्वद्वेषांतून सुटलों. या दोन गोष्टी चांगल्या जाव्या ; आसें बाई बोलत होती.

१ मागील चौकांत भोजनशालेच्या ओटीवर बाजीराव यांचे स्मार्ताची खोली आहे ती मोडून दुसऱ्या कोनावर बाईचे खोलीचे आंगें करावी आसें बाईनी सांगितलें. त्यांस बाईचे खोलीजवल चौकीदार बसावयाची सोय नाहीं म्हणोन केली नाहीं. त्याजवरून बोलली कीं त्यांचे विचारास आलें तें केलें. यांची तेजें विशेषच आहेत म्हणोन यांचें चालतें. दुसऱ्याचे घरांत दुसऱ्याचेणे सोय होत नाहीं. ज्यांची त्यास सोय कलते. सारांश आमची मर्जी मोडावी हे मात्र आहे; आसें बाई बोलली.

१ पूर्वीं आम्हीं पुण्यांत आसतां लाहान मोठ्या कामास नाना आम्हांकडे येत असत. फार मर्यादशील आहेत. तेव्हां आमचें तेज त्यांजवर होतें. आतां तेच नाना, त्यांचे तेज आम्हांवर आहे. तस्मात् ईश्वरी आंश त्यांजवर जाला आहे. त्यापक्षीं आम्हीं त्यांस नवस करितों. जे थोर आहेत त्यांस नवस करित आसतात, म्हणोन आम्हीं यांस करितों. त्यांत

१ देव ब्राह्मणांस देऊन संस्थान मा[मो?]डणार कीं काय असें उपाध्ये बोलले. त्याचें उत्तर, देव दिल्यानें आसें होत नाहीं. आम्हांस सर्वस्व दान करावयाचेंच आहे. श्रीसांबाची मुहूर्त स्फटिकाची आहे. ही देखील देऊन मागती सुवर्णाची तूला करून घेऊं. येथें आम्हांजवल विशेष काय आहे. सर्व जवाहिर व दागिने मिलोन लाख रुपयेपर्यंत आहे; फार नाहीं. आमचीं पहिलीं जुनी भांडीं बारा ताटें ब्राह्मणाचीं व देवारा असीं मिलोन आठ दाहा पेटारे होते. पुण्याहून निघतेसमई दोन महिन्यानी माघारें जावयाचें सबब वोझ्याकरितां माघारी दागिनें व सनंगें पाठविलीं. आसें पुढें होईल हें समजलें नाहीं. त्यातुनहि धारेस व मुंबईस दागिने विकलें ! मुमईस साडे साहा लक्षांचें जवाहिर विकलें. आपलें हातें मोडलें तें चांगलें जालें. पुढें कोणी लूट करिता तर आम्ही काय करितो? आम्ही येत्येसमई जडावपाटल्या वगैरे दागिने होत होते. मागें काय जालें आसेल तें खरें. आसें बाई बोलली.

१ पहिल्यानें विसाजीपंत आला म्हणोन इतका नाश जाला. दुसरा कोणी येता तर इतकें न होतें. नानाची तऱ्हा इतकी आमर्यादेची नाहीं. आम्हांस लहानपणापासून

भेटी होण्याचा नवस करित नाहीं. दुसरा कांहीतरी नवस करितों; आसें बाई बोलली.

१ आमृतराव बाईस बोलले कीं तुमचें शरीर व मुख कालें दिसतें. पहिले सारिखें तेज नाहीं. आसी आवस्था कालानें केली. शरिरास देखील काली आली आसे बाई बोलली.

१ श्रीवर्धनची गोष्ट निघाली. त्यास तेथील सर्व वतनें जोसीपणा भटपणा सरकारांत होते ते ज्याचे त्यास द्यावे आसी गोष्ट पूर्वी जाली होती. त्याप्रमाणे जालें न जालें याचा शोध पुण्यांत गोदूबाईस विचारावा म्हणोन उपाध्येबावांजवल बाईनी सांगितले.

१ गंगेस पूर बहुत येईल. सालगुदस्तां फार आला होता, त्यामुलें बाजीराव याणीं भय घेतले आहे. कोपरगावीं जातों आसें म्हणतात.

६

छ २२ रमजान.

१ दोनप्रहरांनंतर स्वारी बाजीराव व आमृतराव मौजे सोनारी परगणें कुंभारी तेथें बहिरोबा देव आहे तेथें देवदर्शनास स्वारी गेली होती. सोमवारीं स्वारी गेली नवती, म्हणोन आज गेली.

१ बाजीराव याचे लग्नांत बागेमध्यें हौद बाधिले आहेत. तेथें बंगला करणार होते. मग कोण करितो? सिवराम रघुनाथ याणी बोलले होते. आतां कोण करितो, आसें बाई बोलली.

पुर्ती माहितगिरी आम्हांस आहे. सारांश दैवयोग हें खरें; असें बाई बोलत होती.

१ बाजीराव यांचे पत्रिकेंत आहे कीं याजवल वडिलांचे वेलेचें कांहीं राहू नये; परंतु येथें त्यांचेंच आहे. नवें कोणी दिल्हे नाहीं. पहिले मात्र घेऊन गेलें; आसें बाई बोलत होती.

१ मोर पाचेचे पुण्यास पाठवावयाचें ते चांगले करून पाठऊं. येथून ठेवावयास पाठवावयाचें नाहीं. माधवराव यांस पुजेस पाठवावयाचे. त्यापक्षीं चांगलें करून पाठवावें आसें बाई बोलली.

१ पाटी घालून वर घर बांधावयाचा नकाशा बाई काढित होती.

७

छ २१ रमजान.

१ पूर्वी आम्हांजवल लबाड होते व लाहानाच्या गोष्टी ऐकणे अशी तऱ्हा होती. त्यास आतां कमी काय आहे? उगेच दोष मात्र ठेवावे हें कलतें. श्रीमंताची तऱ्हा, कांहीं गोष्ट पकी समजल्यावांचून करित नवते. लोक उगेच दोष ठेवितात; आसे बाई बोलली.

१ भास्करभट पुराणिक यांस येथून पेशजीं धरून पाठविलें. तो पुण्यांत कैदेंत होता. नंतर त्याजवर दोष नाहीं आसें जाणून सोडून दिल्हा; परंतु

१ कैदविमोचनाचा मंत्र आम्हांस ठाऊक आहे. पूर्वी सदाशिवराव घोरपडा यास बिडी पूर्वी घातली होती, तेव्हां त्याणें जप केला. त्यास गुण आला. आम्हीं करणार आहों; परंतु कोण करितो? भावी चुकत नाहीं; आसें बाई बोलली.

१ आपाजी राम यांजवल बाई बोलली कीं, तुम्हीं आमचें ऐकता तर कैदच नवती. एकत नाहीं म्हणोन कैद आहे.

—

४

छ २३ रमजान बाईचें बोलणें.

१ बाजीराव फार खेलतात. यास कोणी जपत नाहीं. येथें कारभारी आहेत, यातून कोणी जवल आसावें तें नाहीं. मूल शाहाणें होऊं नये, असें सान्यांस वाटतें; असें बाई बोलत होती.

१ माधवराव आसेच. थोरलीबाई फार मारीत. परंतु रूबरू मर्यादा फार होती. बाहेर गेल्यावर मनश्वी करित. असे होते तरी थोरपणीं काय केलें. नानासाहेबाचे वेलचे होतें तें मात्र रक्षिलें. आधिक जालें नाहीं. घरांत वडिलांस कैद केलें. विरुध्दें वाढविलीं इतकें मात्र केलें. हा बाजीराव तर फारच आरवाचपणा करितात.

पहिल्यानें चौकसी न करितां धरून कसें पाठविलें? आसें नानानी कसें रागें भरून लिहिलें नाहीं? त्यांतहि नानांजवल रुबरू गोष्ट गैरवाजवी होत नाहीं. आशा गोष्टी कर्णोप-कर्णी कलतात म्हणोन आसें होतें; आसें बाई बोलली.

१ खोटेपणा केल्यावांचून प्रतिष्ठा वाढत नाहीं. उगेच यांस कोण पुसतो म्हणोन लबाड्या करितात असें येथील कारभाऱ्यांस बाई बोलत होती.

१ येथें बाजीराव यांजवल शाहाणा माणूस कोण ठेविला आहे, तरबेद किती जाले हे कललें आहे. मूल नासून टाकलें हें काय जालें? कार-भाऱ्यांजवल कोणी लबाड नाहीं म्हणोन आसें जालें; आसें बाई बोलली.

१ बाजीराव याची स्वारी सोमवारीं जावयाची होत आहे. त्यांत पर्जन्या-मुलें येकादे सोमवारीं जात नाहीं म्हणोन जावयाची गोष्ट काढिली: त्यावर केसो माहादेव बोलले कीं चांगली उघाड पडली म्हणजे जावें. त्यावरून बाजीराव बोलले कीं यांचे डोले फिरले आहेत. बाई बोलली कीं फुटले नाहीं म्हणजे फार आहे.

१ थोरलीबाई माधवराव यांस बुद्धिवाद बहुत सांगत. त्यांतहि घर फोडावयाच्या गोष्टी सांगत असत. सराफी बुद्धि होती.

३

छ २४ रमजान येकादसीस स्वारी गेली.

१ दोन प्रहरानंतर गंगाप्रदक्षणेस बाई व सावित्रीबाई व भागिर्थीबाई ऐसीं गेलीं होतीं. सावित्रीबाई सवछराजवळून माघारी आली; बाईची स्वारी सायंकाली आली. जगनाथ केशव बरोबर होते.

१ त्रितीय प्रहरीं बाजीराव अमृतराव यांची स्वारी कुंभारीस देवदर्शनास गेली होती. बराबर केसो महादेव व आपाजी राम होते.

२

१ बाईची शरीरप्रक्रत आलीकडे महिनाभर ठीक नाहीं आसी गोष्ट निघाली. चातुर्मासांत उपोषणें कसीं होतील ? त्यावरून बोलली कीं आम्ही तसींच करूं. कोणी बोलल्यास परिछिन्न ऐकणार नाहीं. आज येथें प्रयाग मानिल्यास कोणी म्हटलें तर मानणार नाहीं. मी कोणाची धनीन नव्हें आणि माझे कोणी चाकर नवत. कांही केले तरी मला कोणी बोले असा नाहीं ?

१ चिमाजी आपा यांचा उजवा कान दुखत आसतो. आंत फोडे जाले आहेत.

७

सेवेसी श्रृत होये हे विज्ञाप्ति.

¶*Daily doings and utterances of Anandibai are profusely illustrated and reported to Poona.*

No. 56] [*1-7-1788*

पौ छ २ सवाल सु॥
तिसा आशाढ.

श्री

सेवेसी गोविंद कृष्ण गोडबोले कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. येथील वर्तमान ताा छ २६ रमजानपावेतो क्षेम असे विशेष. श्रीमंत सौ भागिर्थीबाई यांस ताप येत होता, याजकरितां दोन महिने माहेरास आल्याने ठीक पडेल म्हणौन वो राजश्री धोंडभट भागवत म्हणतात. याजकरितां तुम्ही श्रीमंत मातुश्री बाईसाहेबांस विनंती करून त्यास माहेरास यावयाचा सरंजाम देऊन

रवानगी करावी म्हणून आज्ञा केली त्यावरून विनंती केली. बाईसाहेबांनी उतर केले कीं प्रस्तुत ताप चागला बरा जाला. येथील हवेपेक्षा पुणियाची हवा मानते असा अर्थ नाही. भाद्रपदमासी त्यांस पदर घालावयाचा आहे. दीपवालीस त्याचे बंधू येथे येतील, त्यांस भाऊबीज करून पुणियास जावे येसे त्याचेहि मानस आहे. याजकरितां तूर्त पाठविली नाही म्हणौन ल्याहावे, त्याजवरून सेवेसी लि॥ आहे. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Bajirao's wife Bhagirathibai is reported to be getting fever, and therefore recommended to be sent to her father's after the Diwali.*

No. 57] [*2-7-1788*

पौ छ १० सवाल सु॥
तिसा आशाढ.

श्री

सेवेसी आपाजी राम सहस्त्रबुध्ये कृतानेक सां नमस्कार विज्ञापना. येथील कुशल ताा छ २७ रमजानपावेतो स्वामीचे कृपेकरून सेवकाचे वर्तमान यथास्थित असे विशेष. श्रीमंताची स्वारी कुमारीस जाऊन आली. वरकंड श्रीमंत सौ भागिर्थीबाईस दसरेयापावेतो पाठवीत नाही म्हणून श्रीमंत मातुश्रीनी सांगितले. श्रीमंत राजश्री बाबासाहेबास कोपरगावी जाऊन राहाण्याविसी स्वामीस पत्र राजश्री उपाध्ये याणी लिहिले. नंतर मातुश्रीनी सांगितले कीं पुण्यास लिहून पाठऊ नये; कोपरगावी जावयाचे नाही; त्यावरून पत्र लिहिले ते तैसेच राहिले. वाड्यात आम्रभोजन ग्रहस्त मडली वगैरे बोलाविली होती. सेवेसी शृत होय, हे विज्ञापना.

¶*Appaji Ram reports Bajirao's departure for Kopargaon having been cancelled.*

No. 58] [*15-7-1788*

पौ छ २९ सवाल सु॥
तिसा आशाढ.

श्री

सेवेसी आपाजी राम सहस्त्रबुध्ये कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. येथील कुशल ताा छ ११ सवालपावेतो वर्तमान यथास्थित असे विशेष. येथील मजकूर,

श्रीमंत मातुश्री बाईसाहेब सनसितीचे पोथींचे वाचावयास प्रारंभ केला. दोन चार दिवस ब्राह्मणाकरून वाचऊन पुराणासारखे श्रवण करीत होती. हाली पंधरा दिवस आपणच वाचू लागली. याजकरिता त्रिवर्गानी वो राजश्री लक्ष्मण-भट कर्वे याजकडून विनंती करावयास सांगितली जे, सनसिती नेहमीच आपण वाचू लागला याचे कारण काय ? तेव्हा उतर केले की आम्हास भुताचा उपद्रव होतो, याजकरितां वाचितो. त्याजवरून बहुत क्रोधायमान होऊन मनमाने तसे अपरमित भाषण केले. कोणास काय बोलावे हेहि भान राहिले नाही. पुसावयास गेले असता राग आला तो ईश्वर जाणे. बोलणं बोलली ती किती ल्याहावीं ? नंतर राजश्री गोविंदपंत गोडबोले याणी च्यार गोष्टी बोधाच्या व काही जरबेच्या सांगोन शांतवन केले. परंतु क्रोधामध्ये याची मर्जी कोणत्ये तरेस जाईल हे कोणासच समजेनासे जाहाले. त्यास राजश्री गोविंदपंत गोडबोले याणी दोन घटका मातुश्रीपासी भाषण केले, त्यात काही बोध व जरब दाखऊन मर्जी ठिकाणी आणिली. त्यास च्यार पाच दिवस जाहाले. त्या वेळेपासून पूर्वस्थितीवर आहेत. जाहाले वर्तमान सेवेसी लिहिले आहे. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶Anandibai is reported to have gone into furious excitement, which it took long to pacify.

No. 59] *[21-7-1788*

पैा छ २२ सवाल सु॥
तिसा आशाढ.

श्री

सेवेसी आपाजी राम सहस्त्रबुध्ये कृतानेक सा। नमस्कार विज्ञापना. येथील कुशल ता। छ १७ सवालपावेतो स्वामीचे कृपेकरून सेवकाचे वर्तमान यथास्थित असे विशेष. वो राजश्री लक्ष्मणभट उपाध्ये याजसमागमे श्रीमंत मातुश्री आनंदीबाई याणी राजश्री हरिपंततात्यास पत्र गोविंदपंत गोडबोले यांजकडून लिहिविले, त्याची नकल करून स्वामीकडे पाठविली आहे त्यावरून ध्यानास येईल. येथे पत्र न ल्याहावे तरी मर्जी ठीक राहांत नाही; याजकरिता लिहिणे प्राप्त आहे. विनंती करावयास गेले असेता राग येतो आणि भाषणे नाना प्रकारची करीत आहेत ती पत्री लिहून कोठवर कलवावी ? पत्री लिहिले जे, हाली तुफानेहि घेऊन लागले; याचा विस्तारे करून उपाध्ये निवेदन करितील. रा। रावोपंत ठोसर यास

तैनातेचा बंदोबस्त करून देवावयाचा तो देऊन निरोप देवावा. कारण मारनिले येथे असलियानें उभयंता श्रीमंताचे प्रकृतीस जपत असतात. बोलापच्यारास सुज्ञ आहेत याजकरिता विनंती लिहिली आहे. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Appaji Ram to Nana Fadnis : reports the excited temper of Anandibai.*

No. 60] *[21-7-1788*

पौ छ २९ सवाल सु॥ तिसा आशाढ.

श्री

सेवेसी केसो महादेव कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. ता। छ १७ सवालपावेतो क्षेम असो विशेष. श्रीमंत राजश्री आपासाहेब याचा कान फार दुखतो, पाणी वाहात असतें. राजश्री राघोपंत ठोसर आपासाहेबास पहिल्यापासून ओशध तेच देत होते. त्यास हाली वैद्य ओशधे देत आहेत. परंतु प्रकृत ल्हानपणापासून प्रकृत त्यासच माहीत आहे. व श्रीमंत राजश्री बाबासाहेबाचे लिहिणे पढणे तें गेल्यापासोन येथास्थित होत नाही. याकरिता राघोपंत ठोसर याचा बंदोबस्त करून पाठऊन देण्याविसी आज्ञा जाहली पाहिजे, म्हणजे येतील. श्रीमंत मातुश्री बाईसाहेब सतसितीची पाठ करू लागली हे आम्हास समजल्यावर आम्ही त्रिवर्ग जाऊन विनंती केली ते यकीकडेच राहिले. आम्हावर मनस्वी रागे भरली ते पत्री लिहिता येत नाही. त्यावरून बाईनी श्रीमंत राजश्री हरिपंत-तात्यास कागद ल्याहावयाविसी आज्ञा राजश्री गोविंदपंत यास केली. त्यावरून विनंतीहि केली, परंतु रागसा दिसोन आला. त्यावरून त्याणी कागद तात्यास लिहिला. त्यामधे की, आम्हावर तुफाने उचलू लागले आहेत ऐसे लि॥ आहे. त्या कागदाची नकल गोविंदपंतानी सेवेसी पाठविली आहे त्यावरून सविस्तर सेवेसी श्रुत होईल. येविसीचे सविस्तर वर्तमान वो। राजश्री लक्ष्मुमण भट उपाध्ये बाईची. आज्ञा घेऊन आले आहेत ते सविस्तर विनंती करितील. होईल वर्तमान सेवेसी लिहून पाठवीन. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*Keso Mahadeo reports to Nana Fadnis news of Anandibai and her sons Bajirao and Chimaji, complains about their behaviour, and mentions the excited talks of the lady.*

No. 61] [21-7-1788

पौ छ २९ सवाल सु॥
तिसा आशाढ.

श्रीरू

सेवेसी विज्ञापना. ताा छ १७ सवाल पावेतो क्षेम असे विशेष.

पाा दहीवेल येथील आपत्तीचा[1] यैवज राा पांडुरंगपंत आचवल याणी मजुरा घेतला तो तफावतीत निघाला. ते समई पांडुरंगपंत याणी पत्र पाठविले की, आपत्तीचा यैवज माघारा घेऊन मामलत मजकडे ठेवावी. त्यावरून जो कोणी बोलावया आला होता त्यास निरोप देऊन मामलत पांडुरंगपताकडे ठेविली. यैसे जाले असतां पांडुरंगपतानी स्वामीस विनंती केली की, जो तफावत लागू करणार त्याची निशा घ्यावी. त्यावरून स्वामीनी आज्ञापत्र पाा होते, त्याचे उतर मी लि॥ की, पांडुरंगपंताचे पत्रावरून निशा पांडुरंगपंताकडे जाली त्यास येक महिना जाला. तो ग-हस्तहि उठोन गेला. आता निशा दुसरी कोणाची घ्यावी ? त्याजवर आज्ञा जाली की, पांडुरंगपंताचे दस्तयैवजी पत्र आहे ते पाा. त्यावरून पेशजी पत्राची नकल पाठविली आहे ते पावली असेल. त्यास फार दिवस होत आले, त्याचे उतर समजले नाही. कोणी तफावत कोणावर बोलला ते गोष्ट न आइकली, न केली, तरी दोष येणार. पांडुरंग-

श्रीमंत राजश्री बाबासाहेब यास धार्योअग्निनिमित्य अग्नीस[2] दक्षणा व पिंडपितृयज्ञ वगैरे मिळोन सालिना शंभर रुपयांत करावे म्हणून आज्ञा जाली. त्या प्राो नेमणूक केली, खर्च चालला आहे. कलम १

श्रीमंत राजश्री आपासाहेब व श्रीमंत सौ भागिर्थीबाई यांस तथी पर्वणीस वगैरे खर्च करावा लागतो, तो मी समजोन कार्याकारण करीत आहे. येकंदर सालाचा खर्च आकारेल त्याप्राो नेमणुकेची याद मी आलियावर करून घेईन. येथील खर्चाचे अजमासे यास किती असावे तो अजमास ध्यानास आणून कर्तव्य ते केले आहे. कलम १

श्रीमंत मातुश्रीबाई साहेब याणी मोर पांचेचे पिसाऱ्याचे श्रीमंत राजश्री रावसाहेब यास देवपूजेसमई देव मांडावयास पाठवितो म्हणौन पूर्वी पत्र ल्याहावयास आज्ञा केली त्यावरून मी सेवेसी लिा होते. त्याचे उतर आले की, मोर पाठवावे. हाली उपाध्ये

१ दुष्काळांत घेतलेला ऐवज.

२ अग्नीचें नांव.

पंतानी यैवज माघारा देतो म्हणौन लिा असता घ्यावयास बल लागले. असो. धण्याचे धन्यानी हरयेक समजोन बक्षीस केले तत्रापि चिंता नाहीं. परंतु पत्री काही येक आज्ञा जाली पाहिजे. कलम १

जाऊ लागले तें समई जडावाची झारी व तबकडी पूर्वीपासून सांब मांडून पूजा करीत होते ते आम्ही रावसाहेबास पूजा करावयास पाठवितो ; आताच उपाध्याजवल द्यावी म्हणौन सुकेश्वराचे देवलांत आणून त्याजवळ देऊ लागली आणि श्रीमंत राजश्री बाबासाहेब याचे नावे पत्र रावसाहेबास लिहिणे म्हणौन फार आग्रह केला. परंतु आज्ञा नसता पत्र लिहिणे ठीक नाही यास्तव लिा नाही. याची आज्ञा जाली पाहिजे.

सदरहू च्यार कलमाचे उतरी आज्ञा जाली पाहिजे. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Orders are asked from Nana Fadnis on several points in connection with the arrangements of Anandibai.*

No. 62] [*22-7-1788*

पौ १० जिल्काद सुा सन तिसां.

श्री

सेवेसी कृष्णाजी जनार्दन कृतानेक सिरसाष्टांग नमस्कार विज्ञापना. तागायत छ २९ सवालपर्यंत मुक्काम कोपरगांव येथें असो विशेष. येथील दिनचर्येचे वर्तमान :

छ १९ सवाल.

१ तृतीय प्रहरी बाईची स्वारी गौशाळा नवी जागा बांधिली आहे तेथें गेली होती.

१ बाजीराव याची स्वारी याच आंगे गंगेच्या काठानें फिरत फिरत स्वारी आली. आपाजी राम व केसो महादेव यांचे चिरंजीव त्रिंबकराव बराबर होते.

—
२

छ २२ सवाल. बाई बोलली :

१ साहेब यांचे पुण्य शरीर पंधरावे वर्षी गुजराथ प्रांतीं गेली आणि चौथाई बसविली. मोठी लढाई इतके दिवसांत या सिवाय फत्ते कोणी केली नाहीं. गोहोदचे स्वारीस नाटकशाळा बालगिल्या तेव्हांपासून बुद्धीस आंतर पडले. बराबर कारभारी सखारामपंत व त्रिंबकराव होते. हे दोहोकडे दोवे बोढू लागले त्यामुळें आपेश आले.

छ २३ सवाल रविवासर.

१ पुढील सदरेच्या ओटीवर गाय बांधली होती ती अकस्मात भयभीत होऊन मोठ्यानें शब्द केला. प्रथम प्रहर रात्र जाली होती.

१ वाड्यास पूर्वचे आंगे भिंतीस मोहोल लागले होते ते काढून टाकिले. शांत करणार आहेत.

—
२

छ २४ सवाल इंदुवासर.

१ तृतीय प्रहरी श्रीकचेश्वरास स्वारी बाजीराव व आमृतराव नावेंतून बसून गेले होते.

१ युध्यामध्यें परस्परे वर्मशब्द बोलतात तेणे करून लढाई जमते, आशी गोष्ट निघाली. त्यावरून बोलली, पूर्वी त्रिंबकराव मामाची लढाई जाली ते दिवशीं आसेच जाले, आसे बाई बोलली.

—
२

चतुर्मासांत दुसरे गंगास्नान निमित्य होत होते. परंतु कधी कधी शरीर स्वस्त नसते म्हणोन जात नाहीं. स्वस्त असल्यास नित्यात स्नान होते.
कलम
१

उपाध्ये गेले तेव्हां बाईचे बोलणे जाले कीं, येथें आम्हाजवळ मनुष्यें पांच वर्षे नेहमी आहेत. आमची चाल किंवा रीत ही सर्वास कळली. तेव्हांपासून श्री राहिली नाहीं. दिवसे दिवस कमी जाहाले.

१ पूर्वी नानासाहेब यांचे चित्तात कीं, ही दौलत कोणाचे दैवानें चालत्ये हे कळेना. याजकरितां वेगळे स्वारीस पाठवावें. त्याजवरून वेगळे पाठवित असत. भाऊसाहेब व विश्वासराव व त्रिंबकराव व पुरंदरे व समशेरबहादर इतक्यास फौजा देऊन पाठविले परंतु याणी विशेष केला नाहीं. बाबा फडणीस यास कोठे पाठवित तेथें चांगले करून येत. त्यावरून दैववान् असे म्हणत. येथें गोविंदपंत गडबोले आहेत हेहि कलपक चांगले आहेत. मोठ्या कामास पडल्यास शहाणपणे करितील. आसेच पहिले चिंतो विठ्ठल होते. शहाणपणा पाहून वाढविले. आतां चांगले माणूस कोणी राहिले नाहीं. उतरास उतर करी असा हरिपंत आहे. शहाणे माणसे कोणी नसतां चालले आहे हे माधव(रा)याचे दैवाची सीमा आहे. मोठा पुण्यपुरुष आहे.

—
२

राजश्री बाजीराव विद्याभ्यास लिहिणे पढणे याविसी अनमान करितात. गंगेस स्नान समई पोहोणे व बाईनी रागे भरले असतां मानूं नये आशा

त्यात आमचे त्याचे चांगले जाल्यानें यांचे रोजगार चालणार नाहीं म्हणोन येथील चा(हा)ड्या सर्व बातमी सांगतात. दिवसे दिवस वाईट जाल्यानें चांगले आहे. अत:पर आम्ही अधिक उणेच बोलत नाहीं. उपाध्यानीं असेच सांगितलें. कलम १

तऱ्हा आहेत. पूर्वी राघो केशव ठोसर याचा धाक चांगला होता. तेव्हां असे नव्हते. आलीकडे विशेष खेलतात. कलम १

सेवेसी श्रुत होय हे विज्ञाप्ति

¶ *Anandibai's and Bajirao's doings, health and study and their utterances are reported in this letter to Nana Fadnis at Poona.*

No. 63] [*23-7-1788*

पो छ २२ सवाल

सु॥ तिसा आशाढ.

श्री

सेवेसी आपाजीराम सहस्त्रबुध्ये कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. येथील कुशल ता छ १९ सवालपावेतो स्वामीचे कृपेकरून सेवकाचे वर्तमान यथास्थित असे विशेष. श्रीमंत राजश्री बाजीरावसाहेब आषाढ शु॥ १५ पोर्णिमापासून चार मास नेम केला, मौनवृत धरिले आहे. सूर्योदयापासून सूर्यास्तपावेतो बोलत नाही. त्रिवर्गानी मिलोन विनंति केली जे, या वयात मौनवृत धरावयाचे दिवस नवत. त्यात चार मास नेम हे चांगले वाटत नाही. परंतु त्यांची मर्जी कोणाचे समजोन सांगितलियाचे ध्यानात येऊ नये. सोमवारी श्रीकचेश्वरी नावेत बसोन दर्शनास जाऊन आले. समागमे मी होतो. पेठ येवले येथील अमलाकरितां राजश्री विठलराव रामचंद्र आंबीकर व पेठ मजकुरचे पाटील होलकर याजकडील गुमस्ते कज्यांस प्र[व]र्तेल आहेत. उभयतानी मिलोन पाचपाचशे माणसे सिबंदी ठेविली आहेत. जेजाला व जंबुरे येकदोन जमा केले आहेत. येथोन पत्रे कारकून मानिलेकडे पाठविले की, सिबंदी दूर करून जाबसालाने जे कर्णे ते करीत जावे. त्यास उभयतांस ईर्[१] जे आगोधर कोणी लोक उठवावे त्यात आंबीकर उठवितील परंतु गुमस्ता मजकूर बोलतो जे, आम्ही हे वर्तमान होलकर यजमानास

---

१ ईर्षा.

लिहिले. तेथून आज्ञा येईल तैसे करू. सारांश कोपरगावापासून पाचसाहा कोशावर, याजकरिता समजले वर्तमान सेवेसी लिहिले. आज्ञा जाहालिया तोफा व जेजाला घेऊन येऊ. आढलली गोष्ट कलविली. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Appaji Ram reports that Bajirao observes complete silence during the day and that Ambikar and Holkar Patil have started troubles not far from Kopargaon.*

No. 64] [*23-7-1788*

पो छ २९ सवाल तिसा.

श्री

सेवेसी कृष्णाजी जनार्दन कृतानेक सिरसाष्टांग नमस्कार विज्ञापना. तागायत छ १९ सवालपर्यंत मुक्काम कोपरगांव येथें आसे विशेष. दिनचर्येचे वर्तमान :

छ २६ रमजान. वाड्यांत आग्निहोत्राकडे चतुर्मास्यें जाली तेव्हां ब्राम्हणभोजन जाले. त्यास बाईंचे बोलणे कीं, शंभर ब्राम्हणभोजनाविसी पुण्याची आज्ञा पुसावी. इसका घेणार नाहीं. गरीबांचे घरीं जाली तर सामर्थ्याप्रमाणें करितात आसें बाई बोलली.

कलम १

छ २८ रमजान. पूर्वी आम्हाजवल फौज थोडी होती आणि हरिपंताजवल फौज फार होती. परंतु रुबरु गांठ कधींच घातली नाहीं. यांस शूरत्व नाहीं. दैव मात्र चांगलें आहे असें बाई बोलली.

कलम १

छ २७ रमजान.

१ उपश्रुत महायात्रेस जाण्याविसी बाई पाहिली. त्यांत उत्तरे आले कीं, धीराधीरान होईल आसें आलें.

१ पूर्वी साहेब नारायणराव यास गोहोदचे स्वारीस जातेसमई नेत होते. तेव्हां बाईनीं अनमान केला. जिकडील तिकडे ममता हे जाणोन दत्तपुत्र घेतला. पुढें माधवराव याणी बाईस शब्द लाविला अशी गोष्ट बाई बोलत होती.

२

छ २९ रमजान. पूर्वी दुर्गाबाईचे लग्नांत सोयरे मंडळी आली होती. त्यास द्यावयाविसी नारायणराव रुबरु सांगून

छ १ सवाल. बंदिविमोचनाचा मंत्र आम्हास ठाऊक आहे. पूर्वी मुंबईमध्यें सदाशिवराव घोरपडे यांजवर पेंच आला तेव्हां आम्हीं त्यास सांगितला होता. त्यास गुण आला. आम्ही करणार होतो, परंतु भावी चुकत नाहीं हा निश्चय आहे. त्यापक्षी जपानें काये होतं असें बाई बोलली.

कलम १

छ २ सवाल. सप्तशतीचा पाठ करण्याविसी बाई व आमृतराव बोलत होते कीं प्रारंभीं मधें व आंती असा नवार्णवाचा मंत्राचा जप करावा, असें बोलत होतीं.

कलम १

छ ४ सवाल. बाईचे बोलणें :

१ सालगुदस्ता गंगेस पूर आल्यापासून केली व पेरू फराळाचा जिन्नस मिलत नाहीं. यावरून बोलली कीं जुनराहून केली बालाजी विश्वनाथ फाटक होते तेव्हां येत आसत. आता आणित नाहीं. आंबे वर्षाप्रमाणें नाहीं. नाशिकास फार आहेत परंतु आणित नाहीं. साल गुदस्ता आंबरस एक वेल जाला; यंदा दोनवेला जाला, तथापि आसे बोलणे आहे.

पाठवित कीं, कोणास काय देणे ते द्या. अशी तऱ्हा होती. हे सर्व कृष्णराव काले यास ठाऊक आहे. आम्हाकडे राबऱ्यांत फार असत. त्या आलींकडे नानासहि पुर्ती माहितगिरी आहे. परंतु दैवयोग हे खरे आसे बाई बोलली.

कलम १

छ ३ सवाल. शुक्रेश्वरी आग्निहोत्री आहेत, यांजकडे चतुर्मास्यें जालीं. त्यास बाजीराव व आमृतराव प्रातःकाली च्यार च्यार घटका जाऊन बसत. आज त्याजकडे आवभृत स्नान जालें म्हणोन सर्व खाशी गेली होती.

कलम १

छ ५ सवाल. बाई आस्पर्श जाली. बागांत गेली होती.

कलम १

छ ६ सवाल. सप्तशतीचा पाठ यांत जप हे कामानिक अनुष्टान काये आहे, असें बाईजवल केसो महादेव व फडणीस व आपाजी राम असे बोलले. त्यावरून बाई बोलली कीं, आम्ही नानास वाईट करितो असे कोणी सांगितले? अशाच आमच्या लबाड गोष्टी तुम्हीच लावितां आणि दिवसेंदिवस अधिक पेच पाडितां. आसे अर्ज कशास करितां असे बहुत बोलून रुबरु रागे भरून शिव्या दिल्ह्या

कलम १

१ केवड्याची लाखोली वाहेची, परंतु कोठे मिळत नाहीं हे काय? समर्थास उणें काय आसते? मागें सिताव खेड्याचें मुक्कामी जांबगांवची डांक फुलास ठेविली होती. आतां ठेवणे तर नानास पुसिले पाहिजे. पुसल्यावर परवानगी होणार नाहीं.

१ आपा साहेबाचा कान दुखत आहे. त्यानिा जेऊरकर अंताजी फटागरा भगत आणिला तो बोलिला कीं, तुमचे घरांत देव आहे, त्याची उर्जा होत नाहीं, त्यामुलें दुखणे होते. त्यावरून उपाध्याजवल गोष्ट काढली. श्रीव्यंकटेशाच्या मुहूर्ती जुन्या पुण्यांत आहेत, त्याची वर्षामध्यें समाराधना किंवा अनुष्टान हे कांहींच होत नाहीं, हे आम्हास बाधते. अशा-वरून बोलली कीं, श्रीव्यंकटेशपंचा-यतन मुहूर्ती नाशिकाहून आणाव्या असा बेत जाला.

३

छ १४ रोज सवाल. बाईचे बोलणे :

१ मागें बाजीराव यांचा धारेस जन्म जाला हे वर्तमान ऐकोन पार्वतीबाई याणी सर्व किलयास तोफा करविल्या. आतां चिमाजी अपा जाले हे ऐकोन आनंद जाला नाहीं. शर्कराहि वाटली नाहीं. पहिला एक वैरी होता त्याचा बंद केला होता. पुढें दुसरा वैरी निर्माण जाला आहे. त्यास दुःख जाले; त्यामुलें शर्करा वाटणेयाचे विस्मरण जाले.

छ ७ सवाल.

१ प्रातःकाली बाई बागेत गेली होती.

१ तृतीय प्रहरी बाजीराव यांची स्वारी कुंभारीस देवदर्शनास गेली. पाणी गंगेस फार होते, म्हणोन आलीकडे धरणगांवींहून फिरोन आले. बराबर फडणीस व केसो महादेव होते.

२

छ ८ सवाल. उपाध्याजवल कामे सांगितली कीं पुण्यास नानास पुसावी असे बाई बोलली. कलमे :

१ श्रीहरिहरेश्वरास ब्राम्हण अनुष्ठानास पहिले पांच होते तसे आता ठेवावे.

१ आपासाहेबाची मुंज करावयाची.

१ गयावर्जन करावयाचे.

१ उमामहेश्वर व्रत.

१ मंगलागौरीचे व्रत, सावित्रीबाईचे.

१ आघ्र्यप्रधानास ब्राम्हण तीन नवे, यंदाचे वर्ष मृत्युयोगाचे आहे म्हणोन.

१ सौभाग्यवति भागिर्थीबाईस दस-न्यास पदर घालावयाचा.

१ घर ब्राम्हणास बांधून द्यावयाचे.

१ सिंव्हस्तात ब्रम्हपुरीसाहित पांचा ब्राम्हणास गांव द्यावा.

१ नक्षत्रसत्र करावयाचे.

१ गोपद्माचे व्रत सावित्रीबाईकडील.

१ बाण थोर आहे त्याचे स्थापना करावयाची.

१ नाना लहान किंवा नवे किंवा आज्ञान इतक्या गोष्टींतून कांहींच गोष्ट नाहीं. दान धर्म करितात व करवितात. इतके असोन नक्षत्र-सत्र करूं नये. अशा आनुष्ठानानें वाईट होते तर सारे अग्निहोत्री करितात. मग आम्हास किमर्थ मना केले? खर्चास पाठवणे तर पाठवावे नाहींतर आम्ही येथें करूं असे लिहिले असतां परवानगी पाठविली. नाहीं. तस्मात आमचे मर्जीचे आगत्य कोणास नाहीं.

१ आपासाहेबाची मुंज यंदा फाल्गुन मासीं करावी आणि कन्यागती लग्न करावे.

१ आस्ती माधवराव व नारायणराव यांच्या आजून ठेविल्या आहेत. ज्याचेसाठीं इतके केले, दौलत रक्षिली, त्याच्या आस्ती आजून ठेविल्या आहेत, त्यापक्षीं या अस्ती कशा जातील? हे तर बोलावयाचेच नाहीं. अत:पर अस्तीविसी त्यास पुसो नये. पूर्वी सुपत्ते होते तेव्हां केले नाहीं. आतां तर सिंध्याचा मात्र किंचित जोर आहे. आशानें काय होणे? दौलतेस कोट्यावधी रुपये खर्च केले, त्यातून पंचवीस हजार रुपये पाठऊन आस्ती पाठविते तर काय होते? परंतु घरच्या माणसाशिवाय आगत्य आसत नाहीं.

488

१ स्नानसंधेस जागा वेगळी बांधावयाची.

१ रंगभट आग्निहोत्री कोपरगांवीं आहेत. कुटुंबवत्सल आहेत यास वर्षासन करावे.

१४

छ ९ सवाल. एकादशीस स्वारी गेली होती.

१ गंगाप्रदक्षणेस स्वारी बाई व सावित्रीबाई व भागिर्थीबाई ऐसी गेली होती. बराबर जंगनाथ केशव होते.

१ तृतीय प्रहरी कोपरगांवास देवदर्शनास बाजीराव व आमृतराव गेले होते. बराबर आपाजी राम व केसो महादेव होते.

२

छ १३ सवाल.

१ तृतीय प्रहरी बाजीराव केसो महादेव यांचे बागेंत गेले. नंतर गौशाळा बांधितात तेथें गेले. बरोबर केसो महादेव याचे चिरंजीव होते.

१ पूर्वी नानासाहेबाचे वेळेस दानधर्म होता तेव्हां राज्य मोठे होते. आतां नवे कोणी केले नाहीं. त्यावेळचे पुण्य आहे त्यामुले चालले आहे, आसे बाई बोलली.

२

१ यंदा आम्हास वाईट आहे. आधिकउणे जाल्यास आमच्या आस्ती ठेऊ नये. येथें पश्चमवाईनींमध्यें टाकाव्या. सिंहस्थांत साहेबाच्या आस्ती गंगेंत टाकाव्या.

१ उपाध्यास सांगितले कीं, आम्ही कामे स्मरणाची याद लिहिविली आहे त्याविसी एक वेल मात्र पुसावे. वारंवार चिलवणपण करून पुसू नये. आमचे नाव ऐकिल्यानें त्यास वाईट वाटते. त्यापक्षीं आगत्याअगत्य काम असल्यास येकवेल पुसावे. पुन्हा पुसो नये.

१ आपासाहेब जाले हे माधवराव याणी ऐकून संतोष जाला. साकर वाटावी आसे बोलले. त्यास चुलता जाला म्हणोन संतोष वाटला. याचेहि धनीच होत. हे कारभारी बाजीराव यांचे चाकर. पहिले राज्यानी मजमदार दिल्हे म्हणोन याणी आपला वंश कन्येचा हे घरचे विश्वासु यास व खासगीवाले ऐसे दोघे ममतेचे म्हणोन कारभारी केले. सर्व लहान मोठें माहीत केलें. परंतु याणी दौलत संभालिली म्हणोन आसे केले.

७

छ १६ सवाल.

१ उपाध्येबावा पुण्यास गेले.

१ श्रीसांबाकडील मोर मिनेगर पाचेचे आहेत ते पुण्यास श्रीमंतास पाठविले.

२

छ १७ सवाल. सोमवारनिमित्य स्वारी श्रीकचेश्वरास नावेंतून बसून गेली होती. बाजीराव गेले होते. बराबर आपाजीराम होते.

जेष्ठ वद्य एकादशीपासून बाई उपोषणे करीतात. चतुर्मासात धरणीपारणी उपोषणात होतात. कलम १

चिमाजीआपा यांचा कान दुखतो. आंतून पू येतो. औषधउपाय चालले आहेत. कलम १

येथील जितकी चाकरीची माणसे आहेत तितक्यांत येकहि सोईचे नाहीं वाईट अमर्याद आहेत. चा(हा)ड्या करून आहेत आसे बोलतात.

कलम

बाजीराव (याचे) खेळण्यामध्यें फार चित्त आहे. चातुर्मासांत मौन दिवसा केले आहे. बाई रागे भरतात परंतु विशेष ऐकत नाहीं.

सेवेसी श्रुत होय हे विज्ञापित.

¶*Krishnaji Janardan reports Anandibai and Bajirao's doings and saying at Kopargaon : they are all full of interest and contain past reminiscences of many occurrences, and religious observances undertaken by Anandibai.*

No. 65] [26-7-1788

पौ छ १० जिलकाद

सु॥ तिसा.

श्री

सेवेसी गोविंद कृष्ण गोडबोले कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. येथील वर्तमान ताा छ २२ सवाल पावेतो क्षेम असे विशेष. श्रीमंत मातुश्री आनंदीबाई साहेब याणी वेदमूर्ति राजश्री लक्ष्मणभट उपाध्ये यास पत्र लिहावयास आज्ञा केली, त्याप्रो लेहून त्याची नकल पाा आहे त्यावरून ध्यानास येईल. याखेरीज मला आज्ञा केली की, श्रावणमासी दक्षणा पंचमी जालियावर येथील ब्राह्मणास येत्ये. त्यांस, आम्ही सुर्तेस व आणखी जांगा होतो परंतु समयानरूप थोडी बहुत दक्षणा देणे ते श्रावण शुद्ध त्रितीयेपासून पंचमी पावेतो द्यावी; सेवटी पंचमीस तरी द्यावी. प्रस्तुत पुणियाहून दक्षणेचा यैवज येतो तो पंचमीस येथे द्यावयाचे उपयोगी पडे यैसा आगोदर पाठवावा यैसे लिहून पाठवावे, त्यावरून लिंहिले अ[१].से.

¶*Govind Krishna Godbole sends instructions from Anandibai about the Shrawan Dakshana at Kopargaon.*

No. 66] [27-7-1788

पौ छ १९ जिलकाद

सु॥ तिसा.

श्री

वो राजश्री लक्ष्मणभट उपाध्ये बावा यांसी.

नमस्कार विनंती. येथील कुशल आषाढ वाा ९ पावेतो यथास्थित असे विशेष. कैलासवासी थोरली सासूबाई काय काय कुळधर्म करीत होती तो तीर्थस्वरूप मातुश्री गोदा[२]वरी सासूबाईस पुसोन ल्याहावे. रामनवमीस व गोकुलाष्टमी व गोकुलाची पूजा व नवरात्र व गणपतीचे त्रिरात्र व आणखी कांहीं अधिक उणे करीत असतील ते सर्व वतनाकडील देव बाबदेव व बहिरव व हरिहरेश्वर व स्थानपुरुष व आणि कोणाचे कांही उपास नेम असतील ते सासूबाईस पुसोन ल्याहावे.

---

१ पत्र पुरें कां केलें नाहीं? २ गोदूबाई देशमुखीण म्हणून जुन्या वृद्ध बाईचें नांव कागदांत येतें तीच ही असेल. ही कोण कोणाची?

येथे ब्राह्मणास दक्षणा पंधरा दिवसीं पाठीमागाहून येते ते पंचमीस द्यावयाची सोय करावी. पूर्वील कुळधर्म व देवाची पूजनें होत नाहींत ती नीट करावी म्हणोन श्रीची आज्ञा जाली आहे; त्यावरून लिहिले आहे ; हे विनंती.

¶*The writer asks information from Laxmanbhat Karve what religious functions used to be performed during the days of the first Peshwa and his wife.*

No. 67] [*4-8-1788*

पैा ७ जिलकाद
सु॥ सन तिसा.

श्री

सेवेसी कृष्णाजी जनार्दन कृतानेक सिरसाष्टांग नमस्कार विज्ञापना. तागायत छ १ जिलकादपर्यंत मुक्काम कोपरगांव येथें आसें विशेष. दिनचर्येचें वर्तमान :

छ २५ सवाल. आनंदवल्लीची जागा चांगली आहे. त्रिंबकेश्वर संनिध किंवा नाशिक संनिध, उंचवटा व बेलाची झाडे फार आसी आहे, आसी गोष्ट बाई बोलली.

१

छ २७ सवाल. मास शिवरात्रीस बाई जागर करितात. चार प्रहरास च्यार पुजा करितात.

कलम.

छ ३० सवाल. दोन प्रहरी बाई बागामध्यें पुराणश्रवणास गेली होती. बाजीराव चातुर्मासांत मौन करीत आहेत.

छ २६ सवाल. धारेत होतो स्वसत्तेत होते. वोढेकरानीं पहिल्यानें कठीण बोलले परंतु मागाहून चांगले केले आसे बाई बोलली.

कलम.

छ २९ सवाल. पर्वतीची गोष्ट निघाली त्याजवरून बोलली, स्वामी कार्तिकाची मूर्त दुसरे जागा पर्वतावर बांधिते तर नांव होते. नावाची गोष्ट तेव्हांच कळली आसती तर करिते. तल्यामध्यें देवालय आहे तेथें देवस्थापना केली नाहीं हे काय ? कांहीं तर देव ठेवावा असे बाई बोलत होती.

कलम.

सेवेसी श्रुत होये विज्ञाप्ति.

¶*Krishnaji Janardan reports Anandibai's and Bajirao's doings. Bajirao observes silence for the four months. Anandibai regrets her husband not having built a separate temple ,or Kartikeya, instead of at Parwati.*

No. 68] [*10-8-1788*

पौ छ १९ जिल्काद सुरु तिसा.

श्री

सेवेसी विज्ञापना. ता। छ ७ जिल्काद पावेतो क्षेम असे विशेष. येथे वर्षास पूर येतो. चौकीचे लोकांची छपरे व जासुदांची छपरे वर्षास पडतात. यंदा वाड्याचे दरवाज्यापासून पंनास हातावर पुराचे पाणी जवलपास आले होते. असे दरसाल येते. वारा भारी. नासिक त्रिंबकाकडे घरे फार आहेत. येथे जुलमाने राहिलो असे भाव बोलण्यात दिसतात. येथे राहावे असी मर्जी दिसत नाहीं. याचा विचार काय करावयाचा असेल तो करावा. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Anandibai desires to stay near Nasik and Trimbak and not at Kopargaon.*

No. 69] [*10-8-1788*

पौ छ ७ जिल्काद
सु॥ तिसा श्रावण.

श्री

सेवेसी गोविंद कृष्ण गोडबोले कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. येथील वर्तमान ता। छ २४ सवाल पावेतो क्षेम असे विशेष. राजश्री राघोपंत ठोसर यांस घरी जावयास येक महिन्याचा निरोप द्यावा म्हणोन आज्ञा जाली, त्यावरून ते निरोप घेऊन गेले. त्यास साहा महिने होत आले. पुणियांत त्यांचे तैनातेचा जावसाल पडला होता म्हणौन राहिले. तैनातेचे बोलणे फार करून जालेच असेल. काही राहिले असल्यास स्वामींनी ध्यानास आणून योजने प्रो कर्तव्य ते करून त्यास येथे पाठविले पाहिजेत. प्रस्तुत श्रीमंत राजश्री बाबासाहेब यांचे लिहिणे पढणे त्याजसिवाय सुरलीत चालत नाही व श्रीमंत राजश्री आपासाहेब यास ते औषध पूर्वीपासून देत असतात. प्रकृतीस माहीत आहेत. त्यांचे कानातून पाणी वाहात असते. दुसऱ्यापासून उपाय लागू जाला नाही. ते आल्याने उपाय होईल. यास्तव त्याची सोय तैनातेची होऊन त्यास इकडे यावयाची आज्ञा जाली पाहिजे. बहुत काय लिहावे, सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Govind Krishna asks Raghopant Thosar to be sent back at once.*

No. 70] [10-8-1788

पैा छ १९ जिलकाद
सुा तिसा

श्री.

सेवेसी गोविंद कृष्ण गोडबोले कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. येथील वर्तमान ताा छ ७ जिलकादपावेतो क्षेम असे विशेष. श्रीमंत मातुश्री बाईसाहेब यास श्रावण शुध्ध द्वितीयेस रविवारी पंचवटीस कैलासवास जाला, ते वर्तमान येथे कलावे म्हणून छ ३ जिलकादचे पत्र रवाना जाले ते आज प्रात:कालीच पावले. जासुदास पुसिले, च्यार दिवस वाटेत लागले याचे कारण काय ? त्याणी तपसील सांगितला. कागद अस्तमानी तिसरे तेरिखेस दिल्हा. तिसरे दिवसी दोन प्रहरी कचेस्वरास आलो. गंगेस पूर फार याजमुले आलीकडे येणे न जालें. आज प्रात:काली आलो. तेव्हा अडचावे दिवसी येथे पावले खरे. बाईसाहेबांस पंचवटीस रविवारी कैलासवास जाल्याचे वर्तमान सोमवारी सायंकाली येथे आफवा आली. मंगलवारी प्रात:काली नासिकचे सराफाचा माणूस आला त्याणे पके वर्तमान सांगितले. त्यावरून बुधवारापासून येथे स्पष्ट जाले. बुधवारापासून सुतक धरिले. अमृतराव यास त्रिरात्र आशौच ; त्यास त्रिरात्र क्रमिल्यानंतर समजले, यास्तव श्नान करून सुध जाले. आपले पत्र कालच आले म्हणौन विनंति केली. त्यावरून पंचवटीहून वर्तमान पुणियास जाऊन तेथून लिहून ठीक़ आलें, म्हणौन बोलली. सुतकाचा विषय येक दिवस मागाहून कलवावा असा सांप्रदायहि आहे म्हणौन विनंती केली. श्रीमंत माहाराज राजश्री रावसाहेब याचें सामाधान बहुत प्रकारे करावे म्हणौन ल्याहावयास आज्ञा केली. चिरंजीवास आई बाप भाऊ कोणीच नाहीं. आम्ही दूरच आहों. येक आजी तेहि दूरच होती. परंतु ममतेचे तेवढेच मनुश्य होतें. याअर्थी चिरंजीवास श्रम बहुत होतील. परंतु बहुत प्रकारे समजोन सांगावे. त्यांचाहि कालच जाला होता. सृष्टीची वाट हीच आहे. त्यापक्षी अशा गोष्टी सांगोन त्याचे शांतवन होय ते करावे याप्रो म्हणौन बोलली. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Anandibai sends condolences to young Madhaorao on the death of Gopikabai.*

No. 71] [11-8-1788

पौ छ १९ जिलकाद सुरू तिसा.

श्री

सेवेसी कृष्णाजी जनार्दन कृतानेक सिर सां नमस्कार विज्ञापना. ता। छ ८ जिलकादपर्यंत मु॥ कोंपरगांव येथे आसे विशेष. दिनचर्येचें वर्तमान.

छ ५ जिलकादी श्रीगंगेस पूर फार आला. वाड्यापुढें पंनास साठ हाता-वर पाणी आले होतें. काठीं जासूद माहाल वगैरे घरें वाहावली. आंत पाणी सिरलें. गुदस्ताचे दहशतीने लोक घाबरले होते. श्रीमंतहि किंचित् भयभीत जाले होते. कलम १

छ ६ जिलकाद,

बाजीराव व बाई त्रितीय प्रहरी केसो माहादेव याचे बागांत गेली होती. अशौच्यांत वेल जात नाहीं म्हणौन गेली होती. कलम १

सेवेसी श्रुत होय हे विज्ञाप्ति.

¶*Krishnaji Janardan reports about the heavy floods at Kopargaon.*

No. 72] [21-8-1788

पौा २६ सवाल सु॥ तिसा आशाढ.

श्री.

सेवेसी गोविंद कृष्ण गोडबोले कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. येथील वर्तमान ता। छ १७ सवाल पावेतो क्षेम असे विशेष. श्रीमंत राजश्री आपासाहेब याचा कान फार दुखतो. पाणी वहात असते. राजश्री रावोपंत ठोसर आपा-साहेबास पहिल्यापासून काही येक औषध देणे तर तेच देत असतात. प्रस्तुत ते आपले तेनातेचे कार्याकरिता पुणियास गेले. तेव्हापासून आपासाहेबाची प्रकृती दुसऱ्यास ठीक सांभालता येत नाहीं. श्रीमंत राजश्री बाबासाहेब यांचे लिहिणे पढणे यथास्थित चालत नाहीं. फार खेलतात. कोणाचे आइकत नाहीं. यास्तव त्याचे तैनातिची काय योजना केली असेल त्या प्रो। करून त्यास लौकर रवाना केले पाहिजेत. वो। राजश्री लक्ष्मणभट उपाध्ये काल श्रीमंत मातुश्रीबाई साहेबाची आज्ञा घेऊन पुणियास जावयाकरिता निघोन गेले. बाईसाहेबानी राजश्री हरिपंत तात्यास पत्र ल्याहावयास आज्ञा केली. तेच पत्र आपणास दाखवावे म्हणोन त्याच पत्रात लि॥ आहे. परंतु त्या पत्राची नकल करून स्वामीचे पत्रांत

घालोन लाखोटा करून उपाध्ये याजवल पत्रे देविली. सा दील्ही आहेत; पावतील. मनस्वी नानाप्रकारची पत्रे ल्याहावयास सांगतात. आम्ही त्रिवर्गेहि विनंती करीत असतों. परंतु त्याचे कल्पनेस दुसऱ्याने दोष ठेविला मणजे रागे भरतात. असी येक दोन पत्रे बलेबले राहाविली. परंतु आता हे पत्र न लिहिले तर फारच मर्जीस वाईट पडूं लागले. यास्तव लिहिले आहे. असी पत्रे लिहिल्याने लिहिणाराकडेस समयानरूप दोष येईल यास्तव विनंती लि॥ आहे. यैसे पत्र लिहिणे ठीक नाही. तेव्हां निक्षूण विनंती करावी लागेल. यास्तव काय आज्ञा ते जाली पाहिजे. या पत्राचे उतर लि॥च पाहिजे. स्पष्टात न आल्यास आम्हास येथे अडचण पडत्ये. कदाचित उत्तर न आले तर असे पत्र लिहू नये यैसेच आम्ही समजोन पुन्हा पत्र याप्रकारचे ल्याहावयास आज्ञा केली तत्रापि लिहिणार नाही. त्याचे मते जे आम्ही लिहितो ते सारे सरल आहे. न लि॥ तरी तिकडून कठीण. लिहिले तर रिकामा चिताचा क्षोभ. यैसा प्रकार आहे. यात सर्व स्वाम संरक्षण करणार आहेत. बहुत काय लिहावे, सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना. स्वामीचे मर्जीचा कांहीं उलेख पत्री लिहून आला मणजे येथें प्रसंगानरूप बोलावयासहि ठीक पडेल. श्रुत होय हे विज्ञापना. राजश्री तात्याचे पत्री, तुफानास प्रारंभ जाला आहे, म्हणून बाईसाहेबानी लि॥ आहे. त्याचे उतर वो राजश्री उपाध्येबावास ठाऊक आहे ते करितील, हे विज्ञापना.

¶*Godbole reports to Nana Fadnis some items in the daily life of Anandibai from Kopargaon. Raghopant Thosar's presence is very badly needed there as without him, Bajirao is but playing a truant. The writer explains how difficult it is to manage the things there as against his will he is required to write unpleasant letters to Nanasaheb according to the instructions from Anandibai.*

No. 73] [*3-9-1788*

श्री २

पु॥ सेवेसी कृष्णाजी जनार्दन कृतानेक सिरसां नमस्कार विज्ञापना. दिनचर्येचे वगैरे वर्तमान :

छ ३ जिल्हेज.

व भाद्रपद शुध्ध प्रतिपदेपासून उपोषणें व रात्रौ पूजा करून ब्राम्हण पढतात. याप्रो च्यार दिवस चतु-

छ ५ जिल्हेज.

त आहों हे पराक्रम यांचेच आहेत.

कलम १

र्थीचे दिवसी रात्रौ जागर करितात. नंतर आज पारणे जालें. येकवीस ब्राम्हण भोजन जाले.

छ ७ जिल्हेज.

१ माहदजी सिंदा मात्र मोठा सरदार आहे. तो तर या प्रांती नाही. कारभारी यांस धाक नाही. तो असला म्हणजे वचक असतो. दुसरा डोईजड नाहीं. याच्या करण्याच्या रीती चांगल्या आहेत परंतु धर्माची जात नाहीं.

१ मोरोबा इत्यादिक ठेऊन आपणच कारभार करितात. त्यांजकडे दोष काय ठेविले आणि हे निर्दोष कशावरून ?

१ सारांश, दैव हेच खरे. जिऊबाई चापेकर यांची कन्या नासिकास आली होती, ती येथे आली.

—

३

छ ११ जिल्हेज. सौ भागिर्थीबाई[1] पुण्याहून आली. पाच घटका रात्रीस वाड्यांत आली. त्यांची आजी व चुलते ऐसे वाड्यांत आहेत. कलम १

छ १३ जिल्हेज.

१ सायंकाली बाई व सावित्रीबाई[2] बागांत गेली होती. नंतर केसो माहादेव यांचे बागांत गेली होती.

१ कपिला शष्टीसारखी पर्वें मोठी आहेत. गोशते व्हावी. पूर्वी लाहान

छ ६ जिल्हेज.

१ भागिर्थीबाई यांचे येण्यांचा खोलंबा नवता आणि आम्ही बलावणे पाठविले तेव्हा न येत; आणि आता येतात. तेथेंच माहेरी राहावें हेंच चांगलें.

१ आनंदवलीस बेलाची झाडें चांगली आहेत. तेथेंच राहावें असें करारांत होतें. परंतु थोरले बाईने येऊ दिल्हे नाही. यांत त्यांचे हातास काय आले तें कलेना.

—

२

छ ९ जिल्हेज.

१ भाऊसाहेबास हिंदुस्थानांत जावयास कारण व सर्व बराबर व्हावयास कारण थोरली बाई.

१ भाऊसाहेबाची गर्दी जाल्यावर नानासाहेबांची अमर्यादा फारच केली. पुढें तरी हेंच जाले. दुईच्या गोष्टी निघों लागल्या. आम्हास कैद केलें. नंतर हटासच पेटले. सारांश दैवानें केलें हेच खरें.

—

२

छ १२ जिल्हेज.

१ माहादजी सिंद्याची बातमीची गोष्ट निघाली, आणि तिकडील वर्तमान सांगू लागली. तिकडील

---

१ बाजीरावाची बायको.

२ अमृतरावाची बायको.

पर्वणी पडत परंतु धर्म बहुत होत असे. आतां परस्वाधीनता हेंच खरें.
—
२

छ १४ जिल्हेज. चाकरीची माणसे कालानरूप आहेत. त्यासच धाक असला म्हणजे हेच चांगले होतील. कलम १

छ १६ जिल्हेज. उपाध्ये यांस नानाचा निरोप होत नाहीं म्हणोन लौकर येत नाहीं. त्यास ही गोष्ट उगीच म्हणावयाची. हेच येत नाही हें खरें. कामें काजें करून लौकर येणार आहेत. त्यास आसीं आमचीं कामें किती ? त्यांस खर्चाची गोष्ट जड पडते म्हणोनच कपिलाशष्टीकरितां आधिक मागों नये असेंच पूर्वीच लिहिलें होतें. नाहीतर, त्यास दोन चौक्या अधिक ठेवावयाचें स्मरण होते, आणिक कपिलाशष्टीचें स्मरण राहाणार नाहीं असें किमर्थ होईल ? कलम १

वाड्यांत पक्ष जाला १
—
२

छ १९ जिल्हेज.

१ कपिलाशष्टीनि॥ सर्व खाशांकडे गोप्रदानें जाली व व्रतें जाली.

१ रात्रौ जागर केला. बाई व सावित्रीबाई वगैरे बायका वाड्यातील होत्या.
—
२

पालेगर मिळाले होते ते बदलले. त्यांतीलच खंडेराव म्हणून ममतेचा होता, त्याणे संभाळून निराले काढिलें. वरकड सर्व लूट जाली. जातीनें मात्र संभाळिलें. आतां चिंता नाहीं *

१ जिऊबाई बोलिली की, यात्रेविसी उपाध्यास लिहिलें त्याचें उतर आले नाही. त्याजवर बाईचे बोलणे.

१ आर्घ्यप्रधानाविसी लिहिले होते.

१ यात्रेविसी.
—
२

दोन कलमाचे उतर आले नाही. तस्मांत नानाजवळ आमची कामे बोलतात की कसे हे कलेना.

१ पूर्वी साहेब व आमृतराव समुद्रामध्ये आठ दिवस होते आशा विपत्ती भोगिल्या.
—
३

छ १७ जिल्हेज. कालाचे दिवस व्यर्थ जातात. सर्व दानधर्म स्वसत्तेसिवाय यथास्थित घडत नाही. आमचे मर्जीनरूप धर्मव्यवस्ता घडत नाही. उगेच संशय धरितात. काय करावे ? आम्ही किमपि वांकडी गोष्ट सहसा करित नाहीं, असे बाई व आमृतराव बोलत होतें. कलम १

---

*This passage requires being clearly explained.

छ २१ जिल्हेज.

१ पूर्वी साहेबानी प्रायश्चित केले ते समयीच मला बलाविले नाहीं. किमर्थ, असे विसाजीपंताजवळ पुशिले. ते बोलिले कीं, तुम्हाकडे काहींच नाहीं. सारांश, फितुरामध्यें नव्हतें ही खातरजमा आहे; परंतु उगेच हाल करितात. *

१ पूर्वी गोविंद सिवराम याणे चेंड[1] केले आणि साहेबाजवळ शफत केली. नंतर महिन्यानें मृत्यु पावला. ज्यांणीं शफता केल्या ते कोणीच वाचले नाहीं. नाना व हरिपंत मात्र चांगले आहेत. यास उत्तर आपाजी राम यांणीं केलें, नारायणराव यांचे गर्दीमध्यें नव्हते म्हणोन हे दोघे यथास्थित आहेत; व आपणहि बारा वर्षे फिरत होतां, येके जागे राहणें न जालें. नंतर बाई बोलिली कीं, ते व आम्हीं कायमच होतों यांत विशेष काय ?

१ या स्थलापेक्षां इंग्रजांकडे सुखांत होतो. दैवेंकरून असें जालें. देसीं येऊन दुखच आहे. दैवयोग !

१ माझी ममता विशेष म्हणोन नारायणरायाची गर्दीचा मार मला सांगत नव्हते. यांणीं चौकसी किमर्थ केली नाहीं ? यादीचीं अक्षरें "ध" चा "मा" कोणीं केला याची चौकसी किमर्थ न केली ? माझा दस्ताएवज किंवा निरोप कांहीं

छ १८ जिल्हेज. कपिलाशष्टीची धर्माची नेमणूक करते समई बोलणे : पुण्यात तीन हजार रूपये धर्मास नेमलें म्हणोन ऐकिले. त्यापक्षीं आम्हास काय देतील ? मोठे पर्व असता असे केले; तस्मांत धर्मबुद्धि नाही. कलम १

छ २२ जिल्हेज. बाजीराव तृतीय प्रहरी कोकमठाणास स्वारी गेली होती. कलम १

छ २३ जिलेज. त्रितीय प्रहरीं वाड्यांत घोडीं फेरित होते. कलम १

छ २४ जिल्हेज.

१ दादासाहेब बहुत शाहाणे होते. परंतु सुरतेंहून निघतेसमई पुढें आसा परिणाम होईल हे चितांत आले नाही. ते म्हणत कीं, बाजीराव याजवर लोभ फार आहे व तुम्हीहि त्यांचे ममतेची. त्यापक्षीं मीं मात्र निराला आहे. माझेहि वृध्धत्व जाले. त्यापक्षी देसी जावें हें चांगलें. परंतु हे कृतघ्न आहेत हे कलले नाही. दैवानुसार जालें.

---

१ मुताटकी.

तरी निवडावयाचें होतें. काहीच न करितां उगेच पेचांत ठेविलें. दैवास उपाय नाहीं.

१ अमृतराव याजवर लोभ फार आहे. स्नानसंध्या भक्तिपुरस्कर करितात. पूर्वी साहेबास संतान न व्हावें असे योग जाले, म्हणोन दत्तक घेतले. परंतु चाल चांगली आहे. असे आसोन यासी दावा करितात. त्यास, जी गोष्ट होणे ती पूर्वीच जाली आतां फिरत नाही. त्यापक्षी धनी तर खरें; नानाची फडणीसी मागत नाहीं, मग इतके प्रयोजन काय ?

१ त्रितीय प्रहरानंतर बाजीराव याची स्वारी मौजे हिंगणी येथे देवदर्शनास गेले होते. दोन घटका रात्रीस आले.

—
२

१ साहेब मृत्य पावले त्या स्थानी देवालय बांधिले होते, तें गंगेच्या पुरानें पडलें.

छ २९ जिल्हेज. सोमवार नि।। बाजीराव अमृतराव कचेश्वरास देवदर्शनास गेले होते. कलम १

—
९

सेवेसी श्रुत होय हे विज्ञाप्ति.

¶*This diary of Anandibai's utterances, extending over about a month, contains many useful and interesting bits of information, reported from the lady's quarters to Nana Fadnis at Poona.*

No. 74] [*2-10-1788*

श्री २

पु।। सेवेसी कृष्णाजी जनार्दन कृतानेक सिरसां नमस्कार विज्ञापना.

छ १ मोहरम.

याप्रा निरोप सांगून निघाली. प्रातःकाली दर्शनास नेली ती प्रहर रात्रपर्यंत वाड्यात होती. नंतर निघाली.

छ ३ मोहरम.

१ त्रितीय प्रहरी बाजीराव व आमृतराव याची स्वारी कचेस्वरास व कोकमठाणास देवदर्शनास सोमवारनिमित्य गेली होती.

१ सौ भागीर्थीबाईस किंचित समाधान नाही, ज्वरांश होतों.

—
२

सेवेसी श्रुत होय हे विज्ञाप्ति.

¶*Report sent to Nana Fadnis of Anandibai's doings at Kopargaon.*